शुक्रवार, १० फेब्रुवारी २०२३
⊙ किमत ५ रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०२ ⊙ अंक -१६८
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

● MARATHI ● DAINIK ● AURANGABAD (MAHARASHTRA) ● FRIDAY 10 FEBRUARY 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-02 ● ISSUE-168 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-12 ● PRICE-5

राजस्थानी मल्टीस्टेट
कार्यक्षेत्र महाराष्ट्र-कर्नाटक

राजस्थानी मल्टीस्टेट
को-ऑप. क्रेडीट सो.लि., परळी वैजनाथ
बँकींग • आरोग्य • शिक्षण • रियल ईस्टेट • इन्शुरन्स
मुख्य कार्यालय : मोंढा, परळी वैजनाथ, जि. बीड. मो. 9130072178, 9130072188 | कॉर्पोरेट ऑफिस : २०५,२०६, बिल्डिंग नं. २, पहिला मजला, अपना बाजार, जालना रोड, औरंगाबाद. मो. 9130072176,
टोल-फ्री : 18004197501 rajasthanimultistate.in | संपर्क अनंत भाग्यवंत ९१३००७२१८९



चंदुलाल बियाणी
संस्थापक अध्यक्ष

Rajasthani Multistate MINI BANKING
www.rajasthanimultistate.in
Powered by Tatkal Banking
आता बँकिंग व्यवहार करणे झाले सोपे...
राजस्थानी मल्टीस्टेट को-ऑप. क्रेडीट सो.लि.,चा
तात्काळ बँकिंगच्या माध्यमातून तब्बल
४१८ बँकांशी होणार सेकंदात व्यवहार...

कोणतेही बँकिंग व्यवहार करणे फक्त 9 सेकंदात शक्य

तात्काळ बँकिंग सुविधा

रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया मान्यताप्राप्त, NPCI द्वारे संचलित भारत बिल पेमेंट सिस्टम (BBPS), मोबाईल/डी.टी.एच. रिचार्ज आणि इतर सुविधा
* नियम व अटी लागू

कोणत्याही बँकेत पैसे डिपॉझिट करणे. | कोणत्याही बँकेत पैसे ट्रान्सफर करणे. | कोणत्याही बँकेतून पैसे काढणे | मोबाईल बँकिंग सुविधा | Bank Account Verification सुविधा | NEFT/RTGS सुविधा | IMPS/UPI सुविधा | आधार पेमेंट सुविधा | QR Code सुविधा

## जननिष्ठा आणि छत्रपती शिवाजी महाराज

आधुनिक केसरी न्यूज

काळ सर्वसाक्षी आहे! सर्वच गोष्टींवर काळ हे सर्वोत्तम औषध! त्यातच अनेक महापुरुष येतात आणि आपल्या अलौकिक कार्यकर्तृत्वाने काळावर आपली चिरकाल मोहर उमटवून जातात! ही माणसं कालजयी होतात! त्यांच्या वर्तमानापेक्षा सांप्रतकाळी ही कालजयी माणसं एक वेगळंच, भारावलेलं वातावरण निर्माण करतात! याच अनुषंगाने आजपासून बरोबर दहाव्या दिवशी म्हणजे १९ फेब्रुवारी रोजी महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती मोठ्या जल्लोषात साजरी केली जाईल! हा दैदिप्यमान सोहळा मोठ्या उत्साह-अभिमानाने साजरा होईल! "छत्रपती शिवाजी महाराज कि जय!" असा एकच जयघोष होईल! सगळा आसमंत दुमदुमून-उजळून जाईल!

हे सगळं एकीकडे सुरु असतांना दुसरीकडे "खरंच आपल्याला शिवराय समजलेत काय?" हा प्रश्न सुद्धा सतावतो आहे. महापुरुष केवळ मिरवायची गोष्ट नसून त्यांचे




कार्य आणि विचार आपल्या जीवनात मूरवायची गरज असते. सतराव्या शतकांत महाराष्ट्रात छत्रपती शिवाजी महाराजांची राजेशाही व्यवस्था असतांना देखील महाराज अपरिमित जननिष्ठा कसे मिळवू शकले? राजा आणि त्याच्या नौकरावरून सर्वसमान्यांचा विश्वास उडालेला असतांना लोकांनी शिवाजी महाराजांना राजा म्हणून का स्वाकारले असेल? जगाच्या इतिहासात एवढ्या कमी काळात आणि कमी वयात जनसामान्यांच्या मनामनात शिवाजी महाराज आपले अस्तित्व कसे निर्माण करू शकले? याचे उत्तर म्हणजे महाराजांनी सामान्य माणसाला हे राज्य रयतेचे असून राज्यातील शेवटचा माणूस सुरक्षित ठेवण्याचा विश्वास निर्माण केला. या संदर्भाने कॉ.गोविंद पानसरे आपल्या 'शिवाजी कोण होता?' ग्रंथात संदर्भ देतात, "शिवाजीचे राज्य आले आणि एकदम बदल झाला. राजा आणि रयत यांचा संबंध आला. राजा रयतेला दिसू लागला, भेटू लागला, त्यांची विचारपूस करू लागला, त्यांचा छळ होऊ नये म्हणून दक्ष राहू लागला. त्यांना मदत हवी म्हणून राज्य चालवू लागला. शिवाजी जहागीरदार-देशमुख-वतनदार-पाटील-कुलकर्णी यांच्या बेलगाम व्यवहाराला लगाम घालू लागला. वतनदार हे मालक नाहीत तर राज्याचे नौकर आहेत, असे सांगू लागला. रयतेला दाद मागण्याचे धाडस आले. मुजोर वतनदारांना जरब बसून त्यांना कठोर शिक्षा होऊ लागली." याचा परिपाक म्हणजे पन्हाळगडाला सिद्धी जोहर-फाजलखान यांच्या वेढ्यात रयतेच्या राजाचा जीव धोक्यात असतांना एक गरीब न्हावी शिवा काशीदने नकली शिवाजी महाराज होऊन हसत हसत शत्रूच्या तलवारीने खतम झाला. आपल्या जीवापेक्षा आपला राजा जगला पाहिजे! रयतेचे राज्य उभे राहिले पाहिजे! या तळमळीने रयतेतील सामान्यांनी आपले प्राणार्पण केले! आज आपण लोकशाहीचा अमृतमहोत्सव साजरा होतांना सामन्यांचा इथल्या राज्यकर्त्यांवर छत्रपती शिवाजी महाराजांएवढा विश्वास आहे का? आज एखाद्या आमदार, खासदार अथवा मंत्र्यासाठी एखादा नागरिकतरी आपला जीव देईल का? या प्रश्नांची उत्तरे 'नाही' अशीच येतील. लोकशाही आणि राजेशाहीत हा फरक का? याचे कारण म्हणजे सांप्रतकाळी इथल्या राज्यकर्त्यांनी रयतेचे सुख कधी पहिलेच नाही.

मुठभर राजकर्त्यांनी करोडोंची माया, वर्षानुवर्षे सत्तास्थाने केंद्रित करून देश आणि राज्याला दिवसाढवळ्या राजरोसपणे लुटले असून अजूनही बिनदिक्कतपणे लुटत आहेत. आज लाखो उच्चशिक्षित तरुणांच्या हाताला काम नाही. महागाई गगनाला भिडली आहे. शेतमालाला भाव नसल्यामुळे शेतकरी गळफास जवळ करतोय. एकीकडे असे भयावह चित्र असतांना दुसरीकडे आपण जात-धर्म-रंगाचा अभिनिवेश दाखवून जर छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती साजरी करत असू, तर ती अंतर्मनाला स्वीकारार्ह असेल काय? परंतु अजून सगळे संपले नाही. अजूनही सर्वांनी वेळीच सावध होऊन जनसामान्यांचे मुलभूत प्रश्न समजून घेऊन कार्य करायची वेळ आली आहे. देश यशोशिखरावर नेण्यासाठी माणसे कुठून आणणार? त्यासाठी इथल्या राज्यकर्त्यांनी, श्रीमंतांनी, नौकरदारांनी जनसामान्यांचा सर्वोतोपरी विचार करून देश पुढे घेऊन जावा लागेल! शिवाजी महाराज आदर्श मानून सार्वांना तसे वागावे लागेल. जननिष्ठा आणि राजनिष्ठा हातात हात घालून गुण्यागोविंदाने नांदायला हव्यात! असे होणे म्हणजे खऱ्या अर्थाने विद्यमान लोकशाहीमध्ये शिवशाही अवतरेल आणि तेंव्हाच खरी शिवजयंती साजरी होईल! जय हिंद! जय शिवराय!

**(टीप: लेखक हे व्याख्याता, शिवचरित्रकार, कवी, किर्तनकार, समीक्षक, योग-प्राणायाम प्रशिक्षक आहेत.)**



प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये
संपर्क क्र. 9158064068

# बोटांवर मोजता येतील इतक्या शेतकऱ्यांना मिळाला विमा

## विमा कंपनीचा भोंगळ कारभार

आधुनिक केसरी न्यूज

**औसा : तालुक्यातील अनेक शेतकरी बांधवांनी खरीप हंगामातील पीक विमा मोठ्या प्रमाणात भरला होता. विम्याची रक्कम मोठ्या संख्येने मंजूर झाली. परंतु सदरील विम्याची रक्कम ही बोटांवर मोजता येईल इतक्याच शेतकरी बांधवांना मिळाली. त्यामुळे विमा कंपनीचा भोंगळ कारभार चव्हाट्यावर आला असून यामुळे शेतकरी बांधवांचे आर्थिक गणित कोलमडले आहे.**



कंपनी बळीराजाची हेळसांड करत असल्याचे बोलले जात असून या बदल कोणताही राजकीय पक्ष किंवा नेते विचारणा करताना दिसत नाहीत. शेतकरी बांधव बँकेत जाऊन साहेब.... विम्याचे पैसे खात्यावर जमा झाले का हो? कधी जमा होणार? माझ्या गट नंबर मधील शेतकऱ्यांचे आले, मग माझेच का आले नाहीत? माझे ही नुकसान झालतचं की. असे एक ना अनेक प्रश्नांची विचारणा तालुक्यातील शेतकरी बँकेतील कर्मचाऱ्यांकडे करीत आहेत. कारण उन्हाळ्यामध्ये शेतीच्या पूर्वतयारीसाठी त्यांना पैशांची गरज आहे. मात्र अद्याप शेतकऱ्यांना विम्याचे पैसे मिळाले नसल्याने अडचणी निर्माण झाल्या असून त्यांचे आर्थिक गणित कोलमडले आहे. सर्वपक्षीय आमदारांनी अधिवेशनात ७२ तासांची जाचक अट काढून सरसकट शासकीय पंचनाम्याआधारे विमा देण्यात यावा, अशी मागणी केली होती. एवढेच नाही तर पाच मार्च रोजी कृषी आयुक्तांनी ही विमा कंपनीना फैलावर घेत स्थानिक प्रशासनाने केलेले पंचनामे ग्राह्य धरून विमा परतावा देण्यासाठी कंपनीला योग्य ती कार्यवाही करण्यासाठी सूचना दिल्या होत्या. मात्र या घटनेला दीड महिन्याहून अधिक कालावधी उलटून गेल्यानंतरही कंपनीकडून शेतकऱ्यांना विमा परतावा मिळालेला नाही. दरम्यान तालुक्यातील काही मोजक्या शेतकऱ्यांना विमा मिळाल्याचे निदर्शनास आले मात्र त्यामध्ये ही तफावत असल्याचे दिसून येत आहे. काही शेतकऱ्यांना सोयाबीन पिकासाठी २२ हजार प्रती हेक्टरी तर काहींना १४ हजार रुपये प्रति हेक्टरी मिळाल्याची माहिती आहे. तसेच एकाच गट नंबरमध्ये कोणाला पैसे आले तर कोणाला नाही. असा नुसता गोंधळ घालून कंपनीकडून शेतकऱ्यांमध्ये संभ्रम निर्माण करण्याचे काम केले जात आहे. विमा परतावा मिळण्यासाठी जिल्हा किंवा तालुकास्तरावर शेतकऱ्यांना योग्य मार्गदर्शनाचा अभाव आहे. तहसील प्रशासन किंवा कृषी विभाग हा विषय आमचा नसल्याचे स्पष्ट सांगतात. विमा कंपनीचे कर्मचारी यांना देखील याबाबत पूर्ण माहिती नसल्याचे दिसून येते. मग विमा भरून घेण्यासाठी सांगायला सर्वजण एकत्र असतात आणि विमा परतावा देण्याची वेळ येते तेंव्हा यांच्या मध्येच समन्वय नसल्याचे चित्र पाहायला मिळते. दरम्यान विमा कधी व किती येणार याबद्दल शेतकऱ्यांत संभ्रम आहे.

# शेतकऱ्याने केले कालवाडीचे समारंभपूर्वक नामकरण

## आगळ्यावेगळ्या सोहळ्याची तालुकाभरात चर्चा


आधुनिक केसरी न्यूज

निफाड : दहेगाव ता. निफाड येथील दुग्धोत्पादक शेतकऱ्याने कालवडीचे समारंभपूर्वक नामकरण केल्याने त्यांच्या अनोख्या पशुप्रेमाची तालुक्यात चांगलीच चर्चा रंगली आहे. दहेगाव येथे नुकताच कालवडीचा नामकरण विधी सोहळा कार्यक्रम पार पडला. या चर्चेला परिसरात उधाण आले होते. अनेक पशुपालक शेतकऱ्यांनी या आगळ्यावेगळ्या सोहळ्याचे स्वागत केले आहे. अंबादास भवर हे परिसरात पशुपालक आणि दुग्धव्यावसायिक म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यांनी शेतीस जोडधंदा म्हणून सुरू केलेला दुग्धविक्री व्यवसाय कालांतराने कुटुंबाचा मुख्य व्यवसाय अन, कुटुंबाचा उदरनिर्वाहाचा आधार झाला. साहजिकच पाळीव जनावरे त्यांच्या घरातील सदस्यच झाले. रुक्मिणी, गीता, सीता, मोनिका, मोठी एकादशी, सुगरण अशी नावे असलेल्या सहा गायींचे पालन ते करतात. त्यांच्यापासून दिवसाकाठी सत्तर लिटर दुधाची विक्री ते करतात. त्यांच्याकडे असलेली रुक्मिणी नावाची गाय संत निवृत्तीनाथ यात्रेच्या दिवशी म्हणजेच षटतिला एकादशीच्या दिवशी व्यायली. एका सुंदर आणि गोंडस कालवडीस गायीने जन्म दिला. भवर कुटुंबात नवीन सदस्याचे आगमन झाले. धार्मिक वातावरण लाभलेल्या भवर कुटुंबाने या कालवडीचा नामकरण विधी करण्याचा निर्णय घेतला. मुलांचा नामकरण विधी केला जातो तर कालवडीचा का करू नये ? असा विचार भवर यांचा झाला. एकादशीच्या दिवशी तिचा जन्म झाला म्हणून कालवडीचे नाव 'एकादशी' ठेवण्यात आले. यावेळी उपस्थितांसाठी जेवणाची व्यवस्था करण्यात आली. सुमारे पाचशे नागरिकांनी या कार्यक्रमास हजेरी लावली. परीसरात या आगळ्यावेगळ्या सोहळ्याची जोरदार चर्चा सूरू आहे.



'सर्व दुभती जनावरे भवर कुटुंबाची सदस्यच आहेत. त्यांची प्रत्येकाचे नाव असल्याने त्याच नावाने संबोधन असते. दुग्धोत्पादन हा कुटुंबाचा मुख्य व्यवसाय झाल्याने त्यांच्या ऋणातून उतराई होण्याचा हा छोटासा प्रयत्न आम्ही केला. - **अंबादास भवर**






विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

# एक अलौकिक प्रेमकथा : राम आणि सीतेची



आधुनिक केसरी

जेव्हा तेथे उपस्थित सगळे राजे ते उचलण्यात अयशस्वी होतात, तेव्हा विश्वामित्राच्या आदेशानुसार राम ते शिवधनुष्य उचलतो. ते त्याच्या हातून भंग होते. आणि मग सीता रामाला वरमाला घालते. मात्र विवाहापूर्वी सीता रामलक्ष्मणाला पुष्पवाटिकेत पाहते ,त्याचवेळा हा लावण्यमूर्ती असलेला राम तिच्या मनात भरतो. आणि त्याच्याशीच आपला विवाह व्हावा ही इच्छा तिच्या मनात निर्माण होते. सीता ही भूमीकन्या तर राम हा विष्णूचा अंश. त्यांच्या विवाहाने जणू भूमी आणि आकाश एकत्र येतात. आकाशाशी जडले नाते धरणीमातेचे, स्वयंवर झाले सीतेचे. लग्नानंतर जेव्हा राम पित्याला दिलेल्या वचनानुसार वनवासाला निघतो, तेव्हा तो सीतेचा निरोप घ्यायला येतो. रामाशिवाय राहायचे ही कल्पना देखील सीता सहन करू शकत नाही. म्हणून राम जेव्हा तिला समजावतो की वनवासातले जीवन अत्यंत कठीण आणि दुःखदायक आहे. तेव्हा तू अयोध्येतच राहा. त्या प्रसंगी क्षणाचाही विचार न करता सीता म्हणते निरोप कसला माझा घेता, जेथे राघव तेथे सीता. इतकी ती राममय झाली आहे. राम आणि सीता यांची शरीरे फक्त वेगळी आहेत. आत्मा एकच आहे. ते एकजीव झालेले आहेत. एवढेच नाही तर सीता ही रामाची शक्ती देखील आहे. सीतेशिवाय राम अपूर्ण आहे. म्हणून तो सीताराम आहे. त्यामुळे तो आपल्यासोबत वनवासात सीतेला घेऊन जातो. जसा राम हा सर्व बाबतीत आदर्श आहे तशीच सीता सुद्धा. ती आदर्श पत्नी, आदर्श माता, आदर्श सून, आणि आपल्या दिरांवर पुत्रवत प्रेम करणारी वहिनी आहे. सीतेला रामाच्या पराक्रमावर कधीही न ढळणारा विश्वास आहे. म्हणून वनवासात जेथे हिंस्त्र प्राणी आहेत, राक्षसांची भीती आहे अशा ठिकाणी सुद्धा रामाच्या पराक्रमावर श्रद्धा असणारी सीता त्याच्या खांद्यावर विश्वासाने मान ठेवून निर्धास्त आहे. निर्भय आहे. एवढेच नाही तर वनवासातील हा रामासोबतचा काल तिच्या जीवनातला आनंददायक आणि सुखकारक असा काल आहे कारण या काळात आपल्या प्रिय राघवाबरोबर तिला राहायला मिळते. त्यापुढे राजप्रासादातील आणि स्वर्गातील सुखे देखील तिला तुच्छ आहेत. **क्रमशः**



## आनंदी पहाट

# स्टाईल बदलली की लाईफ बदलतेच

आधुनिक केसरी

काही वर्षांपूर्वी घरं शेणानं सारवली जायची. अलीकडच्या काळांत टाईल्सचा सर्वात अधिक वापर केला जात आहे. त्यामुळे सांधेदुखीचे आजार आपण पाठीमागे लावून घेत आहोत. पूर्वी घरांची रचना देखील पर्यावरणपूरक असायची. बदलत्या हवामानाचा कोणताही विपरीत परिणाम त्यामुळे आपल्या शरीरावर अथवा मनावर होत नव्हता. जेवण झाल्यानंतर किमान एक तास तरी झोपू नये. आहारासोबत विहार महत्त्वाचा असल्याने व्यायामाला देखील तेवढेच महत्त्व आहे. म्हणून किमान ४० मिनिटे चालणे, योगासने, सायकलिंग तसेच डॉक्टरच्या सल्ल्याप्रमाणे व्यायाम करणे गरजेचं असतं. परंतू प्रत्यक्षात किती जणांकडून त्यातील तथ्य लक्षांत घेऊन ती पथ्य पाळली जातात. आजच्या धकधकीच्या जीवनात आपलं मानसिक, शारीरिक स्वास्थ्य हरवत चाललं आहे. मुख्य म्हणजे आपली दिनचर्या योगसाधनेच्या विपरीत झाली आहे. ह्यासाठी आय. टी कंपन्यांचं उदाहरण घेतलं तर लगेच लक्षात येईल. आपल्या देशातील इंजिनिअर, डिझायनर आणि कॉल सेंटरवरील प्रत्येकाला भारतीय वेळेप्रमाणे दिनचर्या न ठेवता परदेशातील वेळेप्रमाणे काम करत असतात. दिवसाच्या सुरवातीपासूनच भारतातील सेवा मिळवण्यासाठी परदेशांतून फोन येतात. ब्रह्ममुहूर्त ही साधनेची उत्तम वेळ आहे, परंतु रात्री उशिरांपर्यंत काम करून झोपायला ज्यांना तीन ते चार वाजतात, त्यांची तर ती मध्यरात्रीची वेळ असते. अशा प्रकारे परदेशातील दिनचर्येशी आपली दिनचर्या जुळत नसल्याने त्याचा थेट परिणाम शारीरिक स्वास्थ्यावर होत राहतो. आपण लाईफस्टाईलचा विचार करत राहतो. पण आपल्याला स्टाईल बदलली कि लाईफ बदलू शकते, हेच लक्षात येत नाही. त्यामुळे आपल्या लाईफसाठी स्टाईल बदलणे गरजेचे असते.


विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655



आधुनिक केसरी

**दिसे चराचरी | पांडुरंग ||**
आनंदी आनंद | झाला त्रीभूवनी ||
आत्मानंद मनी | मावेना रे ||१||
माझा मी रमलो | हरिच्या नामात ||
भाव हृदयात | जागा झाला ||२||
नाम तुझे घेता | भक्तीमार्ग जोडी ||
अमृताची गोडी | भजनात ||३||
पूर्व पुण्य माझे | झालो मी भिकारी ||
नामाची शिदोरी | लाभली रे ||४||
ब्रह्मानंद आता | मावेना अंतरी ||
दिसे चराचरी | पांडुरंग ||५||


प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरूपण

आधुनिक केसरी

विद्यार्थ्याने न विसरता दररोज आपल्या अभ्यासविषयांची चर्चा आपल्या मित्रांसमवेत करावी. जगात बहुतेक ठिकाणी ड्रेसकोड लागू पडतो. म्हणून योग्य वेळी योग्य कपडे वापरा.

---------------------------


शारीरिक आरोग्याची काळजी घेताना रुचेल ते नव्हे, पचेल ते खा. आर्थिक आरोग्याची काळजी घेताना रुचेल ते नव्हे, परवडेल ते घ्या. सामाजिक आरोग्याची काळजी घेताना तुमचे मत कोणावरही लादू नका. तुम्हाला मत लादावे लागते याचा अर्थ इतकाच की, तुम्हाला तुमचे मत व्यवस्थितपणे मांडण्यासाठी अधिक तयारीची गरज आहे.


डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

आधुनिक केसरी

मन संचालक देह का, मन कर सकल पसार ।
आतम चेतन योग से, मन कर कर्म अपार
।।४१।। (स्वर्वेद द्वितीय मण्डल सप्तम अध्याय) ०२/०७


स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

## बध्दमुक्तनिरूपण

आधुनिक केसरी


।। मुक्त इति व्याख्या गुणतो मे न वस्तुतः ।गुणस्य मायामूलत्वान्न मे मोक्षो न बंधनम्।। वरील श्लोकाचा अर्थ आता पाहुया. बध्द आणि मुक्त हे वर्णन गुणांच्या साठी लागू पडते. आत्मवस्तुच्या बाजूने विचार केला तर ते खरे नाही. म्हणून आत्मस्वरूपाला जसे बंधन नाही तसे बंधनातून मुक्त होणे पण नाही।
जो अत्यंत शुध्दब्रम्हज्ञानी असतो त्याच्या जवळ बध्द आणि मुक्त हा भेदच नसतो. रज,तम,सत्व याला कुरवाळत बसणारे जे लोक आहेत त्यांच्या कडे याचा भ्रमाचख साठा असतो. जेथे सारे नामरूपमय द्रुष्य विश्व संपते तेथे "मी मुक्त आहे"ही भावना उरणे शक्य नसते. स्वस्वरूपाच्या अनुभवात बध्दपणा मुक्तपणा याचा विसर पडतो. आणि मग ऊलतो तो फक्त आणि फक्त शुन्य म्हणून म्हणतात की अहंकार त्याग ही शुन्यत्वाची पहिली पायरी आहे. थोडक्यात काय तर मित्रांनो "मी बध्द होतो व मी मुक्त झालो"हा सगळा भ्रम समजावा. बध्द व मुक्त अवस्था मायामय असते. झोपेतील स्वप्न खरी नसतात जागे झाल्यावर आपल्याला ती आठवत देखील नाही. म्हणून ज्यांना आत्मसाक्षात्कार होऊन आत्मज्ञान मिळते ते सगळे मुक्त समजावे. तेंच ज्ञान परिपक्व झाले कीआपण मुक्त आहोत ही मनाची भावना संपते.


सौ. उज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

# श्रद्धा ही मोठी शक्ति आहे

आधुनिक केसरी

फार चिकित्सा करीत बसणे हे मानवी देहबुद्धीचे लक्षण आहे. दुकानात गिऱ्हाईक आले आणि मालाची फार चिकित्सा करू लागले की, ' हे गिऱ्हाईक काही विकत घेणार नाही ' असे दुकानदार समजतो. परमार्थातही अती चिकित्सा करणाऱ्या माणसाचे तसेच आहे. रणांगणावर गुरूंना कसे मारावे या चिकित्सेत अर्जुन पडला. भगवंतांनी अर्जुनाला आपले रूप दाखविले. त्यात पुढे होणाऱ्या सर्व गोष्टी अर्जुनाला दिसू लागल्या. देहबुद्धीच्या, अभिमानाच्या आहारी जाऊन मायेत सापडल्यामुळे झालेला गोंधळ या विश्वरूपदर्शनामुळे नाहीसा झाला. मायेचे मूळ लक्षण म्हणजे 'मी कर्ता आहे' असे वाटणे. 'अभिमानाशिवाय कार्य तरी कसे होईल ?' असे आपण म्हणतो, आणि पापाचरण करायलाही मागे पुढे पाहात नाही. देहबुद्धीने केलेला धर्म उपयोगी पडत नाही. अभिमानाने पुण्यकर्मे जरी केली तरी तीही पुढल्या जन्माला कारण होतात. सर्व काही देवाला अर्पण केले, ही आपली आठवण काही जात नाही. दुःखात असताना, आपण आपले जीवन प्रारब्धाच्या, ग्रहांच्या, संचिताच्या किंवा भविष्याच्या हाती आहे असे म्हणतो. परंतु ते भगवंताच्या हाती आहे ही श्रद्धा उडून, आपण त्याला विसरतो. आपण आपल्या शंकेचे समाधान करू शकत नाही. त्यासाठी आपण कुठेतरी विश्वास ठेवला पाहिजे. आपण आजपर्यंत जगलो याला काय कारण सांगता येईल ? आपण मेलो नाही म्हणून जगलो इतकेच ! 'मी कसा जगलो' याचे कारण कुणालाही सांगता येणार नाही. म्हणून, राखणारा भगवंत आहे ही श्रद्धा असावी. ही सृष्टी भगवंताने उत्पन्न केली. सृष्टीमध्ये भगवंत सर्व ठिकाणी भरलेला आहे. तो आनंदमय आहे, आपण त्याचे अंश आहोत, मग आपण दुःखी का ? याचे उत्तर असे की, 'देव आहे' असे खऱ्या अर्थाने आपण वागत नाही, जिथे भगवंत आहे तिथे आपण त्याला पाहात नाही, श्रद्धेने साधन करीत नाही. श्रद्धेशिवाय कधी कुणाला परमार्थ साधायचा नाही. श्रद्धा ही फार बळकट आणि मोठी शक्ति आहे. श्रद्धेने जे काम होईल ते कृतीने होणे कठीण जाते. विद्या, बुद्धी, कला, इत्यादि गोष्टी बिळासारख्या आहेत, त्यांच्यामधून श्रद्धा झिरपत जाते. विद्वानांची मते आपापसांत जमत नाहीत आणि त्यामुळे आपली श्रद्धा डळमळते, आणि मग आपल्याला आणखी वाचन केल्याशिवाय चैनच पडत नाही. आपल्या स्वभावामध्ये भगवंताच्या श्रद्धेपासून उत्पन्न झालेला धीमेपणा, म्हणजे धीर पाहिजे. आपण आपल्या स्वतःवर जेवढी निष्ठा ठेवतो तेवढी जरी भगवंतावर ठेवली, तरी आपले काम होईल. नामात भगवंत आहे ही श्रद्धा ठेवावी, आणि अखंड भगवंताच्या नामात राहण्याचा प्रयत्न करावा, हाच परमार्थाचा सोपा मार्ग आहे. **आजचे बोधवचन आहे – भगवंतावर निष्ठा ठेवा, प्रेम ठेवा, भगवंत कष्ट साध्य नसून सहजसाध्य आहे.**



## तुकाराम गाथा

आधुनिक केसरी

आपुलिया हिता जो असे जागता । धन्य माता पिता तयाचिया ॥१॥
कुळीं कन्यापुत्र होतीं जीं सात्त्विक । तयाचा हरिख वाटे देवा ॥ध्रु.॥
गीता भागवत करिती श्रवण । आणीक चिंतन विठोबाचें ॥२॥
तुका म्हणे मज घडो त्याची सेवा । तरी माझ्या दैवा पार नाहीं ॥३॥

आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

शुक्रवार, १० फेब्रुवारी २०२३

adhunikkesari.com Adhunik Kesari


# मराठा आरक्षण पुनर्विचार याचिकेवर दोन आठवड्यात निर्णय घेऊ

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची ग्वाही



आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद : मराठा आरक्षण पुर्नविचार याचिकेबाबत कोअर कमिटी स्थापन करुन दोन अठवड्यात निर्णय घेऊ असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे दै. आधुनिक केसरीशी बोलताना सांगितले. मराठा आरक्षणासाठी आतापर्यंत कुठलाही राजकीय पक्ष ठोस भूमिका घेऊ शकला नाही, हे सत्य असताना राज्य शासनाने गावकऱ्यांसोबत उच्च पदस्थ अधिकारी व कायदे विभागाचे वरिष्ठ यांचे सोबत नुकतीच सह्याद्री आतिथीगृह मुंबई येथे बैठक घेतली. राज्य शासन मराठा आरक्षणाच्या पुनर्विचार याचिकेबाबत गंभीर नाही, मग टास्क फोर्स कसा स्थापन करणार, असा प्रश्न मराठा क्रांतीमोर्चाने उपस्थित केला होता. त्यावर उत्तर देताना मुख्यमंत्री शिंदे यांनी वरील प्रतिक्रिया दिली.**

मराठा आरक्षण पुर्नविचार याचिकाकर्ते राजेंद्र दाते पाटील यांनी प्रश्न उपस्थित केले होते की, कायदेशीर प्रश्न शिष्टमंडळातील कोणीही उपस्थित करू शकणार नाही. त्यामुळे सरकार अडचणीत येऊ शकणार नाहीच त्यावर कुरघोडी म्हणजे म्हणजे सारथी-आण्णासाहेब पाटील महामंडळ -कोपर्डी प्रकरण- आंदोलकांवरील गुन्हे परत घेणे या वरील तोडगा मराठा क्रांती मोर्चाच्या शिष्टमंडळाने उपसमितीला व अध्यक्ष यांना सविस्तरपणे सादर केलेला आहे. त्यावरील निर्णय पार पडलेल्या बैठकीत मुख्यमंत्र्यांनी का जाहीर केला नाही? सर्वोच्च न्यायालयातील प्रलंबीत पुनर्विचार याचिकेसाठी पॉवर पॉईंट प्रेझेन्टेशन सादरीकरण जालना येथील राज्य स्तरीय आरक्षण गोलमेज परिषदेत करण्यात आले होते. सर्वोच्च न्यायालयातील मुख्य हस्तक्षेप याचिकाकर्ता राजेंद्र दाते पाटील यांनी सादर केले होते त्यावर शासनाने चर्चा करण्यासाठी बैठक घ्यावी म्हणुन जाहीर मागणी चा ठराव या राज्य स्तरीय बैठकीत मंजुर होऊन आरक्षण उपसमितीला राज्यशासनाला लेखी निवेदन देऊन सुद्धा त्यावर राज्य शासनाने बैठक का अद्यापही का आयोजीत केली नाही. एक सत्यता पाहता वास्तवीक पणे एस.ई.बी.सी. २०१८ कायदा तयार करतांना ५० % पुढील स्वतंत्र आरक्षण ही बाब मराठा समाजाने मान्य केली होती व ती बाब उच्च न्यायालय मुंबई यांनी मान्य करून मराठा समाजाच्या बाजुने निर्णय दिला होता. सर्वोच्च न्यायालयात निकाल विरोधात का गेला याचे कायदेशीर मंथन शासन का करत नाही ? न्यायालयात कोणा कोणाच्या याचिका होत्या ? त्यात काय मागण्या होत्या ? याचे मंथन झाले की सगळे स्पष्ट होणार आहे परंतु शासन कोणाला तरी " प्रोटेक्ट करून त्यांनाच प्रोजेक्ट " करीत आहे हे फक्त मिशन २०२४ साठी असे आता मराठा क्रांती मोर्चा उघड पणे बोलत असुन इतकी लेखी निवेदने शासना कडे उपलब्धअसतांना निर्णय का होत नाही ?सर्वच राजकीय पक्षांना आरक्षीत कोट्यातील घटकांना नाराज करायचे नाही हे आता स्पष्ट झाले आहे. " मराठा वकिलांची ती फौज कुठे आहे ? हा प्रश्न सुद्धा मराठा समाजाला पडला असून ज्या याचिका दाखल झाल्या होत्या त्या याचिका नंतर वापस का घेतल्या गेल्या ? याचे उत्तरे सुद्धा समाज अपेक्षीत करत आहे. राज्य मागासवर्ग यादी आणि राष्ट्रीय मागासवर्गयादी अशा दोन प्रकारात आरक्षण असते तेंव्हा राज्य यादीत नाव आल्या शिवाय केंद्रात नाव कसे येईल ? पण राष्ट्रीय आयोगाने बेकायदेशीर टिप्पणी करून दिशाभूल केली आहे. ्यायमूर्ती एम.जी. गायकवाड आयोगानुसार मराठा समाज हा मागास आहे हे सिद्ध झाले आहे. त्यामुळे मराठा समाज सामाजिक आणि शैक्षणिक दृष्ट्या मागास असल्याने तो आरक्षणास पात्र ठरू शकतो. आता प्रश्न आहे की, सर्वोच्च न्यायालयाने सांगितल्या प्रमाणे मागासपण नव्याने सिद्ध करावे लागणार आहे. फुगीर आरक्षण काढण्यासाठी योग्य कोर्टात याचिका दाखल होणे व १९९४ पासूनचा आज पर्यंत आक्षेप घेण्या साठी उशीर का झाला ? हे सिद्ध केल्या शिवाय याचिका करणे शक्य नाही यावरसुद्धा कायदेशीर मंथन अपेक्षित आहे. घटनापीठ-सर्वोच्च न्यायालयाच्या ५-७-९-११ अगदी १३ न्यायमूर्तींच्या घटना पीठाने पुनर्विचार याचिका कशा मंजुर केल्या? ही बाब शासन निव्वळ दुर्लक्षित अजीबात करु शकत नाही, अशी आग्रही भूमीका मराठा क्रांती मोर्चाने घेतली आहे. पुणे येथे सुद्धा निमंत्रीतांची सविस्तर अशा राज्यातील आरक्षणावर कार्यरत प्रमुख व्यक्तींच्या महत्वाच्या बैठकीत हेच सादरीकरण झाले होते. ही बाब अत्यंत गंभीरतेने घेणे आवश्यक आहे. समाजाला आरक्षण मिळून मराठा समाजाची प्रगती होईल हे शासन कर्त्यांनी लक्षात ठेवले आणि त्यानुसार काम करत राहीले तर यश पदरात पडल्या शिवाय राहणार नाही. यासाठी एक दुसऱ्याकडे अंगुली निर्देश करून गटातटाच्या राजकारण विषयास शासनाने हातभार लावू नये ही बाब लक्षात घेणे गरजेचे आहे, असे आवाहन पाटील यांनी केले होते. ५० % च्या पुढील मागणीस कोणताही राजकीय पक्ष विरोधात जाऊ शकत नाही आणि हेच कार्य राजकीय पक्षांनी करावे म्हणून शिंदे- फडणवीस सरकारने केंद्र शासनाकडे व लोकसभेत विविध केस लॉ घटनापीठाचे न्याय निवाडे या बाबत राज्य शासनाने मराठा समाजाच्या संघटना प्रतिनिधी व शासनाच्या विधी विभागाचे अधिकारी यांची तात्काळ बैठक आयोजीत करावी व या नंतरच टास्क फोर्स काढण्याची घोषणा करावी अशी मागणी अखंड भारत मराठा साम्राज्य संघटनेचे संस्थापक अध्यक्ष रामचंद्र आनंदराव शेडगे मुंबई,प्रकाश भाऊ जगताप- सातारा जि.सं.प्रमुख, दत्ता शेळके मुंबई शहर सं.प्रमुख सुभाष देसाई- कोल्हापूर जि.सं.प्रमुख,नरेंद्र काळे पाटील अहमदनगर जि.सं. प्रमुख संतोष चव्हाण- पुणे श. सं. प्रमुख शुभम चावरे,गडहिंग्लज,ता.सं प्रमुख, संतोष काळूराम दळवी, पुणे जि.सं.प्रमुख, राजेश देशमुख, नाशिक जी.सं. प्रमुख,शिवाजीराव उगले पाटीलनाशिक जि.स. प्रमुख,गोपाळ नाना पाटील,बुलढाणा यांच्या सह राज्यातील अनेक संघटनेतील संघटक व इतर संघटनेतील सदस्यांनी केली आहे.

# गृहमंत्र्यांची पोलीस दलावर पकड नाही

## पटोलेंचा फडणवीसांवर निशाणा

आधुनिक केसरी न्यूज



**मुंबई :** हिंगोलीचे दिवंगत खा. राजीव सातव यांच्या पत्नी आ. डॉ. प्रज्ञा सातव यांच्यावर केलेला हल्ला हा महाराष्ट्रात गुन्हेगारांचे मनोबल वाढल्याचे उदाहरण आहे. शिंदे-फडणवीस सरकारमध्ये गुन्हेगारी वाढली आहे, असा गंभीर आरोप काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केला आहे. तसेच लोकप्रतिनीधीवर हल्ले होत असतील, तर हे गंभीर असून गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा पोलीस दलावर वचक नसल्याचे दिसत आहे, असे म्हणत पटोलेंनी फडणवीसांवर निशाणा साधला. शिंदे-फडणवीसांच्या राज्यात लोकप्रतिनीधीही सुरक्षित राहिले नाही. काँग्रेस आमदार डॉ. प्रज्ञा सातव यांच्यावर हल्ला करणाऱ्यांना तातडीने अटक करून कठोर कारवाई करा, अशी मागणी नाना पटोलेंनी केली. नाना पटोले म्हणाले, आमदार डॉ. प्रज्ञा सातव यांच्यावरील भ्याड हल्ल्याचा आम्ही निषेध करतो. शिंदे फडणवीस सरकारमध्ये सत्ताधारी पक्षाचे आमदारच खुलेआम दादागिरी करत आहेत, हातपाय तोडण्याची धमकी दिली जाते, गोळीबार केला जातो, पण त्यांच्यावर कारवाई होत नाही. सत्ताधारी पक्षांच्या आमदारांना वाय दर्जाची सुरक्षा पुरवण्यात आली आहे आणि विरोधी पक्षांच्या लोकप्रतिनीधींची सुरक्षा काढून घेतल्या आहेत. लोकप्रतिनिधींना लोकांमध्ये जावे लागते, त्यांच्याशी संवाद साधावा लागतो, विविध कार्यक्रमासाठी त्यांना जनतेमध्ये फिरावे लगते, पण असे हल्ले होत असतील, तर लोकप्रतिनीधींनी काम कसे करायचे? पोलीस दल व इतर सरकारी यंत्रणा काय फक्त विरोधी पक्षांच्या नेते व लोकप्रतिनीधींवर कारवाई करण्यासाठी राखीव ठेवल्या आहेत आहे का? एका महिला लोकप्रतिनिधीवर हल्ला झाला तरी राज्याच्या गृहमंत्र्याची एका वाक्याची प्रतिक्रियाही आली नाही हे असंवेदनशिलपणाचे लक्षण आहे, असे म्हणत नाना पटोलेंनी फडणवीसांना लक्ष्य केले.

# अमित शाह कोल्हापूर दौऱ्यावर

आधुनिक केसरी न्यूज

**कोल्हापूर :** केंद्रीय गृहमंत्री अमित शाह 19 फेब्रुवारी रोजी कोल्हापूर जिल्हा दौऱ्यावर येत आहेत. त्या अनुषंगाने सर्व संबंधित शासकीय यंत्रणांनी परस्परात योग्य समन्वय ठेवून दौरा यशस्वी करावा, असे आवाहन उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी केले. जिल्हाधिकारी कार्यालयात आढावा बैठकीत चंद्रकांत पाटील बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी राहुल रेखावार, पोलीस अधीक्षक शैलेश बलकवडे, मुख्य कार्यकारी अधिकारी संजयसिंह चव्हाण, महापालिका प्रशासक डॉ. कादंबरी बलकवडे, इचलकरंजी महापालिका प्रशासक सुधाकर देशमुख, अप्पर जिल्हाधिकारी संजय शिंदे, निवासी उप जिल्हाधिकारी भगवान कांबळे यांच्यासह सर्व संबंधित विभाग प्रमुख उपस्थित होते. चंद्रकांत पाटील म्हणाले की, अमित शहा 19 फेब्रुवारी रोजी ते छत्रपती शिवाजी महाराज पुतळा, राजर्षी शाहू महाराज पुतळा या ठिकाणी जाऊन अभिवादन करणार आहेत.

# महाविकास आघाडी म्हणून सर्वांनी काम करा : अजित पवार

आधुनिक केसरी न्यूज




**पुणे :** चिंचवड विधानसभा पोटनिवडणूक ही पिंपरी-चिंचवड शहराच्या परिवर्तनाची नांदी असेल. चिंचवड विधानसभा पोटनिवडणुकीत यश आलेच पाहिजे, असे राज्याचे विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी पदाधिकाऱ्यांना ठणकाहून सांगितले. ते पिंपरी-चिंचवडमध्ये पदाधिकाऱ्यांच्या बैठकीत बोलत होते. यावेळी आमदार सुनील शेळके, शहराध्यक्ष अजित गव्हाणे, महिला शहराध्यक्ष कविता आल्हाट, माजी शहराध्यक्ष संजोग वाघेरे, उमेदवार नाना उर्फ विठ्ठल काटे, प्रथम आमदार विलास लांडे, आदी उपस्थित होते. आपापसातील मतभेद विसरून कामाला लागा. महाविकास आघाडी म्हणून सर्वांनी काम करा, विजय आपलाच होईल, असे आवाहन अजित पवार यांनी पदाधिकाऱ्यांना केले.

अजित पवार म्हणाले की, पुण्यात काँग्रेसच्या उमेदवाराने उमेदवारी अर्ज पाठीमागे घेतला आहे. तसा प्रयत्न आपण चिंचवड विधानसभेत करणार आहोत. उद्या उमेदवारी अर्ज पाठीमागे घेण्याचा दिवस आहे. उद्या चिंचवड विधानसभा पोटनिवडणुकीचे चित्र स्पष्ट होईल. आपल्याला महाविकास आघाडीचा उमेदवार निवडून आणायचा आहे. त्याकरिता काँग्रेस, शिवसेना, राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांनी स्वतःला झोकून दिले पाहिजे, असे आवाहन त्यांनी पदाधिकाऱ्यांना केले.

अजित पवार पुढे म्हणाले की, स्वतः शरद पवार चिंचवड पोटनिवडणुकीवर लक्ष ठेवून आहेत. तसेच, माझेदेखील या निवडणुकीवर बारीक लक्ष असणार आहे. आपल्या हातात केवळ १८ दिवस असून, आपल्याला १८ तास काम करायचे आहे. निवडणुकीची जबाबदारी समजून घ्या, मेहनतीने ही निवडणूक सोपी होईल. अनेकदा उमेदवारी मागण्याचा अधिकार कार्यकर्त्याला असतो. वरिष्ठांनी आदेश दिल्यानंतर त्याचे पालन झाले पाहिजे. गद्दारी होता काम नये. ही निवडणूक आपल्याला जिंकायची आहे. २५ वर्षे झालीत पिंपरी-चिंचवड शहराची एकहाती सत्ता होती. माझे पिंपरी-चिंचवड शहरावर नेहमीच प्रेम राहिले आहे. शहराचा विकास व्हावा ही माझी प्रामाणिक इच्छा असते, तसे नेहमी झुकते माप दिले. सहानुभूती नाही, तर विकासाच्या मुद्यावर ही निवडणूक लढली पाहिजे.

पिंपरी-चिंचवडचा विकास हाच आमचा ध्यास आहे . नाना काटे यांना उमेदवारी देताना तोडीस तोड उमेदवार होते . पण, त्यांनी पिंपळे सौदागरचा कायापालट केला आहे . त्या परिसरात चांगला विकास केला आहे . म्हणून त्यांना उमेदवारी दिली . पिंपळे सौदागर हे रोल मॉडेल आहे . प्रचारासाठी अनेक नेते मंडळी येतील . मला चिंचवड विधानसभा पोटनिवडणुकीत यश आलेच पाहिजे, असे अजित पवार यांनी ठणकाहून सांगितले .

नवीन वर्षाचा संकल्प करा
आरोग्याची काळजी हा मंत्र खरा

- घाऊक आणि किरकोळ
- किराणा, सुका मेवा, मसाले
- क्रॉकरी, घरगुती उपकरणे
- प्लास्टिकच्या वस्तू आणि बरेच काही
- घर साफ करणारे साहित्य, स्टील आणि अॅल्युमिनियम

शहरातील एक विश्वसनीय सुपर मार्केट

महावीर घर संसार



सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738

रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117

व्हॉट्सअप ऑर्डर आणि कोणतीही ऑर्डर 9850017181

वितरण स्थिती 9021395308 9657398232

घाऊक चौकशी 7620111118 9527111185

www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, औरंगाबाद

प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, औरंगाबाद

# देव तारी त्याला कोण मारी

आधुनिक केसरी

सोमवारी आलेल्या विनाशकारी भूकंपात तुर्की अन् सीरिया उद्धवस्त झाले आहेत. या भूकंपाची विदारक दृश्ये समोर आली आहेत. अजूनही तुर्की सावरलेले नसून चहुकडे मृतदेहांचा खच दिसून येतोय. याठिकाणी शिपिंग कंटेनरच्या क्षेत्रातही मोठे नुकसान झाले आहे. आतापर्यंत तुर्की आणि सीरियात सहा हजारांहून अधिक जणांचा मृत्यू झालाय. तुर्की आणि सीरियात भूकंपामुळे मृत्यूचा आकडा 32 हजारांवर जाण्याची शक्यता जागतिक आरोग्य संघटनेने व्यक्त केली आहे. भूकंपाच्या धक्क्याने तुर्की आणि सीरियातील घरे, इमारती पत्त्याच्य बंगल्यासारख्या कोसळल्या आहेत. अनेकजण ढिगाऱ्याखाली अडकलेत. इतक्या मोठ्या नैसर्गिक संकटातही एका नवजात बाळाचा जीव वाचलाय.. म्हणतात ना... देव तारी त्याला कोण मारी... या म्हणीचा प्रत्यय आलाय. ढिगाऱ्याखालून चिमुकलीला वाचवतानाचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होतोय... या भूकंपामध्ये त्या चिमुकल्याचे आई आणि वडील यांचा मृत्यू झालाय. पण ढिगाऱ्याखाली अडकलेल्या बाळाचा जीव वाचलाय. भूकंपामुळे तुर्की आणि सीरियात अनेक इमारती पत्याच्या बंगल्यासारख्या कोसळल्या आहेत. ढिगाऱ्याखाली अडकलेल्या लोकांचा जीव वाचवण्याचे शर्थीचे प्रयत्न सुरु आहेत. अनेकजणांचे मृतदेह ढिगाऱ्याखालून काढण्यात येत आहेत. संपूर्ण सीरिया आणि तुर्कीमध्ये दुःखाचे अन् भीतीचं वातावरण आहे. ढिगाऱ्याखाली नवजात बाळाला वाचवण्यात यश आलेय. याचा एक व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होतोय. ढिगाऱ्याखालून बाळाला वाचवतानाचा हा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झालाय. बचावपथकातील जवान मलब्याखालून बाळाला वाचवत असल्याचे व्हिडीओत दिसतेय. होशांग हसन यांनी हा व्हिडीओ पोस्ट केलाय. अल्पवधीतच या व्हिडीओला सोशल मीडियावर लाईक्स अन् कमेंट्सचा पाऊस पडलाय. होशांग हसन याने आपल्या ट्वीटमध्ये म्हटलेय की, ढिगाऱ्याखालून एका गर्भवती महिलेला वाचवण्याचा प्रयत्न केला जात होता. त्याचवेळी त्या बाळाचा जन्म झाला. हसनच्या या व्हिडीओला नेटकऱ्यांनी कमेंट्स आणि लाईक्सचा पाऊस पाडलाय. पाच सेकंदाच्या या व्हिडीओला हजारो लोकांनी पाहिले.

# कुशल मनुष्यबळ आणि श्रीमंतांचे स्थलांतर



मच्छिंद्र ऐनापुरे
जत, जि. सांगली

आधुनिक केसरी

**आपल्या देशात कुशल मनुष्यबळाची वानवा नाही,पण त्यांच्या कामाचे इथे चीज होत नाही. त्यांना हव्या तशा सोयीसुविधा उपलब्ध होत नाही. देशप्रेम म्हणून भारतातच राहून देशातल्या लोकांची सेवा करावी, असे वाटणाऱ्या कुशल लोकांना शासकीय पातळीवर अनेक अडचणींना तोंड द्यावे लागते. कुठली गोष्ट सरळ्याने होत नाही. खाबुगिरीने तर देशाची बदनामी अख्ख्या जगात करून टाकली आहे. त्यामुळे अनेक कुशल तरुण असतील किंवा शास्त्रज्ञ,त्यांना आपल्या कामाची, ज्ञानाची देशाला किंमतच नाही, असे म्हणून ही मंडळी परदेशात स्थलांतर करतात. काही लोक इतरांच्या भारतातल्या अनुभवाचा धांडोळा घेऊन तिथेच स्थायिक होण्याचा निर्णय घेतात. काहीजण परदेशात संधी मिळाल्यावर पैसा महत्त्वाचा समजून परदेशच आपला देश समजून तिथेच राहतात.त्यामुळे आपल्या देशातल्या कुशलतेचा लाभ आपल्या देशाला न होता,त्याचा फायदा इतर देशांना होतो आणि पर्यायाने हे देश आणखी प्रगती करत यशोशिखर गाठतात. आपण मात्र जिथल्या तिथे थांबलो असल्याचे दिसते. ही खरे तर आपल्या देशाची शोकांतिका आहे.**

परदेशात गेलेल्या लोकांचा आपल्या देशाला उपयोग व्हावा आणि त्याने यासाठी परदेशातले शिक्षण पूर्ण करून मायदेशी परतावे म्हणून आपल्या देशातल्या सत्ताधारीमंडळीकडून फारसे प्रयत्न झालेले दिसत नाही. त्यांना देशात लागणाऱ्या सुविधा उपलब्ध करून देण्याच्याबाबतीत तर न बोललेच बरे! याबाबत आपला देश किती गांभिर्य घेतो आहे,याची कल्पना येईल. आता तर आपल्या देशातले अतिश्रीमंत लोकदेखील परदेशात जाऊन स्थायिक होऊ लागले आहेत. गेल्या काही वर्षात ही आकडेवारी वाढतच चालल्याने ही गोष्ट मोठी चिंता करण्यासारखी आहे, हे लक्षात घेतले पाहिजे.न्यू वर्ल्ड वेल्थच्या अहवालानुसार गेल्यावर्षी भारतातील सात हजार कोट्यधीशांनी आपले बस्तान परदेशात बसवले आहे. 2015 मध्ये हीच आकडेवारी चार हजार होती. या अहवालात 2017 मध्ये चीनमधील दहा हजार अतिश्रीमंत लोक अन्य देशात जाऊन स्थायिक झाल्याचे म्हटले आहे. आपल्या देशाचा चीन नंतर दुसरा क्रमांक आहे.

चीन आणि भारत या देशांव्यतिरिक्त अन्य देशांपैकी तुर्कस्थानमध्ये सहा हजार,ब्रिटन-फ्रान्समध्ये प्रत्येकी चार हजार, रशियात तीन हजार अतिश्रीमंत व्यक्ती परदेशात स्थायिक झाल्या आहेत. स्थलांतराच्या कलानुसार भारतातील सर्वाधिक संपत्ती असणाऱ्या व्यक्तींची पसंती अमेरिका, संयुक्त अरब अमिराती, कॅनडा, ऑस्ट्रेलिया आणि न्यूझिलंडला आहे. तर चीनमधले अतिश्रीमंत लोक अमेरिका,कॅनडा आणि ऑस्ट्रेलियात जाण्याचे प्रमाण अधिक आहे. ज्या देशातले लोक स्थलांतरित आहेत,ते लोक त्यांच्या देशातले जीवनमान सुधारल्यावर पुन्हा माघारी परततील, असा विश्वास अहवालात व्यक्त करण्यात आला आहे. अतिश्रीमंत व्यक्तींचा सर्वात जास्त ओघ 2019 मध्ये ऑस्ट्रेलियात होता. याठिकाणी दहा हजार धनवानांचे स्थलांतर झाले आहे. सलग तीन वर्षे अमेरिकेला पाठीमागे टाकून ऑस्ट्रेलियाने हा मान मिळवला आहे. न्यू वर्ल्ड वेल्थच्या अहवालानुसार श्रीमंत देशांमध्ये भारत सहाव्या क्रमांकावर आहे. देशाची एकूण मालमत्ता आठ हजार 230 अब्ज डॉलर एवढी आहे. तसेच देशात तीन लाख 30 हजार 400 अतिश्रीमंत व्यक्ती आहेत. त्यांची वैयक्तिक मालमत्ता दहा लाख डॉलर आहे. या गटात जगात भारताचा नववा क्रमांक आहे. देशात 20 हजार 739 कोट्यधीश आहेत. भारतीय अब्जाधीशांची संख्या 116 असून अमेरिका आणि चीननंतर भारत यात तिसऱ्या क्रमांकावर आहे. जगातील 70 टक्के संपत्तीही एक टक्के लोकांच्याकडे आहे. तीच परिस्थितीत आपल्या देशाचीही आहे. आपला देश महासत्ता बनण्याकडे वाटचाल करीत असल्याचे म्हटले असले तरी प्रत्यक्षात आपल्या देशातले अतिश्रीमंत आणि बुद्धीवान,कुशल लोक परदेशात जाऊन स्थायिक होत असताना देश महासत्ता होण्याचा दावा, कशाच्या आधारावर केला जात आहे कळत नाही.

देशात महागाई आवाक्याच्या बाहेर जात आहे. पेट्रोल-डिझेलचे भाव लोकांचे आर्थिक कंबरडे मोडत आहे. रोजगार मिळत नसल्याने तरुण अस्वस्थ बनला आहे. त्यातच आहे त्या सरकारी नोकरीतील पदे गोठवण्याचे काम चालले आहे. महाराष्ट्रात सध्या 30 टक्के सरकारी विविध कार्यालयातील पदे रिक्त आहेत. त्यामुळे उर्वरित कर्मचाऱ्यांमध्येही अतिकामाचा ताण पडत आहे. कुठल्याच विभागात भरती प्रक्रिया होत नसल्याने तरुण वर्ग पार बावचाळून गेला आहे. उद्याला आपले भविष्य काय आहे,याचा विचार सध्या त्यांच्या डोक्यात आहे. कुशल मनुष्यबळ आणि श्रीमंत लोक परदेशात स्थलांतर करीत असेल तर या देशात नेमके राहणार कोणते लोक? एकाद्या शाळेतील हुशार मुले दुसऱ्या शाळेत गेल्यावर त्या शाळेचा दर्जा काय राहणार, असा सवाल जसा शिक्षकांना पडतो, तसाच प्रश्न यामुळे जाणकारांना पडल्यास नवल नाही. आपल्या देशात उद्योजक,व्यावसायिक यांच्याकडून राजकीय,गुंड लोकांकडून खंडणी मागण्याचा प्रकारदेखील वाढला आहे. प्रत्येक राजकीय पक्ष पक्षनिधीसाठी या लोकांच्या मागे लागतात. अर्थात ही श्रीमंत मंडळी खंडणी किंवा देणगी देताना स्वतःचा लाभ मात्र करून घेतात. राजकीय पक्षदेखील सत्तेवर आल्यावर त्यांना वेगवेगळ्या माध्यमातून उद्योजक,व्यावसायिक यांचे भले करून देतात. यात त्यांच्या पदरचे काही जात नाही. जनतेची संपत्ती उदार मनाने अशा लोकांना देऊन आपले घर तर भरून घेतातच शिवाय श्रीमंतांच्या तिजोरीतही संपत्तीची भर घालतात. त्यामुळे श्रीमंत आणखी श्रीमंत बनत चालला आहे.

सध्याचे सत्ताधारी मोदी सरकार आणि यापूर्वीची सरकारे या स्थलांतराकडे लक्षच दिले नाही. त्यामुळे परदेशात कायमचे स्थलांतर होण्याचे प्रमाण वाढत चालले आहे. यामुळे आपल्या देशाचे किती नुकसान होत आहे,याचा अंदाजच घेतला जात नाही. हा प्रकार असाच चालू राहिला तर आपल्या देशात मग काय फक्त कचराच शिल्लक राहणार का? आणि या कचऱ्याचे शेवटी करायचे काय? आधीच आपण इतर देशांकडून इलेक्ट्रोनिक वगैरे कचरा आयात करत आहोतच.त्यात भारतातला या निर्बुद्ध कचऱ्याची भर. त्यामुळे आपला देश कचऱ्यांचा देश म्हणून ओळखला जावा, असे राजकारण्यांना वाटते की काय कोण जाणे! आपल्या देशातल्या कुशल मनुष्यबळाचा लाभ आपल्या देशाला व्हायला नको का? श्रीमंत लोक आपला देश सोडून गेल्यावर त्यांचे उद्योग,त्यांचे व्यवसाय हेदेखील उद्या एक ना एक दिवस ते बंद करून तिकडे सुरू करतील. त्यामुळे आपल्या देशात आणखी बेरोजगारी वाढणार आहे. लोकांच्या नोकऱ्या जाणार आहेत. काही वर्षांनी मोठी भयावह परिस्थिती निर्माण होईल, याकडे कोणी लक्ष देणार आहे की नाही?



# जागतिक दर्जाचे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र.: ९९२२५४६२९५

आधुनिक केसरी

**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ हे भारतातीलच नाही तर जगातील एक नावाजलेले विद्यापीठ आहे. या विद्यापीठाची स्थापना १० फेब्रुवारी १९४९ रोजी झाली म्हणजे आज हे विद्यापीठाला ७४ वर्ष पूर्ण होऊन ७५ व्या वर्षात पदार्पण करीत आहे. डॉ एम आर जयकर हे या विद्यापीठाचे पहिले कुलगुरू होते. स्थापनेनंतर १२ जिल्ह्यांमध्ये उच्च शिक्षणाच्या विविध सुविधा पुरवण्याची जबाबदारी पुणे विद्यापीठावर होती. १९६४ मध्ये कोल्हापूर येथे छत्रपती शिवाजी विद्यापीठाच्या स्थापनेनंतर पुणे, नाशिक, धुळे, जळगाव या जिल्ह्यांमधील विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठाचे कार्य सुरू झाले.**

१९९० साली जळगाव येथे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाची स्थापना झाल्यानंतर पुणे, नगर, नाशिक या जिल्ह्यांसह दादरा नगर हवेली या केंद्रशासित प्रदेशातील महाविद्यालये या विद्यापीठाच्या मार्गदर्शनाखाली काम करीत आहेत. २०१४ साली या विद्यापीठाचा सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ असा नामविस्तार करण्यात आला. पुण्यातील गणेशखिंड रस्त्यावर पुणे विद्यापीठाचे मुख्य संकुल आहे. विद्यापीठाची मुख्य इमारत पुणेकरांसाठी शैक्षणिक अस्मितेचे प्रतीक आहे. ही इमारत ब्रिटिश गव्हर्नरांच्या पुण्यातील मुक्कामासाठी एकोणिसाव्या शतकात बांधण्यात आली होती. इटालियन शैलीत बांधण्यात आलेली ही इमारत म्हणजे पुण्याला मिळालेला ऐतिहासिक वारसा आहे. विद्यपीठाचा परिसर सुमारे ४९० एकराचा असून त्यात अनेक दुर्मिळ सुंदर आणि अतिशय मनमोहक असे वातावरण लाभले आहे. घनदाट जंगल, शोभिवंत हिरवळ, दुर्मिळ ब्रिटिशकालीन कारंजे व ऐतिहासिक अशी ब्रिटिशकालीन भव्य इमारत यामुळे हा परिसर निसर्गप्रेमी चित्रपट निर्माते, दिग्दर्शक यांचे आकर्षण केंद्र राहिला आहे. पुणे विद्यापीठात दुर्मिळ तसेच सावली देणारे मोठे वृक्ष आहेत. या वृक्षांची छाया, सौंदर्य आणि उत्साह निर्माण करणारे वातावरण विद्यार्थ्यांना अभ्यास व संशोधन करण्यास प्रोत्साहित करते. विद्यापीठातून विविध पदव्युत्तर विभाग व प्रशासकीय कार्यालयाचे कामकाज चालते. या विभागातून आज जवळपास ६ लाख विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. ४२ शैक्षणिक विभाग, १२ आंतरविद्या शाखा व सेवा युनिट, २० अध्यासने, ८ राष्ट्रीय व प्रादेशिक केंद्र आहेत. ६९६ संलग्न महाविद्यालये, २८७ मान्यताप्राप्त व्यवस्थापन संस्था, १२१ मान्यताप्राप्त संशोधनकेंद्र विद्यापीठाशी संलग्न आहेत. विद्यापीठातील विविध विभागात ६० हुन अधिक देशातील विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. आपल्या विद्यार्थ्यांना परदेशी विद्यापीठातील अभ्यासक्रमाचेही फायदे व्हावेत यासाठी गेल्या काही काळात विद्यापीठाने परदेशातील नामांकित विद्यापीठांसोबत सामंजस्य करार केले आहेत. विद्यापीठाचे पहिले कुलगुरू डॉ जयकर यांच्या नावाने ओळखले जाणारे जयकर ग्रंथालय केवळ विद्यार्थ्यांनाच नाही तर विद्यापीठाबाहेरील संशोधक व अभ्यासकांनाही खेचून आणते. जयकर ग्रंथालय हे माहिती आणि संदर्भ ग्रंथासाठी भारतातीलच नव्हे तर जगातील जगातील सर्वोत्कृष्ट ग्रंथालयांपैकी एक आहे. जयकर ग्रंथालयात भारतीय व विदेशी मासिके घेतली जातात तसेच ग्रंथालयात काही नियतकालिके मोफत मिळतात. जयकर ग्रंथालयात ५ लाखांहून अधिक पुस्तके व विविध विषयांवरील मासिके आहेत. अशा सुविधांमुळेच सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ राज्यातीलच नव्हे तर देशातील विद्यार्थ्यांच्या पहिल्या पसंतीचे विद्यापीठ आहे. पुणे विद्यापीठ ज्ञानाची निर्मिती, संरक्षण आणि प्रसारण करणारे जागतिक दर्जाचे विद्यापीठ आहे.



हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# संसदेत भ्रष्टाचाराच्यावरून जंग !



कमलाकर जोशी
ज्येष्ठ पत्रकार, नांदेड
संपर्क क्र. 9422170850

आधुनिक केसरी

**भारताच्या संसदीय अर्थसंकल्पीय अधिवेशनापूर्वीच अमेरिकेतील 'हिंडनबर्ग रिचर्स'संस्थेचा उद्योगपती गौतम अदानी समुहाच्या कथित घोटाळ्याचा अहवाल येतो.याच विषयावरुन संसदेत काँग्रेस पक्ष आक्रमक होतो,गोंधळ घालतो.पक्षाचे नेते राहुल गांधी यावरून अडानी व पंतप्रधान मोदींना लक्ष्य करतात,हे सुनियोजित घडते आहे.संसदेत अडानी विषयावरून काँग्रेस व भाजपात 'युध्द' छेडले गेले.पण पंतप्रधान मोदी यांनी काँग्रेसच्या,तथ्यहीन आरोपाचा समाचार घेतलाच.काँग्रेसवर शब्दांचे असे शस्त्रे डागले की,काँग्रेस पक्षच घायाळ झाला. यात गांधी यांनी पंतप्रधान मोदी यांचेवर आरोप करून स्वत: ला व काँग्रेस पक्षाला संकटात टाकले आहे.**

भारतील लोकशाहीत सत्ताधारी व विरोधी पक्ष तितकाचा महत्वाचा आहे.सत्ताधारी सरकारवर विरोधी पक्षाचा अंकूश असला पाहिजे, तरच लोकशाही टिकते.लोकशाहीत विरोधी पक्ष सक्षम व जिम्मेदार असावा लागतो.केंद्रात २०१४ मध्ये मोदी सरकार आल्यानंतर काँग्रेस पक्षाने भाजपा सरकार विरोधात अनेक आरोप केले.'चौकीदार चौर है' का नारा दिला होता,त्याचे काय झाले.तरी पण २०१९ मध्ये जनतेने भाजपाला बहुमताने सत्तेत आणले. आता २०२४ मध्ये देशात सार्वत्रिक निवडणूक होणार आहेत.तेंव्हा कोणत्याही परिस्थितीत मोदी व भाजपा सरकारला घालविता आले पाहिजे,यासाठी देशातील विरोधी पक्ष विविध हातखंडे, कारस्थान रचत आहे.कारण विरोधी पक्षाला भाजपा व मोदी सरकारची देशाची आर्थिक प्रगती व जगात मोदींची वाढती लोकप्रियता खटकत आहे. विरोधी पक्षाला मोदी सरकारला घेरण्यासारखा अजून तरी मुद्दा सापडलेला दिसत नाही.उलट जगात भारताची अर्थव्यवस्था अधिक मजबूत होत चालली आहे. याचा त्यांना विरोधी पक्षाला देशाचा अभिमान वाटत नाही.काँग्रेस पक्षाने नेते हिंदु व्देष,जातआणि भ्रष्टाचारावरून अनेक आरोप केले.तरीही भारतातील जनता प्रक्षोभ होऊन मोदी सरकारच्या विरोधात रस्त्यावर उतरत नाहीत.त्यामुळे विरोधी पक्ष बिथरला आहे! काँग्रेसच्या ५२ वर्षे सत्तेत असताना घोटोळे केले, देशाला लुटले,हे जनतेला माहित आहे. त्यात गांधी परिवराची प्रतिमा भ्रष्टचाराने डागाळलेली आहे. त्यामुळे भारतीयांचा काँग्रस पक्षावर विश्वास राहिला नाही. राजकारणात मोदी व उद्योजक व्देषाची सीमा ओलांडली आहे. कारण भारताच्या अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू होण्यापूर्वी बी.बी.सी.चा गुजरात दंगलीवरचा माहितीपट,त्यानंतर लगेच "हिंडनबर्ग रिचर्स' संस्थेचा उद्योगपती अदानी समुहातील तथाकथित घोटाळ्याचा अहवाल २४ जानेवारी २०२३ रोजी प्रसिध्द येतो. हा योगायोग नाही.या प्रकरणात देशातील राष्ट्रविरोधी शक्तींनी या विदेशी कंपनीला हाताशी धरून कुंभाड रचलेले गेले आहे. यापूर्वी काँग्रेसने राफेल खरेदीतील भ्रष्टाचारपेगासेस'च फोन टेपींग,आदी अशी अनेक प्रकरणे उकरून काढली. यातून निष्पन्न काय झाले? यात प्रकरणाला सर्वोच्च न्यायालयाने सरकारला "क्लिनचीट' दिली.पण आता भारतीय संसद विदेशी संस्था व वृत्तपत्रांचा वृत्ताच्या आधारावर चालणार आहे काय?ही परंपरा संसदेत चालणार आहे काय ? हे राष्ट्राच्याहिताचे आहे काय?हा प्रश्न विरोधी पक्षाला प्रश्न विचारत आहे. 'हिंडनबर्ग ही रिचर्स' नावाची संस्था अमेरिकेतील आहे. हिंडनबर्ग नावाचे भले मोठे विमान होते ,ते १९३७ मध्ये अपघात कोसळले.यातील ९७पैकी ३७ जण मृत पावले. या 'हिंडनबर्ग' या विमानाचे कंपनीला नाव देण्यात आले आहे.ही कंपनी "नेट अँडसन' व्यक्तीने १९२० मध्ये स्थापना केली आहे. ही कंपनी गुप्त माहितीच्या आधारावर कंपन्याचे संशोधन करून अहवाल सादर करत असते,असा दावा करते. या कंपनीकडे उद्योग क्षेत्रातील व शेअर्स बाजारातील तज्ज व्यक्ती नाहीत. कंपनीकडे आज केवळ नऊ कर्मचारी आहेत. या बोगस कंपनीचे संचालक कोण आहेत? याची कमाई काय आहे? याची अमिरेकेतील एफ.बी आय. ही यंत्रणा चौकशी करत आहे. ही कंपनी आंतरराष्ट्रीय कंपन्याचे लक्ष्य करण्यासाठी नकारात्मक अहवाल देत असते. ही कंपनी धमकी व ब्लॅकमेल करून कोट्यवधीची कमाई करत असते,अशी या कंपनीची ख्याती आहे. या कंपनीने आतापर्यंत १६ कंपन्यांचे नकारात्मक अहवाल दिलेले आहेत. प्रथम या कंपनीने







अमेरिकेच्या "निकाला' कंपनीवर हल्ला केला होता. या कंपनीच्या असाच नकारात्मक अहवाल दिला होता. त्यात अनेक खोटे प्रश्न उपस्थित केले गेले होते. यामुळे कंपनीचे ८० टक्के शेअर्समध्ये कोसळले होते. या कंपनीच्या विरोधात गुन्हे दाखल झाले आहेत. तसेच न्यायालयात बदनामी केल्याचे अनेक खटले चालू आहेत.इतकेच नव्हे, जगातील उद्योग क्षेत्रातील माहिती देणाऱ्या नामांकित "फोर्ब्स' पत्रिकेने तर हिंडनबर्ग या कंपनीला 'पुंजी हंटर्स' असे म्हंटले आहे.अशा बदनाम तथ्यहीन अहवाल देणाऱ्या कंपनीने भारतातील गौतम अदानी उद्योग समुहात तथाकथित शेअर्स घोटाळा झाल्याचा अहवाल दिला आहे.या कंपनीच्या कारस्थानाचे धागेदोरे भारतात सापडतील.भारतात शेअर्सवर बाजारावर देखरेख करणारी १९८८ मध्ये( SEBI ) 'सीबी' साररखी स्वतंत्र सर्वोच्च संस्था स्थापन झाली आहे.यात एल आय.सी.व स्टेट बँके इंडियाने अदानी समुहाला जे कर्ज दिले आहे. हे कर्ज रिझर्व्ह बँकेंच्या मापदंडानुसारच दिले आहे. तेंव्हा संस्थाचे कोणतेही नुकसान होणारे नाही,असे स्पष्टीकरण दिले आहे.या कोणत्याही संस्थेचे काँग्रेसवर विश्वास नाही.केवळ संसदीय चौकशी समिती स्थापन करण्याचा आग्रह धरत आहे. काँग्रेस सत्तेत असताना अरबो -खरबो रूपायांचे गबन केलेले आहे. याची यादी फार मोठी आहे.खुद गांधी परिवारावर नेशॅनल हेराल्ड प्रकरणात करोडाची संपत्ती हडप केल्याचा आरोप आहे.यात परिवार जामीनावर आहे. पण काँग्रेस पक्षाला या प्रकरणाची चौकशी नकोय? इडी,सी.बी.आय,निवडणुक आयोग,कोणत्या संस्थेवर विश्वास नाही. माजी पंतप्रधान पी. व्ही नरसिंहराव यांच्या कारकिर्दीत १९९१ -९२ च्या काळात हर्षद मेहता यांचे शेअर्सच्या ४ हजार ५०० घोटाळ्याचे प्रकरण देशाचे गाजले होते. तेंव्हा नेत्याला १ कोटी रुयायांची सुटकेस दिली,असा आरोप झाला होता.हा शेअर्स घोटाळा भारतातील महिला पत्रकार सुचिता दलाल यांनी शोध पत्रकारितेतून उजेडात आणलेले होते.इतकेच नव्हे,काँग्रेस राजवटीत कांही उद्योगपतींना बँकानी कर्ज देण्यासाठी तत्कालिन अर्थमंत्र्यांनी दबाब आणल्याचे पुरावे संसदेत दिले गेले होते. काँग्रेस सरकारच्या काळात उद्योजकांना मोठ्या प्रमाणात कर्ज दिले. यातील २७ उद्योजक देश सोडून गेले. यापैकी सात जणांना रेड कॉर्नर नोटीस बजावली आहे. काही जणावर आर्थिक गुन्हे दाखल करून त्यांची संपत्ती जप्त केली जात आहे. विदेशात पळालेल्या उद्योजकांना भारतात परत आणण्यासाठी प्रत्यार्पण करणे किचवट आहे,देशातून पलायन केलेल्या अश्या लोकांना भारतात आणण्यास विलंब होतो आहे. यात विजय माल्या, निरव मोदी यांचे विरोधात भारतात आणण्याचे प्रयत्न चालू आहेत. काँग्रेस सरकारने २००४ ते २०१४ या काळात भारतीय चलनातील नोटा छपाईचे व त्यातील सुरक्षा रंगीत धागा टाकण्याचे कंत्राट ब्रिटीश कंपनी 'डेलारू' कंपनीला दिले होते.याच सरकारने कंत्राट रद्द करून कंपनीला काळ्यायादीत टाकले होते.तरीही त्याच कंपनीला पुन्हा कंत्राट देण्याचा प्रकार घडला.या प्रकरणात माजी अर्थ सचिव अरविंद मायाराम यांचेवर सी.बी.आय. ने नुकतीच धाड टाकली,याची चौकशी चालू आहे. हीच कंपनी पाकच्या चलनाच्या छपाईचे काम करत होती. काँग्रेस या प्रकरणाचा विरोध केला,मायारामचे समर्थन केले.तेंव्हा पाकने भारतीय बनावट मोठ्या प्रमाणात करण्याचा योजना आखली होती. मोदी सरकारने नोटाबंदीचा २०१६ निर्णय घेतला. त्यामुळे पाकचे व अतिरेकी संघटनेचे भारतीय अर्थव्यवस्था उध्वस्त करण्याचे जे मनसुबे रचले होते,ते पार धुळीला मिळाले. देशातील नोटबंदीला ७ वर्षे झाली. करोनाचे मोठे संकट आले, तरीही भारताची अर्थव्यव्था मजबूत व पाचव्या क्रमांकावर आहे. संसदेत प्रथम देशाच्या राष्ट्रपतीच्या अभिभाषणावर प्रथम आभार व्यक्त करण्याची परंपरा आहे. सरकारच्या केलेल्या निर्णयावर व उणीवांचा उल्लेख करता येतो. काँग्रेसचे नेते राहूल गांधीनी संसदेचे नियम,मर्यादा धुळीला मिळवत राजकारणासाठी वापर केला. त्यांनी संपूर्ण भाषणात अदानीला व मोदींना लक्ष्य केले गेले.त्याचे म्हणणे, ३० मार्च २०१४ ला अदानीची संपत्ती ५.१० डॉलर होती.आज ती १३७ डॉलर झाली आहे. श्रीमंत यादीत जी व्यक्ती ६०९ क्रमांकावर होती. आता ती दुसऱ्या क्रमांकावर पोहचली कशी? केवळ मोदींच्या जादुमुळे अदानी हे सर्वच क्षेत्रात घुसखोरी करत आहेत. अदानींना देशात व आंतराष्ट्रीय कंत्राटे मोदीमुळेच मिळाली आहेत. यातून 'भाजपा'ला किती पैसा मिळाला? आदी गंभीर आरोप करत त्यांनी प्रश्न विचारले. पणसंसदीय नियमानुसार वैयक्तीक आरोप करताना प्रथम नोटीस,व पुरावे सादर करावे लागतात, यावेळी संसदेत तथ्यहीन आरोप व दुरूपयोग केला गेला,अशी टिप्पणी अध्यक्ष बिर्ला यांनीही टिप्पणी केली आहे. गांधी जेंव्हा भाषणात मोदींचे नाव घेत आरोप होते. तेंव्हा काँग्रेसचे नेते आधीर रंजन व पक्षाचे इतर सदस्य आंनदात ओरडत व टेबल वाजवत होते.पण जेंव्हा भाजपाने सदस्य निशीकांत दुबे, स्मृती इराणी यांनी गांधी परिवाराचे नाव घेत घोटाळे व जमीन हडप्प करण्याचे उदाहरणासह निशीकांत दुबे,स्मृती इराणी यांनी मांडले. तसेच माजी कायदामंत्री नेते रविशंकर प्रसाद यांनी गांधी आरोपाचा खरपूस समाचार घेतला. त्यांनी २००८ ' २०१० व २०११ मध्ये अदानी यांना मलेशिया अस्ट्रेलिया,आदी देशात खाणीचे कंत्राटे काँग्रेसच्या सरकारच्यावेळी दिली गेली. तसेच राजस्थानमध्ये अदानी समुह ६५ हजार कोटीची गुंतवणूक करत आहे,तेथेही कमीशन वरून समझौता झाला आहे का?पंतप्रधानासोबत उद्योगपती सोबत जात असतात. देशातील उद्योगपतींना इतर देशात कंत्राटे दिली जात असतील तर काँग्रसला अभिमान वाटला पाहिजे. देशात ठराविक वैयक्तीक व्देषातून विरोध करण्याच्या भ्रष्टाचाराचे कांड म्हंटले जात आहे. काँग्रेसचे खरे दुःख असे की,मोदी सरकारच्या काळात "कमीशन खोरीचा' धंदा बंब झालेला आहे, त्यांनी मर्मावर बोट ठेवले मंत्री किरेन रिजुजी यांनी तर गांधी संसदीय कोणतेही मर्यादा नियम पदयात्रा करून शिकले नाहीत.अदानी यांचेबरोबर वाड्रा, राजस्थानचे मुख्यमंत्री गहिलोत व कमलनाथ आदी सोबत छायाचित्र माझ्याकडे आहेत, आम्ही कधी आक्षेप घेतला नाही. काँग्रेस नेते अपयाशाचे खापर भाजपा सरकारवर फोडत आहे, त्यांना भ्रष्टाचार प्रकरणावरून आत्मपरिक्षण करण्याची गरज आहे. पंतप्रधान मोदी यांनी तर काँग्रेसच्या जोरदार!प्र खर चढविला.

काँग्रेस सत्तेत असतात २००४ ते २०१४ च्या महागाई निर्देशांक हा दोन आकड्यात होता,बेरोगाराचा केवळ कायदा केला होता.या काळात अनेक घोटाळे झाले. इतकेच काश्मिर ते कन्या कुमारीपर्यंतचाया शहरात अतिरेकी बॉम्ब स्फोट करत होते. इतकी भीती सामन्य माणसात होती. ज्या काश्विरच्या चौकात तिरंगा फडकविण्याची हिंमत नव्हती, त्या चौकात अतिरेक्याचे आव्हान स्विकारून तेथे आम्ही जाऊन तिरंगा ध्वज फडकविला.आज तेथे कोणीही मुक्तपणे जाऊ शकतो.काँग्रेस पक्षाने गेल्या नऊ वर्षात शिव्या,आरोपाशिवाय काही कांहीच केले नाही. भाजपाच्या प्रत्येक धोरणाचा निर्णयाचा विरोध करत आलेला आहे. पण आज भारत बदला आहे. जग भारताकडे विश्वासाने पहात आहे. देशात सर्व क्षेत्रात प्रगती होत आहे, याचे काँग्रेसला दुःख का वाटावे? देशातील शेतकरी,गरीब कुटंब, महिला, आदिवासी आदी कोट्यवधी गरिबांना आर्थिक मदत, धान्य, औषध, घरे, शौचालय आदी कामे भाजपा काम केले, आहे. मी देशातील परिवाराचा सदस्य आहोत.

हा गरीब माणूस आपल्या खोट्या आरोपावर विश्वास ठेवणारा नाही. गांधींनी हार्वर्ड विश्वविद्यालयात राजकारणाचा विषय शिकण्याचा सल्ला दिला, याचा उल्लेख करत मोदीं म्हणाले, तर हार्वर्ड विश्व विद्यालयात भारतातील काँग्रेस पक्षाचा पराभव विषयावर नुकतेच संशोधन केले जात आहे, असा टोला मारला. त्यांना आत्मपरिक्षणाची गरज आहे. कवी दुष्यंतकुमार यांनी म्हंटले,'तुम्हारे पाँव के नीचे, कोई जमीन नही है,कमाल ये है की फिरभी तुम्हे यकीन नही. असे' म्हणताच सभागृह दणाणून गेले.देशात श्रीमंत,व्यवसायिक,व राजकीय नेत्याची संपत्ती सतत वाढ होत चालली आहे.याबाबत सर्वोच्च न्यायालयाने विचारणा केली भारत हा प्रगतशील देशाला मागे टाकू शकतो,ही ताकद आहे. गांधी,वाड्रा परिवाराची संपत्ती कशी वाढली?भारत खरी भारत यात्रा १९४३ मध्ये नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी काढली होती.आता आधुनिक गांधींना पदयात्रेत बेरोजगार, शेतकरी, कामगार भेटले. त्यामुळेच त्यांना ज्ञान प्राप्त झाले आहे. भारतात सत्तेत असताना ७० वर्षात काँग्रेस पक्षाला एकाही नेत्याला शेतकरी व गरीब माणसाच्या समस्या समजू शकलेल्या नाहीत. पण देशात राहूल गांधी हेच पदयात्रा काढल्याने त्यातून दिव्य ज्ञान प्राप्त करणारे एकमेव नेते असावेत. या पदयात्रेत देश,समाज व्देषी धर्मव्देषी,भानगडबाज माजी वरिष्ठ अधिकारी पदयात्रेतच कसे काय भेटले ? यातील नावे जार्ज पोन्नेय्या, फारूक अब्दुल्ला, इम्रान प्रतापगढी,मेघा पाटकर. स्वरा भास्कर पूजा भट्ट,एस दुलस,अरविंद मायाराम, कन्हैय्या कुमार, प्रशांत भूषण, रिजील मुकट्टी, अभय टिपसे, योगेंद्र यादव,रवीशकुमार आदी मंडळीचा इतिहास तपासावा,म्हणजे कळेल.

हिंडनबर्गच्या नकारात्मक अहवालामुळे अदानी समुहाचे बाजारात शेअर्स कोसळले,यात त्यांना सुमारे ४हजार कोटीचा फटका बसला.यात आडानी विरोधात नसून भारतीय व्यवस्थेवर हल्ला मानला जात आहे. अदानी बुडाले तर देशही बुडेल! हे लक्षात घेतले पाहिजे. कारण देशात केवळ एल,आय,सी. आणि स्टेट बँक आफ इंडिया या दोन आर्थिक संस्था तोट्यात येतील असे नाही.यात भारतात अदानी समुहाने खाद्य पदार्थ, वीज,कोळसा, रस्ते बांधणी, ऑईल व गॅस, विमान सेवा,तसेच विमानतळ उभारणी, सिमेंट उद्योग, बांधकाम त्यात निवासी प्रकल्प,यात कोट्यवधी रुपायांची गुंतवणूक केलेली आहे, हे सर्व बंद पडतील.याचा भारतीय अर्थव्यवस्थेवर, प्रगतीवर, रोजगारांवर मोठा परिणाम होईल, याची भीती वाटते.यावर विरोधी पक्षाने गोंधळ न माजविता भाजपा सरकारला प्रश्न विचारता आला असता. पण काँग्रेसने गांधी परिवाराच्या इशाऱ्यावरुन अदानीचे प्रकरणाचे राजकीय भांडवल केले. काँग्रेस पक्षाने संसदीय समितीमार्फत चौकशीचा आग्रह धरत आहे,यातून निष्पन्न काही होत नाही. यात संसदीय समितीत सर्व पक्षाचे सदस्य असतात,ही समिती चौकशीसाठी कोणत्याही संस्थेला, प्रमुखाला, तकेच पंतप्रधान मोदी यांनी चौकशीसाठी बोलावण्याचा डाव असू शकतो. समितीत बहुसंख्य सरकारचे सदस्य असतात, आतापर्यंत देशात आठ वेळा संसदीय चौकशी समितीची नियुक्त गेली होती.त्यातून पाच वेळा पक्षाचे सरकार गेलेले आहे. अशी समिती प्रथम १९८७ बोफार्स प्रकरणी, १९९२, २००१ २००३, २०११,२०१३,२०१५,आणि २०१६ यात स्टॉक मार्केट, २जी स्पेस्ट्रम, भूमिग्रहण, एन.आर. सी.आदी प्रकरणाबबत होती. पण जेंव्हा सरकारच्या 'टू जी स्पेस्ट्रम' प्रकरणाला क्लीन दिल्याची चोरी सरकारची न्यायालयाने पकडली होती. अदानी प्रकरण सर्वोच्च न्यायलयातगेले आहे, तेथे सुनावणी होणार आहे, काँग्रेस नेते राहूल गांधी खरच देशातील भ्रष्टाचाराची चीड असेल तर त्यांनी मोदी विरोधात पुरावे द्यावेत. पण ते कधीच करणार नाहीत, कारण यांचेकडे सबळ पुरावे नाहीत. केवळ मौखिक माहिती वृत्तातील बातमीचा आधार घेत आरोपाचा हवेत गोळीबार करून भीती दाखवित आहेत, देशात मोदीची बदनामी झाली हाच गांधी परिवाराचा अजेंडा आहे. यासाठी हा खटाटोप केला जातोय! देशातील इतर विरोधी एकत्रपणे साथ देतोय! हे ईडीमुळे घडले आहे. शेअर्स बाजारिवर देखरख करणारी स्वंतत्र वित्तीय संस्था आहे. काँग्रेसचा त्यावर विश्वास का नाही.? देशात उद्योगपतींना काँग्रेसने कर्ज दिले.पण काँग्रेस मज एकट्या अदानींना लक्ष्य का करत आहे? देशातील बँकानी उद्योजकांना कर्ज दिले म्हणून राजकारण होत गेले, तर देशात कोणतही बँक कर्ज देणार नाहीत. याचा परिणाम उद्योग,प्रकल्प उभारले जाणार नाहीत. आज आदानी समुहाचे कंपनीचे शेअर्स काही प्रमाणात वाढले आहेत,पण राजकारणातून उद्योगपतींना लक्ष्य केले गेले, तर देशाच्या विकासाला खीळ बसेल, हा धोका ओळखा!

# शक्तिहिन व्यक्ती उपभोग वस्तू ठरतो म्हणून स्वत:चं सामर्थ्य निर्माण करा

आधुनिक केसरी



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

कार्य हाच आपला परिचय असतो अन्यथा एका नावाने अनेक लोक वावरत असतात. आपण उपभोग वस्तू होता कामा नये एवढ अस्तित्व या सृष्टीत आपलं नक्कीच असलं पाहिजे. स्वतःच अस्तित्व निर्माण करणं हा अंहकार नाही आत्मसन्मान आहे. स्वतःचा आत्मसन्मान स्वतः निर्माण केला पाहिजे वाढवला पाहिजे तो संभाळून टिकवला देखिल पाहिजे. जन्माला येतानाच कोणी गरिब अथवा श्रीमंत म्हणून, राजा म्हणून कोणी प्रधान म्हणून जन्मला येत नाही. अपवादात्मक परिस्थितीत एखाद्या व्यक्ति राजघराण्यात अथवा वडिलोपार्जित श्रीमंत म्हणून जन्माला येऊ शकतो पण वेगवेगळ्या पदव्या, अथवा विविध क्षेत्रातील दिग्गज म्हणून जन्माला येता येत नाही. आपल्यामध्ये असणारी गुण कौशल्य, गुणवत्ता ही वेळेनुसार सिद्ध करावी लागते. जेणेकरून वेळेवर आपलं प्रभुत्व निर्माण होईल आणि आपण यशस्वी होऊन त्या क्षेत्रातील दिग्गज म्हणून पुढे येऊ पण आपण जर काहिच प्रयत्न केले नाही आपली गुणवत्ता सिद्ध केली नाही. आपल कौशल्य विकसित केले नाही तर मग मात्र आपल्याला परावलंबी राहव लागेल. मुळात जन्माला येताना प्रत्येक व्यक्ती संचित घेऊन येतो व आपल्या कर्म नुसार गुण कौशल्य विकसित करत साधनं संपत्ती अर्जित करतो .याच दरम्यान स्वतःच बळ सामर्थ्य पण वाढवतो . मुळात हेच बळ सगळ्यांन मध्ये सारखंच आहे .पण जो प्रयत्न करतो तो यशस्वी होतो. निसर्गाच्या रचनेत जन्माला आलेला प्रत्येक व्यक्ती शक्तिवान बलावान सामर्थ्यशाली आहे. हे विसरून चालणार नाही. जन्मताच आपल्या मध्ये असणार बळ शक्ति सामर्थ्य आपण वेळ काळ आणि परस्थिती नुसार किती प्रमाणात विकसित करू त्यानुसार आपल मुल्यमापन ठरत. सगळ्याच क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करत बळ शक्ति अर्जित करणारा व्यक्ति प्रभावशाली ठरतो. आपला उपभोग वस्तू म्हणून वापर होऊ देयचा नसेल तर आपलं बळ शक्ति सामर्थ्य आपण विकसीत केले पाहिजे. बलहिन व्यक्तीचा लोक उपभोग वस्तू समजुन वापर करतात. स्वतःची ताकद अस्तित्व निर्माण करा मग ते अस्तित्व छोट असेल मोठं असेल कसही असेल पण ते स्वतःच असलं तरच आपलं भविष्य सुरक्षित उज्वल आहे.

आपली मेहनत धडपड प्रचंड कष्ट दैदिप्यमान इच्छा शक्ति चिकाटी जिद्द आणि वारंवार प्रयत्न या मधुन जेव्हा आपण यशोशिखरावर गाठु तेव्हा आपलं एक वेगळं वलय निर्माण होईल. अस्तित्व निर्माण होईल हेच वलय अस्तित्व समाजाच्या पातळीवर पटलावर आपल बळ सिद्ध करणार ठरेल. आपण एकदा आपलं बळ शक्ति सामर्थ्य अर्जित केल तर आपले अनेक प्रश्न आपोआप मिटतात संपुष्टात येतात. पण आपलं बळ शक्ति सामर्थ्य आपल्याला यदाकदाचित विकसीत करता आलं नाही. तर मग मात्र आपल्याला आपल्या प्रत्येक अडचणीच्या अनुषंगाने अनेकांवर अंवलबून राहव लागत आणि अंवलबुन राहुन आपल्या दैनंदिन अडचणी सुटतीलच हे पण निश्चित नाही.आपण आपल्या दैनंदिन अडचणीच्या अनुषंगाने ज्यांच्या वर अंवलंबित आहेत ते आपला उपभोग वस्तू म्हणून वापर करतील या मध्ये किंतु परंतु नाही याच दरम्यान आपल्याला अपमान जनक परस्थितीला सामोरे जावे लागेल आपली इच्छा असो वा नसो हे सगळं आपल्याला सहन पण करवा लागेल. आपल्या उत्कर्ष साठी आपल्या कडे आपलं बळ विकसित करण्या पलिकडे दुसरा कोणताही पर्याय नाही. आपल बळ शक्ति सामर्थ्य विकसीत करा.कोणत्याही बाबतीत कोणावरही अवलंबून राहु नका. आत्म बल विकसित करून सामर्थ्यशाली व्हा आपला आदर्श इतरांनी घ्यावा असं व्यक्तिमत्त्व स्वतःला घडवा.

# मतदान: नागरिक हक्क; कर्तव्य नव्हे !



श्रीकृष्णदास निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

आधुनिक केसरी

**पहिल्या निवडणुकीबाबत या गोष्टी खास होत्या- १) सन १९५१-५२ साली प्रत्येक मतदान केंद्रांसाठी स्वतंत्र बॅलेट पेपर बॉक्सची सुविधा उपलब्ध होती. २) मतदाराला कोणत्याही मतदान केंद्रावर आपलं मत बॉक्समध्ये टाकण्याचं स्वातंत्र्य होतं. ३) कोणत्याही उमेदवाराला मतं देण्याचं स्वातंत्र्य पहिल्या निवडणुकीत देण्यात आलं होतं. यासंबंधीची ज्ञानवर्धक माहिती देत आहेत श्री.एन. के.कुमार जी. ती वाचा व प्रगल्भ व्हा.. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर लोकशाही पद्धतीने सरकार स्थापन करण्यासाठी सन १९५१-५२ साली भारतात पहिल्यांदा निवडणूक घेण्यात आली. या प्रथम निवडणुकीस फेब्रुवारी महिन्यात सुरूवात झाली आणि ती तब्बल ४ महिन्यानी संपली होती.**

तेव्हा भारतात आतासारखे सोशल मीडिया, टीव्ही किंवा जाहिरातींचा सुळसुळाटही नव्हता. त्याकाळात ईव्हीएमसारखं तंत्रज्ञानही नव्हतं. त्यामुळं प्रचारसभा, वृत्तपत्र, फलक, पत्रक वाटून आणि प्रत्येकाच्या घरी जाऊन प्रचार होत असे. स्वतंत्र भारतात त्या साली पहिली लोकसभा निवडणूक झाली. त्या निवडणुकीत एकूण देशातील ५४ राजकीय पक्ष सहभागी झाले होते. देशभरात १,८७४ उमेदवार निवडणुकीसाठी उभे होते.

भारतीय संविधानाच्या भाग १५मध्ये अनुच्छेद ३२४ ते अनुच्छेद ३२९पर्यंत निर्वाचनाची व्याख्या केली आहे. त्यांत निर्वाचनांचे अधीक्षण, निदेशन आणि नियंत्रण हे निर्वाचन आयोगमध्ये निहित आहे, असे सांगितले आहे. तसेच निर्वाचन आयोगाला निवडणूक संपन्न करण्याची जबाबदारी दिली आहे. सन १९८९पर्यंत निर्वाचन आयोग केवळ एक सदस्यीय संगठन होते. परंतु दि.१६ अक्टोबर १९८९ रोजी राष्ट्रपती अधिसूचनेद्वारे आणखी दोन निर्वाचन आयुक्तांची नियुक्ती केली गेली. सार्वजनिक पद धारण करण्यासाठी एक स्वतंत्र नेता निवडला जातो. ही एक औपचारिक निर्णय प्रक्रिया आहे. निवडणूक कधी कधी कार्यकारी अधिकारी, न्यायपालिका, प्रादेशिक आणि स्थानिक सरकारी यांसाठी घेतली जाते. विधिमंडळातील कार्यालये सदस्यांनी भरू शकतात. ही प्रक्रिया स्वयंसेवी संघटना, कंपन्या, क्लब, इतर अनेक खाजगी व व्यावसायिक संस्थामध्ये वापरली जाते. निवडणूक किंवा निर्वाचन- इलेक्शन ही लोकशाहीची एक महत्त्वपूर्ण प्रक्रिया आहे, ज्या द्वारे जनता आपल्या प्रतिनिधींना निवडते. निवडणूकांद्वारे आधुनिक लोकतंत्रचे लोक आमदार आणि कधी कधी न्यायपालिका आणि कार्यपालिका या विभिन्न पदांवर निवडून येण्यासाठी व्यक्तिंना निवडतात. यांद्वारे क्षेत्रीय आणि स्थानीय जागांसाठीही व्यक्तिंची निवड होते. वस्तुतः निवडणूकांचा प्रयोग व्यापक स्तरावर होत आहे आणि हे खाजगी संस्था, क्लब, विश्वविद्यालय, धार्मिक संस्था, इत्यादीमध्ये पण प्रयुक्त होत आहे. भारतीय लोकतंत्रात्मक निवडणूक प्रक्रियेचे वेगवेगळे स्तर आहेत. परंतु मुख्यतः संविधानात पूर्ण देशासाठी एक लोकसभा आणि वेगवेगळ्या राज्यांकरिता वेगळ्या विधानसभांचे प्रावधान आहे.


लोकसभेच्या एकूण ५४३ सीटांपैकी विभिन्न राज्यातील वेगवेगळ्या संख्येमध्ये प्रतिनिधी निवडले जातात. तसेच वेगवेगळ्या राज्यांच्या विधानसभांसाठीही वेगवेगळ्या संख्येमध्ये आमदार निवडले जातात. नगरीय निकाय निवडणुकांचे प्रबंध राज्य निर्वाचन आयोग करते. तर लोकसभा व विधानसभा निवडणुका भारत निर्वाचन आयोगाच्या नियंत्रणात होतात. ज्यात वयस्क मताधिकार प्राप्त मतदाता प्रत्यक्ष मतदानाद्वारे सांसद आणि आमदार निवडतात. लोकसभा आणि विधानसभा या दोन्हींचा कार्यकाल पाच वर्ष असतो. निवडणूकांसाठी सर्वात पहिले निर्वाचन आयोग अधिसूचना जारी करते. अधिसूचना जारी झाल्यावर संपूर्ण निर्वाचन प्रक्रियेचे तीन भाग- नामांकन, निर्वाचन आणि मतगणना असे होतात. निर्वाचनाची अधिसूचना जारी होताच नामांकन पत्र दाखल करण्यासाठी सात दिवसांचा वेळ मिळतो. त्यानंतर एक दिवसाचा कालावधी हा त्यांच्या छाननीसाठी ठेवला जातो. यात अन्य अनेक कारणांनी नामांकन पत्र रद्द पण करतात. तत्पश्चात दोन दिवस नाव परत घेण्यासाठी दिले जातात. ज्याना निवडणूक लढवायची इच्छा नाही ते आवश्यक विचार विनिमयानंतर आपले नामांकन पत्र परत घेऊ शकतात. सन १९९३च्या विधानसभा आणि सन १९९६च्या लोकसभा निवडणुकांमध्ये विशिष्ट कारणांमुळे चार-चार दिवसांची मुदत दिली गेली. तथापि सामान्यतः हे कार्य दोन दिवसात संपन्न करण्याचा प्रयत्न केला जातो. कधीकधी एखाद्या क्षेत्रात पुन्हा मतदानाची स्थिती निर्माण झाली. तर त्यासाठी वेगळा दिवस ठरवला जातो. मतदानासाठी निश्चित करण्यात आलेल्या मतदान केंद्रांवर मतदानाची वेळ सामान्यत सकाळी ७ ते संध्याकाळी ५ वाजेपर्यंत ठेवली जाते.

इलेक्ट्रॉनिक वोटिंग मशीन आल्यावर मतगणनेसाठी सामान्यतः एक दिवसाचा कालावधी ठेवला जातो. मतगणना सातत्याने चालू असते त्यासाठी विशिष्ट मतगणना केंद्र निश्चित करण्यात येते. या मतदान केंद्रांवर अनाधिकृत व्यक्तिंचा प्रवेश वर्जित असतो. सगळे प्रत्याशी, त्यांचे प्रतिनिधि आणि पत्रकार इत्यादींसाठी निर्वाचन अधिकाऱ्यांद्वारे प्रवेश पत्र दिले जातात. वर्तमान काळात निर्वाचन क्षेत्रानुसार मतगणना केली जाते आणि त्यासाठी तेथील सर्व मतदान केंद्रांवर मतांची गणना करून परिणाम घोषित केला जातो. परिणामानुसार ज्या पक्षाला बहुमत प्राप्त झाले, तो पक्ष केंद्रात किंवा राज्यात आपले सरकार स्थापन करतो. भारतात मतदान करणे हे कायद्यानुसार अनिवार्य नाही. हा नागरिकांचा अधिकार आहे, कर्तव्य नव्हे.

राष्ट्रपती, उपराष्ट्रपती आणि राज्यसभा सदस्य यांच्या निवडणूका प्रत्यक्ष न होता अप्रत्यक्ष स्वरूपात होतात. त्यांना जनतेने निवडून दिलेले जनप्रतिनिधीच निवडतात. निवडणूकांदरम्यान संपूर्ण प्रशासकीय यंत्रणा निवडणूक आयोगाच्या नियंत्रणात कार्य करते. निवडणूकांची घोषणा झाल्यावर आचारसंहिता लागू होते आणि तिचे प्रत्येक राजकीय पक्ष, त्यांचे कार्यकर्ते आणि उमेदवार यांना पालन करावे लागते. आधुनिक प्रतिनिधी हे लोकशाही पद्धतीने निवडण्यासाठी एक साधन म्हणून निवडणुकीचा सार्वत्रिक वापर होतो. ईश्वर चिठ्ठीद्वारे सदस्यांची निवड करणे, हे तितकेसे विश्वसनीय वाटत नव्हते. म्हणून लोकशाहीच्या सार्वत्रिक निवडणुका या गुप्त मतदान पद्धतीने घेण्याचा निर्णय झाला. त्या काळात ईव्हीएम आणि व्हीव्हीपॅट अर्थातच नव्हते. सन १९५१-५२मध्ये बॅलेट पेपर- मतपत्रिकेचा वापर करण्यात आला होता. मतपत्रिका ही मतपेटीत टाकण्यासाठी प्रत्येक मतदान केंद्रांवर वेगवेगळ्या मतपेट्या ठेवण्यात आल्या होत्या. कोणत्याही मतपेटीत आपलं मत टाकण्याचं स्वातंत्र्य मतदाराला देण्यात आलं होतं.

सांप्रतकाळी उमेदवार हा गर्भश्रीमंत असावा लागतो. कारण त्याला निवडणुकीस सारे घरदार विकावे लागते. का ? तर प्रत्येक मत त्याला विकत घ्यावा लागतो. एकेका मताला तीनशे ते पाचशे रुपये मोजावे लागतात. जनता सुशिक्षित झाली, मात्र मतदार अधिक हावरा व आमिषाला बळी पडणारा झाला आहे. त्याला विकास करणारा नेता नको तर देश उजाडणारा हवा आहे. गुप्त मतदान पद्धती ही नावालाच राहिली आहे. आज आपले मत स्वमत न राहिल्यामुळे ते मत दान न होता मत क्रय-विक्रय सर्रास होताना दिसत आहे. दांडगाई करणाऱ्या उमेदवाराचे खुपच फावत आहे. याला आळा सुशिक्षित- सुजाण नागरिक नाही तर आणखी कोण घालणार ? म्हणून आजच्या मतदारास लोकशाही नको तर हुकूमशाही अर्थात पारतंत्र्यच हवे आहे. पैसाआडका, लुगडे, धोतर, कापडचोपड, दारु व पार्टी घेतलेले मतदार विश्वासघात करत नाहीत, असा उमेदवारांचा ठाम विश्वास असतो. म्हणून ते खुप उधळपट्टी करतात. मात्र फुकटात विकासपुरुषास निवडून आणण्यासाठी मतदाराचे वाकडे पाऊल पडत नाही. काही सुजाण मतदार मात्र पैसे पेरणाऱ्यांकडून खुशाल फायदा उठवितात आणि जनकल्याण करणाऱ्या निष्ठावान उमेदवारास आपले अमूल्य मत दान करून मतदानाचा हक्क बजावतात. पैसे पेरून देशाला लोटणाऱ्या देशद्रोही- बेगडी नेताजीस खाईत अशीच धूळ चारली पाहिजे, तरच आजचा सुशिक्षित तरुण भारताचा सुजाण नागरिक म्हणता येऊ शकेल. सन २०१९मध्ये झालेल्या लोकसभा निवडणुकीत पुन्हा बॅलेट पेपरचा वापर करण्यात यावा, अशी मागणी विरोधक व मतदारांकडून केली गेली. ईव्हीएममध्ये घोळ असल्याची विरोधकांकडून होणारी टीका आणि ईव्हीएमचा होणारा घोळ यामुळे पुन्हा एकदा व्हीव्हीपॅट आणि बॅलेट पेपरवर मतदान घेण्याची मागणी विरोधक करत होते. मात्र निवडणूक आयोगाने ती मागणी धुडकावून लावली होती, हे विशेष!

आज तंत्रज्ञानाच्या युगात सर्वकाही ऑनलाइन केले जात आहे. जसे की ऑनलाइन शॉपिंग, ऑनलाइन मार्केटिंग, ऑनलाइन मागणी, ऑनलाइन देवदर्शन, ऑनलाइन शिक्षण, ऑनलाइन अर्ज, ऑनलाइन परीक्षा आदींप्रमाणे ऑनलाइन मतदान सुद्धा होणे काळाची गरज आहे. त्यामुळे सर्वच निवडणूक घोटाळ्यांना टाळे लागेल, असाही एक मतप्रवाह दिसून येत आहे, तेही योग्यच!




# प्रेम म्हणजे प्रेमच असतं



दिलीप देशपांडे
मो.नं. ८९९९५६६९१७

आधुनिक केसरी

**१४ फेब्रुवारी व्हेलंटाईन डे.प्रेमाची कबुली, प्रेम व्यक्त करण्यासाठी हा दिवस. त्यामुळेच हा दिवस त्यांच्यसाठी खास आणि विशेष असतो.सर्वप्रथम अमेरिकेत हा दिवस साजरा करण्यात आला. आणि नंतर संपूर्ण जगात साजरा होवू लागला.७ फेब्रुवारी ते १४ फेब्रुवारी हा व्हेलंटाईन सप्ताह साजरा होतो. वर्षातभरात आपण बरेच काही "दिन-दिवस-आणि डेज"साजरे करत असतो. त्यातही काही डेज ची विशेष वाट बघितली जाते.जसे फ्रेन्डशिप डे,व्हेलंटाइन डे.आपली मित्रत्वाची भावना ,प्रेमाची भावना प्रकट करायला त्या त्या दिवसाची वाट बघावी लागते हीच मोठी शोकांतिकाआहे,असे म्हणणे चुकीचे ठरणार नाही.तरीही एकमेकांवर प्रेम असणं,आवश्यक आहे.ते नाकारता येत नाही.प्रेमाने सगळं साध्य होत,ते खोट नाही.**

प्रेम ही अशी भावना आहे जी व्यक्त झाल्यावर चेहरा खुलतो, बहर येतो ,आणि खरंतर तसं पाहिलं तर ती भावना व्यक्त करण्यासाठी कुठल्याही ठरावीक वेळेची, जागेची, आणि दिवसाची गरज नसतेच मुळे आणि नसावी ही.

फेब्रुवारी महिना लागला की तरुण युवक -युवती मध्ये १४ फेब्रुवारीच आकर्षण असत ते व्हेलंटाइन डेच. आताशात अनेक विवाहितां मध्येही ते असल्याचे दिसते. मग कुठे जायचं,कुठे भेटायचं,गिफ्ट काय घ्यायच,जेवणाचा कार्यक्रम कुठे? सगळं ठरत असत. पण हा प्रेम व्यक्त करण्याचा दिवस व्हेलंटाइन डे म्हणून साजरा का केला जातो? का करतो, ह्या विषयी कोणालाही काही माहिती नसते. सगळ्यांनाच माहीत व्हावा म्हणून व्हेलंटाइन डे विषयी जाणून घेऊ.

रोम मध्ये क्लाडिअस नावाचा राजा होता. तो शिस्तप्रिय,कठोर होता.तसा क्रुरही होता. त्याची काही तत्व होती,ती वेगळी होती.त्याच्या मते प्रेम आणी लग्न माणसाला कमजोर करतात. कामावरून त्यांच लक्ष उडत. युध्दात चांगले लढू शकत नाही.कुटुंबाची चिंता असते. त्याने आपल्या सैनिकांना प्रेम,लग्न न करण्याचा फतवा काढला होता.अर्थातच तो सर्वात मान्य नव्हता. त्याच राज्यात एक संत रहात होते.त्यांच नाव "व्हेलंटाइन" होते.जनतेवर हा अन्याय आहे.तो त्यांना मान्य नव्हता. आणि म्हणूनच त्यांनी काही प्रेमिकांची लपूनछपून लग्न लाऊन दिली होती. अर्थातच ही गोष्ट लपून राहणे शक्यच नव्हती. राजाच्या कानावर गेलीच. आपल्या आदेशानुसार न झाल्याने,व्हेलंटाइनला मृत्यूदंड देण्यासाठी आदेश दिला.कारागृहात त्याची रवानगी झाली.

कारागृहात जेलरच्या मुलीची दृष्टी त्यांनी परत आणून दिली. त्यामुळे मुलीत आणि त्यांच्यात जवळीक झाल्याने,प्रेम निर्माण होते.व्हेलंटाइन मृत्यदंडाचे आधी एक प्रेमपत्र तिला लिहितो. आणि निरोप घेतो.त्यात "तुझा व्हेलंटाइन"म्हणून सांगता करतो.तोच हा १४ फेब्रुवारीचा दिवस त्याचे नावे साजरा होतो. सगळयांनाच सविस्तर माहीत व्हावे हा उद्देश. भारतात ही मोठया प्रमाणात प्रेमीं कडून हा दिवस साजरा होतो.आपल्या प्रिय व्यक्तीला, शुभेच्छा पत्र,गुलाब पुष्प, भेट वस्तू देऊन आपल्या प्रेमभावना व्यक्त करतात. करायला हव्यात.

प्रेमी कोण? सर्वच असतात. प्रत्येकाचे मनात कोणा न कोणाबद्दल प्रेम हे असतच.मनात प्रेमभावना नाही अशी व्यक्ती सापडणे नाही.

आनंदात असणे प्रेम असते.आनंदाने, हसणे, हसवणे प्रेम असते.

गुलाबाचे फुल देणे हेसुद्धा प्रेम असते.

एकमेकांना जपणं हे पण प्रेम असते.

एकमेकाला नेहमी सावरणं हे पण प्रेम असते.

मित्र-मित्रात,मित्र-मैत्रिणीमध्ये, पति-पत्नी मध्ये, प्रियकर -प्रेयसी मध्ये आई-वडील -मुलामध्ये. प्रेम असत.अर्थातच प्रत्येकाची प्रेमाची भावना निराळी असते.अपेक्षा निराळ्या असतात. प्रेमाला वयाच बंधन नसत.




आपल्यावर कोणी प्रेम करतय, आपल कोणावर तरी प्रेम आहे, ही भावनाच अतिशय सुखद असते,मनाला आनंद देणारी असते.आपल्या जगण्याला बळ देणारी असते.

**आवडल कोणी**
**तर वेड होऊन जावं**
**बेधुंद होऊन प्रेम करावं**
**फुला सारखं जपावं**

**प्रेमासाठी जगणं व्हावं**
**वेड होऊन प्रेम करावं....**

पण आज सगळ्याच गोष्टींचे अर्थ बदलत चालले आहे.प्रेम म्हणजे नक्की काय? की आकर्षणातून दोघे जवळ येतात.हे हि महत्त्वाचे ठरते.अनेकदा दोघे, फेसबुक,वॉँटसाप, इन्स्टाग्राम माध्यमातून जवळ येतात.काही वेळा नको इतकी जवळीक साधली जाते,आणि नको ते प्रसंगाना सामोरे जावे लागते.आत्महत्या, हत्या,असे अनेक प्रसंग येतात.. आयुष्य उद्धस्त होतात... हे नकोय. मैत्रीतून एक सुंदर नातं निर्माण व्हावं.विचारांची देवाणघेवाण व्हावी. पण बऱ्याचदा तसे होत नाही आणि म्हणूनच व्हेलंटाइन डे ला अनेकांन कडून विरोध होतो,तो यामुळेच.

आता तर पूर्ण आठवडाच "व्हेलंटाइन डे आठवडा" साजरा करण्याचा प्रघात आलाय.रोज डे,प्रपोज डे,चॉँकलेट डे, टेडी डे, प्रॉँमिस डे, हग डे,किस डे, आणि व्हेलंटाइन डे,असा आठवडा. आपल्या प्रियकराला गुलाब पुष्प देणे,भावना व्यक्त करणे,वचन देणे,चॉँकलेट,भेटवस्तू देणे,मिठी मारणे,किस करणे,असे प्रकार येतात, जे आपल्या संस्कृतीत नाही बसत ह्या सगळ्या गोष्टी. म्हणूनच विरोध होतो.खरं प्रेम व्यक्त करायला ह्या सगळ्याची आवश्यकता आहे का? हा प्रश्न. का उगीचच असे प्रकारातून आपल प्रेम जगाला दाखवायचे. संधी साधू प्रेम नकोय.

१४ फेब्रुवारी, हा वीर शहीद भगतसिंग यांचा स्मृति दिन.तो कोणाला लक्षात रहात नाही.तो ही आठवावा.

प्रेम जरूर करा ,प्रेमात, आणि प्रेमाने सगळं व्यवस्थित चाललय.प्रेम शब्दाला कमीपणा येईल असे कृत्य करू नका..प्रत्येकाने प्रेमात रहा,..

आणि हा दिवस प्रेम व्यक्त करण्याचा "प्रेमाचा दिवस" म्हणून साजरा करा.संयमाने. एकच दिवस नाही तर सतत प्रेमात रहा...रोजचाच दिवस प्रेममय असूद्या...

पाडगावकर आपल्या कवितेत म्हणतात --

प्रेम कधी रुसणं असतं,
डोळ्यांनीच हसणं असतं,
प्रेम कधी भांडत सुध्दा !
दोन ओळींची चिठ्ठीसुध्दा प्रेम असतं,
घट्टमिठी सुध्दा प्रेम असत
मग सांगा,
प्रेम म्हणजे नक्की काय असतं.?
प्रेम म्हणजे प्रेम म्हणजे काय असतं ?
प्रेम म्हणजे.. प्रेम.. असतं.
पण
प्रत्येकाच् असतं का सेम.?

**शेक्सपिअर म्हणतो--**
**तू माझ्याशी प्रेम कर अथवा तिरस्कार...**
**दोन्ही माझ्याच पक्षात येईल.**
**जर तू माझ्यावर प्रेम करशील तर मी तुझ्या हृदयात असेल...**

आणि जर तू माझा तिरस्कार करशील तर मी तुझ्या मनात असेल....

थोडक्यात प्रेम भावनेला अनेक पदर असतात. प्रेम आणि लैंगिकता. अशारिरीक प्रेम. शारीरिक प्रेम. प्रेम आणि नैतिकता. प्रेम आणि व्यक्तीस्वातंत्र्य अनेक पैलू आहेत. असतात. याचे सामाजिक भान ठेवून जपणूक करायला हवी.

# विद्यार्थ्यांचं नुकसान : जबाबदार कोण ?



अंकुश शिंगाडे, नागपूर
संपर्क क्र.: ९३७३३५९४५०


आधुनिक केसरी

**शिक्षक आपापल्या विद्यार्थ्यांना शिकवीत असतात. ते शिकविण्यात अगदी कस लावत असतात. त्यातही काही शिक्षक शिकवतात तर काही शिक्षक शिकवीतही नाहीत. शाळा......आधीच्या शाळा या सरकारी मालकीच्या असायच्या. सरकारच आपल्या अधिकारी वर्गामार्फत शाळेवर लक्ष केंद्रित करीत असे. तेव्हा शाळा चांगल्या होत्या. शिक्षकही चांगले होते. त्यांच्यात कोणताच स्वार्थ नव्हता. दिवसामागून दिवस गेले. तसा काळ बदलला. त्यानंतर बदलत्या काळाबरोबर त्या पद्धतीत बदल झाला.**

त्यातच नवनवीन नेते अस्तित्वात आले. जुना सेवाभाव नष्ट झाला. बदलत्या काळानुसार नेत्यांच्याही विचारपद्धतीत बदल झाला. आता नेते जुन्या विचारांचे राहिले नव्हते. ते नवविचारांचे झाले होते. नवीन उदयास आलेले नेते. ते स्वार्थ शिरला होता त्यात. त्यामुळं त्यांनी आपलाच स्वार्थ पाहिला. असा स्वार्थ पाहात असतांना आपली पिढी कशी सुधारेल. असा विचार ते करु लागले नव्हे तर असा विचार करीत असतांना आपलीच पिढी नाही तर आपल्या नात्यातील माणसांच्या पिढ्या कशा सुधाररतील, ती आता याचाही ते विचार करु लागले. कधी यातूनच शेवटी गडगंज संपत्ती कशी गोळा करायची. ती याचं तंत्र माणसानं या स्वाार्थी नेत्यांच्या तंत्रानं हस्तगत केलं.

हे स्वार्थी नेते. त्यांनी संपुर्ण शाळेचं स्वरुपच बदलवून टाकलं. आता शाळा स्तरावर जे सरकारी स्वरुप होतं. ते बदलून त्याची जागा खाजगी मालकीच्या लोकांनी घेतली. मग सरकारी शाळेच्या जागेवर सरकारीच शाळा. ती परंतू त्या मालकी स्वरुपाच्या सरकारी शाळा उभ्या राहिल्या. यातूनच भ्रष्टाचार वाढीस लागला.

पुर्वी भ्रष्टाचार कमी होता. परंतू बदलत्या काळानुसार भ्रष्टाचार हा वाढत गेला. त्यातच या नेत्यांनी शाळा वाटपाचं षडयंत्र केलं. एवढ्या शाळा वाटल्या की एका एका गावात अनेक शाळा उभ्या राहिल्या. काही शाळा तर कागदावरच वाटल्या गेल्या. जेव्हा पटपडताळणी झाली, तेव्हा अशा शाळा अस्तीत्वात आहेत की नाही आहेत हे दिसलं. आता नवीन उदयास आलेल्या या शाळा. त्या शाळेसाठी अनुदान रुपात पैसा सरकार पुरवीत होतं. परंतू लक्ष एक मालक पुरवीत होता. तसं पाहता अनुदान सरकार देत असतांना मालक ठेवणे ही काळाची पाहिजे तेवढी गरज नव्हती. परंतू या काळात उदयास आलेल्या नेत्यांना पैसा खायचा होता. आपला स्वार्थ पाहात गडगंज संपत्ती गोळा करायची होती. ती संपत्ती आधीच्या शाळा पुर्णतः सरकारी असल्यानं व खायला पैसा न मिळत असल्यानं गोळा करता येत नव्हती. त्याला मर्यादा होत्या. म्हणून ही नेत्यांनी अनुदानीत शाळेच्या रुपानं काढलेली पळवाट. या पळवाटेतून नेत्यांनी एवढा अमाप पैसा कमवला की आज इडीची चौकशी होत असतांना सपशेल हा भ्रष्टाचाराचा पैसा त्यांच्याजवळ कितीतरी जास्त प्रमाणात असलेला दिसतो. याचं उदाहरण द्यायचं झाल्यास पटपडताळणीच्या वेळचं देता येईल. पटपडताळणीच्या वेळी काही काही शाळा या कागदावरच आढळल्या. प्रकरण काही दिवस चाललं व नंतर बंद झालं. ज्याप्रमाणे अनुदानीत खाजगी शाळेच्या रुपानं नेत्यांनी पैसा कमवला. तसाच पैसा अधिकारी वर्गानंही कमवला. त्यांच्यावरही जेव्हा चौकशी केली, कारण तेव्हा त्यांनीही भरपूर पैसा अशा भ्रष्टाचारानं गोळा केल्याचे निदर्शनास आले आहे.



मध्यंतरीचा काळ असाच गेला. परंतू यातूनही पैसा जास्त कमवता येत नाही, म्हणून आणखी पाऊल उचलले गेले. ते पाऊल म्हणजे पूर्ण रुपातील खाजगी मालकीच्या शाळा. ज्याला आपण कॉन्व्हेट म्हणतो. ज्यावेळी कॉन्व्हेट निघाल्या. त्यावेळी लोकांना अतोनात पैसा कमवता आला. कारण यामध्ये जे शुल्क विद्यार्थ्यांकडून घेतले जात होते, त्या शुल्काला बंधन नव्हते. ते शुल्क अतोनात प्रमाणात घेतले जाई. त्यातही आमच्या मुलांची आबाळ होते म्हणून सरकारनं यामध्येही आरटीई आणली. परंतू यामुळंही लोकांच्या पैसा कमविण्याला बंधन घालता आलं नाही.

हा पैसा कमविण्याचा नाद. या नादात नेत्यांची चांद झाली. कारण शाळा या नेत्यांच्या जास्त आहेत. मात्र विद्यांर्थ्यांचं यात अतोनात नुकसान झालं. कारण प्रत्येकवेळी पालकांची परिस्थिती सारखी होतीच असं नाही. त्यातच परिस्थिती ढासळताच पालकांनी विद्यार्थ्यांना कॉन्व्हेटचे शुल्क भरता न आल्यानं सरकारी शाळेत आणलं. अशा शाळेत या विद्यार्थ्यांना इंग्रजी ऐवजी मराठी शिकावं लागलं. त्यामुळं विद्यार्थ्यात ना मराठी धड ना इंग्रजी धड अशी परिस्थिती निर्माण झाली. कारण सरकारनं यावर तोडगा म्हणून इंग्रजीचा एक विषय इयत्ता पहिलीपासून सुरु केला. परंतू त्याचाही उपयोग झाला नाही. कारण या सरकारी शाळेत शिकविणारा वर्ग तेवढा तज्ञ नव्हता. त्यातच खाजगी अनुदानीत शाळेत झालेल्या शिक्षकभरत्या या गुणवत्तेच्या आधारावर झाल्या नव्हत्या. त्या केवळ नातेसंबंधाच्या आधारावर झाल्या होत्या. मग काही इमानदार नेत्यांच्या तेही लक्षात आलं व त्यांनी त्यासाठी पर्याय आणला. टी ई टी पात्रता परीक्षा. ती यातही पुढे भ्रष्टाचार झाला व अशाप्रकारे सरकारी वा खाजगी अनुदानीत शाळेला चांगले शिक्षक मिळाले नाहीत. एकंदरीत सांगायचं झाल्यास या सर्व प्रक्रिया. आता या सर्व प्रक्रियेत नेत्यांचं नाही तर विद्यार्थ्यांचं अतोनात नुकसान झालं. त्याला जबाबदार कोण? नेते की काळ. याला जबाबदार नेतेच. काळाला जबाबदार कसं धरता येईल बर! ती काळ हा बदलत जाणारच. महत्वाचं सांगायचं झाल्यास नेत्यांनी जणाची नाही तर मनाची लाज बाळगावी. शिक्षणाचं कार्य हे पवित्र कार्य आहे. त्यात भ्रष्टाचार करु नये. तसेच अधिकारी वर्गानंही यात भ्रष्टाचार करुन पैसा कमवू नये. कारण तुम्ही जे कार्य करता. ते शैतानी कार्य असून ते निसर्गशक्तीला कुठंतरी दिसतं. ती शक्ती आपल्याला माफ करीत नाही. तुम्ही जर विद्यार्थ्यांचं नुकसान करीत असाल तर........ त्याची शिक्षा ती शक्ती कशी करेल हे सांगता येत नाही. ती शक्ती कधी अपघात, कशी हृदयाचा त्रास, कधी पक्षाघात तर कधी कोणताही आजार देते. ती कधी संकटं देते. म्हणून त्या निसर्गशक्तीला थोडंतरी घाबरावे विद्यार्थ्यांसाठी झटावे. त्यांच्यासाठी चांगले निर्णय घ्यावे. ते राबविण्याचा प्रयत्न करावा. त्याचा वारंवार आढावा घ्यावा. तसंच शिक्षकांनीही चांगलं शिकवावं. त्यांचं नुकसान करु नये. तसेच नेत्यांनी व अधिका-यांनीही पैसे कमविण्यावर जास्त भर देवू नये.

# ईव्हीएम रोखा; बॅलेट पेपरवर मारा शिक्का



सुशील गायकवाड
संपर्क क्र.: 9309474068

आधुनिक केसरी

**कसबा आणि चिंचवड विधानसभा मतदारसंघाच्या पोट निवडणुकीसाठी पक्षांची जोरदारपणे तयारी सुरू झालेली आहे. महाविकास आघाडी सह शिवसेना शिंदे गट आणि भारतीय जनता पार्टीचे नेते मंडळी सुद्धा तयारीला लागलेले आहेत.शिवाय उमेदवार फिक्स होऊन अर्ज सुद्धा दाखल करण्यात आलेले आहेत.सत्तेतील आणि विरोधातील पक्षांना आमचाच विजय होणार असा विश्वास वाटू लागला आहे. गेल्या वर्षीच अंधेरी पोट निवडणुकीतून भाजपने ने माघार घेतल्याने महाविकास आघाडीच्या ऋतुजा लटके यांचा सहज विजय झाला होता. ऋतुजा लटके यांचे पती रमेश लटके यांचे निधन झाल्याने अंधेरी पुर्व रिक्त झालेल्या जागेवर ऋतुजा लटके यांना मोठी सहानुभूती मिळाली. त्या आज आमदार झाल्या.त्यामुळे महाविकास आघाडीला सुद्धा ही पोट निवडणूक जिंकण्याचेच वेध लागलेले आहेत.**

तसेच शिक्षक ,पदवीधर मतदारसंघाच्या विधान परिषदेच्या निवडणुकीत सुद्धा चांगले यश मिळाल्याने महाविकास आघाडीत विश्वास निर्माण झाला असून कसबा आणि चिंचवड ह्या विधानसभा मतदार संघातून निवडणूक लढण्याचा निर्धारच केला आहे.दोन्ही जागेवर भाजपचे आमदार होते.परंतु त्यांच्या निधनानंतर ह्या दोन्ही जागा रिक्त झालेल्या आहेत.इथे सुद्धा ही पोटनिवडणूक बिनविरोध व्हावी म्हणून सूर उमटला.परंतू महाविकास आघाडीने सुद्धा लढण्याचीच भूमिका स्वीकारल्याने हा रणसंग्राम येत्या २७ फेब्रुवारी ला मतदारांच्या मतांनी रंगणार आहे.पोट निवडणूकीच्या माध्यमातून ऋतुजा लटके ज्या पध्दतीने निवडुन आल्या तसेच शिक्षक आणि पदवीधर मतदारसंघातून ज्या पध्दतीने यश मिळविता आल्याने हा विजय महाविकास आघाडीच्या दृष्टीने महत्वाचा मानण्यात आलेला आहे.लक्ष्मण जगताप हे भाजपकडून चिंचवडचे आमदार होते. त्यांच्या निधनानंतर भाजपने त्यांची पत्नी अश्विनी जगताप यांना उमेदवारी दिली आहे.त्यामुळे जी सहानुभुती ऋतुजा लटके यांना मिळाली होती.तीच सहानुभूती अश्विनी जगताप यांना मिळणार का ? हे तर पाहावेच लागणार आहे.

परंतु ही निवडणूक प्रक्रिया बॅलेट पेपर यायला हवी.अशी सुद्धा लोकांची भावना येऊ लागली आहे. बॅलेट पेपर वर लोकांचीच जास्तच विश्वसाहर्ता दिसुन येत आहे.बॅलेट पेपर वर पार पडलेली विधानपरिषद शिक्षक,पदवीधर मतदारसंघाची निवडणूक खूप महत्वाची मानली जात आहे.अशीच निवडणूक आताच्या पोटनिवडणुकीची सुद्धा व्हायला हवी. असे जनतेस वाटत आहे.विधानपरिषद शिक्षक, पदवीधर मतदारसंघाच्या निकालांकडे लक्ष दिले असता वेगळे निकाल लागल्याने ही कमाल बॅलेट पेपर मूळेच झाली असल्याचे म्हटले जात आहे.बॅलेट पेपर वर निवडणूक घेतली म्हणूनच जे व्होट ज्या उमेदवारास दिले गेले ते व्होट त्याच उमेदवार गेले असे दावे केले जात आहेत. कारण ईव्हीएम मशीन द्वारे मते चोरण्याचाच जो प्रकार होतो.त्या प्रकारास आळा घालण्याचे काम बॅलेट पेपर मुळे होऊ शकते.असा विश्वासच मतदारांना वाटू लागला आहे.ईव्हीएम मशीन बाबत कोणतीही विश्वासाहर्ता वाटत नसल्याने बॅलेट पेपर वरच निवडणूका घेण्याचीच गरज भासू लागली आहे.ईव्हीएम मशीन मध्ये छेडछाड होत असल्याचं बोलले जात असताना बॅलेट पेपर वर निवडणुका घेण्याचा आग्रह हा वारंवार पुढे येत असतोच असतो.परंतु या प्रकरणी कोणतीही दखल घेतली जात नाही.बॅलेट पेपर वरील झालेली निवडणूक प्रक्रिया ही विश्वासाहर्ता निर्माण करणारी लोकांना वाटू लागलेली आहे.

त्यामुळे पुण्यातील कसबा आणि चिंचवड पोट निवडणुकीचा रणसंग्राम सुद्धा बॅलेट पेपर वरच व्हायला हवा अशी मागणीच आता जनतेतून येणे ही साहजिकच आहे. ईव्हीएम मशीन द्वारे काहीच तासांतच निकाल लागत असतो.तर बॅलेट पेपरची मतमोजणी करण्यास विलंब लागत असतो.अशी परिस्थिती दोन्ही प्रक्रियेबाबत असून जनतेमध्ये व मतदारांमध्ये तसेच इथल्या पक्षामध्ये जी विश्वासाची प्रक्रिया वाटत असते.त्याच प्रक्रियेचा स्वीकार होणे अपेक्षित आहे.बॅलेट पेपरवरच निवडणूका व्हायला हव्यात म्हणून अनेक वेळा विविध पक्षांच्या माध्यमातून आंदोलने करण्यात आलेली आहेत.विविध माध्यमातून सुद्धा हा मुद्दा पुढे आलेला आहे.त्यामुळे ह्या प्रश्नास कोणत्याही प्रकारचा प्रतिसाद मिळत नसल्याने ईव्हीएम मशीनलाच प्राधान्य दिले जात असते.

ईव्हीएम मशीन सहज आणि सोप्या पध्दतीने निवडणूक प्रक्रिया पूर्ण करत असते. मतदान करण्या पासून ते मतमोजणी करण्यापर्यंत सर्व कसं वेळेत होणारी ही प्रक्रिया आहे.त्यामुळे अशा प्रक्रियेचा स्वीकार सर्वांना आहेच आहे.

परंतु जेव्हा ईव्हीएम मशीनचा गैरवापर हा सत्ता मिळविण्यासाठी होत असेल तर हे लोकशाहीच्या दृष्टीने घातकच आहे.विरोधकांनी जी ईव्हीएम मशीनच्या बाबतीत जी भूमिका घेतली होती. तीच भूमिका पोट निवडणुकीच्या बाबतीत आक्रमक पणे मांडणे आवश्यक आहे. महाविकास आघाडीच्या घटक पक्षानेच नव्हे तर सर्व पक्षांनी याबाबतीत आग्रह धरण्याची आवश्यकता आहे. लोकशाही प्रक्रिया ही जनतेच्या मतदानातून पार पडत असते.ही जनताच ठरवत असते की आम्हाला आमचा मतदान देण्याचा हक्क कसा बजावायचा आहे. मतदान प्रक्रियेसाठी बॅलेट पेपरची मागणी पक्षांसह जनता सुद्धा करत असेल तर निवडणूक आयोगाने याची गांभीर्याने दखल घेणे अपेक्षित आहे.निवडणूक आयोगाने सुद्धा निःपक्षपातीपणे यास मान्यता देऊन जनतेच्या मागणीस प्रतिसाद देणे गरजेचे आहे.




पाठीमागील दोन पंचवार्षिक निवडणुकीमध्ये ज्या पद्धतीने भाजपने यश मिळविले हे पाहता हा बदल इतक्या प्रचंड अपेक्षित नव्हता असे अनेकांचे मत पुढे आले होते.ही ईव्हीएमची कमाल आहे.असाच आरोप करण्यात आले.

आजही ईव्हीएम च्या विरोधात आक्रमक भूमिका सुद्धा घेण्यात आलेल्या आहेत. ईव्हीएम मशीन हा मोठा वादाचा विषय बनत चाललेला आहे.ईव्हीएम मशीन वरच बंदी आणावी यासाठी सुद्धा अनेक राजकीय संघटनांनी यापूर्वी ही आवाज उठवलेला आहे.

ईव्हीएम सोबत छेडछाड केली जात असते. असा वारंवार आरोप केला जात असतो. त्यामुळे हे आरोप कितपत खरे आणि खोटे याबाबत सत्यता पडताळून घ्यायची असेल तर पुन्हा एकदा बॅलेट पेपर ला पुढे आणले पाहिजे.

ईव्हीएम मशिनचा दुरुपयोग होत असेल तर ह्या ईव्हीएम मशीनच्या विरोधात विरोधकांनी सुद्धा कायमस्वरूपी लढत राहिले पाहिजे.भारतीय जनता पार्टीस जर वाटत असेल आम्ही ईव्हीएम मुळे आलो नाहीत तर त्यांनी सुद्धा बॅलेट पेपर वर लढण्यासाठी सज्ज राहिले पाहिजे.इव्हीएम मशीनच्या आशीर्वादाने भाजप सत्तेत येत आहे. असे जे आरोप होत असतात.यासाठी ईव्हीएम रोखा आणि बॅलेट पेपर वर मारा शिक्का ह्याच प्रक्रियेस भाजप ने सुद्धा तयार राहिले पाहिजे.

इथला पक्ष आणि इथले मतदार यांचे म्हणणे ऐकून घेऊन त्यास प्रतिसाद देणे ही सरकार आणि निवडणूक आयोगाची मोठी जबाबदारीच आहे.त्यामुळे कसबा आणि चिंचवड पोट निवडणुकीच्या माध्यमातून ईव्हीएम मशीनला बॅलेट पेपर चा प्रयोग करायला काहीच हरकत नाही.

# एन.सी.सी. लष्करातील सैन्य बनविण्याची कार्यशाळा

आधुनिक केसरी



प्रशांत जा. खामकर
९९७०४२३२०४

शिस्तबद्ध, चारित्र्यसंपन्न, सहकार्य वृत्ती जोपासणारे, धर्मनिरपेक्ष भावनेने काम करणारे, देशभक्ती जपणारे, साहसी युवक घडविणारी कार्यशाळा म्हणजेच एन.सी.सी.होय. एनसीसी भारतीय तरुणांना सैन्य दलात सामील होण्यासाठी अनुकूल वातावरण पुरविण्याचे काम करते. हा भारतीय सैन्य दलाचा एक ऐच्छिक प्रकार असून त्याला राष्ट्रीय छात्र सेना असे म्हटले जाते. या विभागाची स्थापना २६ नोव्हेंबर १९४८ या दिवशी झाली. ही एक भारतीय लष्करी कॅडेट कॉर्पस असून त्याचे मुख्यालय नवी दिल्ली या ठिकाणी आहे. ही एक स्वयंसेवी संस्था असून त्याद्वारे संपूर्ण भारतातील हायस्कूल, महाविद्यालये व विद्यापीठांमधून कॅडेटस् ची भरती केली जाते. ११ ऑगस्ट १९७८ रोजी झालेल्या ११ व्या केंद्रीय सल्लागार समितीच्या बैठकीत एन.सी.सी. चे ब्रीदवाक्य ठरविण्याची गरज यावर चर्चा करण्यात आली. त्यावर चर्चा होऊन 'एकता व शिस्त' हे ब्रीदवाक्य ठरविण्याला अंतिम स्वरूप १२ ऑक्टोबर १९८० या दिवशी झालेल्या १२ व्या केंद्रीय सल्लागार समितीच्या बैठकीत ठराव संमत करून देण्यात आले. एनसीसी जगातील सर्वाधिक मोठी गणवेषधारी युवकांची संघटना आहे.१९६५ ते १९७१ पाकिस्तान बरोबर झालेल्या युद्धादरम्यान एनसीसी हा दुसऱ्या नंबरचा भारतीय सैन्य दलातील संरक्षण विभाग होता. या विभागाने अध्यादेश कारखान्यांना मदत करण्यासाठी शिबिरे आयोजित केली होती. शत्रूच्या हवाई छात्रधारी सैनिकांना पकडण्यासाठी गस्त दल म्हणून एनसीसी मधील कॅडेट्स काम करत होते. त्याचबरोबर एनसीसी कॅडेट्सने नागरी संरक्षण अधिकारी यांच्या कामामध्येही हातभार लावला. बचाव कार्यात भाग घेऊन रहदारी नियंत्रणाचे कामही उत्स्फूर्तपणे केले आहे. नॅशनल कॅडेट कार्पोरेशनच्या कारभारासाठी लेफ्टनंट जनरल दर्जाचे अधिकारी हे सरसंचालक असतात. देशातील सर्व राज्य व केंद्रशासित प्रदेश यांना एनसीसीच्या १७ संचालनालयात विभागण्यात आले आहे. राज्य राष्ट्रीय कॅडेट कोर्पस मुख्यालय प्रत्येकी दोन ते १४ गट मुख्यालय नियंत्रित करते. संचालकांचे आदेश ब्रिगेडियर किंवा त्यांच्या समकाक्षांमार्फत दिले जातात. तर गटांची कमान कर्नल किंवा वायुसेना आणि नौदलाच्या समकक्षांद्वारे केली जाते. भारतीय सैन्य दलातील एनसीसी विभागामध्ये महासंचालक, संचालक, गट आणि युनिट असे भाग पडतात. त्यामध्ये वरिष्ठ भाग व कनिष्ठ भाग असे दोन गट असतात. त्यामध्येही पायदल, हवाई दल व नौदल असे तीन भाग पडतात. एनसीसी सशस्त्र सैन्यासह सर्वच क्षेत्रात नेतृत्व देण्यासाठी आणि देशाच्या सेवेसाठी सदैव तत्पर असणारी प्रशिक्षित व प्रवृत्त तरुणांचे संघटन घडविते. युवकांना देशासाठी निःस्वार्थ सेवा करण्याची भावना निर्माण करते. तरुणांमध्ये जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात नेतृत्व तयार करून देशाच्या सेवेसाठी सदैव तत्पर राहण्याची जाणीव जागृत करते. तरुणांना सशस्त्र सैन्यात नोकरी करण्यासाठी प्रवृत्त करणारे वातावरण निर्मिती करते. देशातील तरुणांमध्ये चारित्र्य ,शिस्त, नेतृत्व, आत्मविश्वास आणि देशाभिमानाची भावना निर्माण करते.भारतातील देशांतर्गत असुरक्षित प्रसंगी नागरी संरक्षण व नागरी सेवकासाठी मोलाचे कार्य करणारी छात्र सेवा संघटना आहे. अधिकाधिक विद्यार्थ्यांना एन.सी.सी.मध्ये सहभागी होण्यासाठी पालकांसह शाळा पातळीवरही प्रयत्न झाले पाहिजेत. तेव्हाच खऱ्या अर्थाने बलशाली भारतासाठी सर्वस्वी झोकून देणारे नागरिक तयार होतील.



# पंढरपूर एम. आय. डी. सी. कामाला गती देण्याचे उद्योगमंत्र्यांचे निर्देश

## आमदार समाधान आवताडे यांच्या मागणीला यश

आधुनिक केसरी न्यूज

**ज्योती खिलारे**

**पंढरपूर :** शहर व तालुक्याच्या दृष्टीने भौतिक, व्यावसायिक आणि अर्थिक पातळ्यांवर अतिशय महत्वपूर्ण असणारा पंढरपूर एम. आय. डी. सी. प्रश्न गेली अनेक वर्षे भिजत घोंगडे अशा अवस्थेत सापडला होता. सदर एम. आय. डी. सी. साकार झाल्यानंतर पंढरपूर तालुक्यातील निरनिराळ्या विकासात्मक बाबींचा विकास कसा होऊ शकतो यावर फक्त कागदी घोडे नाचवून या मुद्द्याला वारंवार उर्जित ठेवण्याचा प्रयत्न सतत केला जात होता. परंतु विधानसभा पोटनिवडणुकीमध्ये मंगळवेढा पंढरपूर - मंगळवेढा विधानसभा कार्यक्षेत्राचे लोकप्रतिनिधी म्हणून आमदार आवताडे यांनी जबाबदारी खांद्यावर घेतल्यापासून मतदारसंघातील वीज, पाणी, रस्ते, आरोग्य आदी बाबींच्या सक्षमीकरणासाठी त्यांनी आपले राजकीय कौशल्य पणासलावून आत्तापर्यंतचा सर्वात भरीव आणि मोठा निधी मतदार संघासाठी खेचून आणला आहे. आ. आवताडे यांच्या या मागणीला सक्षमपणे पुष्टी देण्यासाठी प्रशासकीय पातळीवरील कामाची गती वाढविण्याचे निर्देश उद्योगमंत्री ना. उदय सामंत यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले आहेत. या मागणीच्या अनुषंगाने उद्योगमंत्री ना. नंबर उदय सावंत यांच्या नेतृत्वाखाली बुधवारी बैठक संपन्न झाली. त्यावेळी संबंधितांना निर्देश देण्यात आले आहेत. मतदारसंघातील मूलभूत आणि पायाभूत बाबींच्या धोरणात्मक प्रगतीचा रथ पुढे संक्रमित



करत असताना आमदार आवताडे यांनी पंढरपूर एम. आय. डी. सी पूर्णत्वास जाण्यासाठी गेल्या काही दिवसांपासून चंग बांधला आहे. अशातच राज्यामध्ये सत्तेची समीकरणे बदलल्यानंतर आमदार आवताडे यांच्या या मागणीला मुख्यमंत्री ना.एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री ना.देवेंद्र फडणवीस व उद्योगमंत्री ना. उदय सामंत यांच्या नेतृत्वाखाली सदर मागणीस आणखी धार प्राप्त झाली. पंढरपूरसारख्या तीर्थक्षेत्र तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी सदर एम. आय. डी. सी. साकार होणे ही काळाची गरज असल्यामुळे आमदार आवताडे यांनी वेळोवेळी पत्रव्यवहार करून व प्रत्यक्ष भेटून या प्रश्नाच्या अनुषंगाने पाठपुरावा केला होता. येथील स्थानिक बेरोजगारी व आमदार आवताडे यांची या मागणीबद्दल असणारी तळमळ लक्षात घेऊन उद्योगमंत्री ना. उदय सामंत यांनी या सह्याद्री शासकीय निवासस्थानी आमदार आवताडे यांच्या उपस्थितीमध्ये बैठक घेऊन या प्रश्नावर सखोल चर्चा केली.

सदर बैठकीमध्ये पंढरपूर व त्याचबरोबर मंगळवेढा तालुक्यातील एम.आय.डी. सी या व्यावसायिक संकुलास व्यापक व विस्तारित रूप देण्यासाठी उद्योजकांना या एम. आय. डी.सी मध्ये छोटे - मोठे उद्योग व्यवसाय उभारण्यासाठी प्राधान्याने गुंतवणूक करण्यासाठी प्रयत्न करण्यासंदर्भात या बैठकीत चर्चा झाली. जे उद्योजक मंगळवेढा येथील एम.आय.डी.सी मध्ये गुंतवणूक करण्यासाठी स्वारस्य दर्शवतील अशा उद्योजकांच्या समस्या व अडी- अडचणी प्राधान्य क्रमाने सोडविण्यावरही यावेळी अधिकारी व पदाधिकारी यांच्या समवेत चर्चा करण्यात आली. दुष्काळी तालुका अशी ओळख असणाऱ्या मंगळवेढा तालुक्यामध्ये या व्यवसायिक हबमुळे अर्थकारणास मोठी संजीवनी मिळणार असल्याचेही या बैठकीत मत मांडण्यात आले.

# बार्टीच्या कारभाराची चौकशी करा : प्रा. रामचंद्र भरांडे

## पुणे येथे लोकस्वराज्य आंदोलनाचे धरणे आंदोलन

आधुनिक केसरी न्यूज

**नांदेड :** लोकस्वराज्य आंदोलन संस्थापक



अध्यक्ष प्रा.रामचंद्र भरांडे यांच्या मार्गदर्शनाखाली बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे येथे दिनांक १३ फेब्रुवारी २०२३ पासुन बेमुदत धरणे आंदोलन करण्यात येणार असुन, बार्टीच्या योजनांचे समन्याय प्रमाणात अनुसूचित जाती प्रवर्गातील जाती समुहात लाभार्थी व लाभवंचित जातीनिहाय अ.ब.क.ड वर्गिकरण करण्यात यावे,बार्टीच्या योजनेचा लाभार्थी कोणत्या जातीचे आहेत ? व लाभवंचित जाती कोणत्या आहेत ? चाळीस वर्षाचा लेखाजोगा मांडण्यासाठी उच्य न्यायालयाच्या माजी न्यायमुर्तीची समीती गठीत करून जात पक्षपाती भ्रष्ट कारभाराची उच्च न्यायालयाच्या सेवानिवृत्त न्यायाधिशा मार्फत चौकशी करण्यात यावी. मागील चाळीस वर्षात बार्टीचे महासंचालक कोणत्या जातीचे झाले ? या पदावर अनुसूचित जातीतील पात्र व्यक्तींना संधी मिळाली का ? एक जातीय वर्चस्व मोडीत काढण्यासाठी अ.ब.क.ड असे वर्गिकरण करून सर्व घटकांना फिरत्या क्रमांकानुसार संधी देण्यात यावी,बार्टी महासंचालक गजभिये यांच्या कामकाजाची चौकशी करण्यात यावी. फेलोशीप,योजना व उपक्रम याचा लाभ वितरण करतांना उपजातीच्या लोकसंख्येचा निकष निश्चित करण्यात यावा,आदी प्रमुख मागण्यासाठी बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था,बार्टी पुणे येथे ॲड. दत्तराज गायकवाड,ॲड.नितीन पोळ यांच्या नेतृत्वाखाली दिनांक १३ फेब्रुवारी २०२३ पासुन बेमुदत धरणे आंदोलन करण्यात येणार असल्याचे निवेदन संजय राठोड,मंत्री अन्न व प्रशासन महाराष्ट्रराज्य मुंबई मार्फत मा. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पाठवण्यात आले. डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्थेच्या स्थापनेचा मूळ हेतू समतेचा मुलमंत्र घेऊन अनुसूचित जाती प्रवर्गातील सर्व जाती समुहाच्या घटकांना मुख्य प्रवाहात सहभागी करुन घेणे ,त्यासाठी तरूणांना कौशल्य विकासाचे प्रशिक्षण देणे तसेच संशोधनासाठी प्रोत्साहन देणे हा मुद्दा महत्वाचा होता.अनुसूचित जातीमध्ये ५९ जातीचा समावेश असुन,त्या सर्वांना योजनेचे समन्यायी वितरण होणे अपेक्षित होते परंतु शासनाने मागील चाळीस वर्षात हजारो कोटी रूपये या संस्थेवर खर्च केले मात्र याचा लाभ विशिष्ट जातीलाच झाला असुन,त्याचबरोबर महासंचालक पदाच्या यादीवर नजर टाकल्यास असे लक्षात येते की,यामध्येही एकाच जातीचा भरणा झालेला दिसुन येत असुन.यासाठी १३ फेब्रुवारी २०२३ पासुन बेमुदत धरणे आंदोलन करण्यात येणार आहे तरी,तरी अनुसूचित जाती प्रवर्गातील सर्व लाभवंचित समूहातील युवक व युवतींने बहुसंख्येने सहभागी व्हावे असे आवाहन सचिन वाघमारे,सुरेश वाघमारे,रवि गाडेकर,नागोराव कुडके,नागनाथ पवार,संतोष तेलंग,गजानन वाघमारे,अंकुश गायकवाड,राजेश शेळके,आदी लोकस्वराज्य आंदोलन पदाधिकारी यांच्या वतीने करण्यात आले आहे.



# मनपा उर्दु शाळा क्र. 4 मध्ये पुस्तक मेळाव्यासह शिक्षणोत्सव

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** महानगरपालिकेच्या उर्दु शाळा क्र. 4 मध्ये भरविण्यात आलेल्या पुस्तक मेळाव्याचे शहराचे आ. फारुख शाह यांच्या हस्ते तर शिक्षणोत्सवाचे जिल्हा पोलीस अधीक्षक संजय बारकुंड यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. अकिल परवेज फजलुर्रहेमान हे होते.

यापसंगी पोलीस अधीक्षक संजय बारकुंड यांनी उपस्थित विद्यार्थी विद्यार्थिनींना मार्गदर्शन करताना सांगितले की, पुस्तकांना आपल्या जीवनात खूप महत्वाचे स्थान आहे, पुस्तकांचे वाचन आणि ज्ञान आत्मसात केल्यानेच आपला बौध्दिक विकास होत असतो. त्यातूनच आपल्या व्यक्तिमत्वाची जडणघडण होत असते. म्हणून पुस्तकी वाचनावर सातत्याने भर देत अभ्यास कराल तर जीवनात यशस्वी व्हाल असा मोलाचा सल्ला बारकुंड यांनी विद्यार्थ्यांना दिला, याप्रसंगी हाजी साबीर सेठ, हाजी अब्दुल सलाम मास्टर, हाजी अफ्फान सर, नगरसेवक वसीम बारी, हाजी सलीम शाह, शबीहुल हसन मुन्नासेठ, हाजी जाहिद हुसैन, डॉ. शब्बीर इकबाल, नासिर पठाण, डॉ. दीपश्री पवार आदी मान्यवरांसह शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. उद्घाटनानंतर आ. फारुख शाह यांनी पुस्तक मेळावा प्रदर्शन आणि शिक्षणोत्सवाच्या विविध स्टॉल्सवर भेट देवून पाहणी करीत माहिती जाणून घेतली.

# व्हेल माशाची उलटी तस्करी करणारी टोळी गजाआड

## 5 कोटी 79 लाख 25 हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त

आधुनिक केसरी न्यूज

**सांगली :** व्हेल माशाची उलटी (अंबरग्रीस)ची तस्करी करत असताना सांगली स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेकडून दोघांना अटक करण्यात आले आहे त्यांच्याकडून 5 किलो 710 ग्राम इतक्या वजनाचे व्हेल माशाची उलटी (अंबरग्रीस) सदृश्य पदार्थ जप्त करण्यात आले आहे आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत त्याची किंमत अंदाजे पाच कोटी 75 लाख 25 हजार 010 रूपये इतकी आहे. दोघा संशयीत आरोपींकडून एकूण 5 कोटी 79 लाख 25 हजार 10 रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सांगली स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेस शामराव नगर सागंली मधील डॉ. एपीजे अब्दुल कलाम कॉलेज जवळ व्हेल माशाची उलटीची विक्री करण्यासाठी दोन इसम येणार असल्याची गुप्त बातमी बातमीदारामार्फत मिळाली. त्यानुसार पोलीस अधीक्षक डॉ. बसवराज तेली व अप्पर पोलीस अधीक्षक ऑचल दलाल यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेने सापळा रचून तस्करीत सामिल असणारे दोघांना ताब्यात घेतले. चौकशी केली असता त्यांच्याकडून पिवळसर तांबूस रंगाचा ओबड-धोबड आयताकृती आकाराचे 5 किलो 710 ग्रॅमचे आठ तुकडे आढळून आले. याबाबत विचारपूस केली असता सदरचे पदार्थ



हे व्हेल माशाची उलटी (अंबरग्रीस) असल्याचे सांगितले. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत त्याची मोठी किंमत असल्याने त्याची विक्री करण्यासाठी सांगलीत आल्याचे त्यांच्याकडून कळाले. अटक करण्यात आलेले संशयीत आरोपींची नावे सलीम गुलाब पटेल व.व. 49 रा. खणबाग, सय्यद अमीन रोड, सांगली व अकबर याकूब शेख व.व. 51 रा. मु. पो. पिंगोली, मुस्लीमवाडी ता. कुडाळ जि. सिंधुदुर्ग असे आहेत. त्यांच्याकडून व्हेल माशाची उलटी, महिंद्रा बोलेरो गाडी, व एक मोपेड गाडी असे एकूण 5 कोटी 79 लाख 25 हजार 10 रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सांगली स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेकडून पो निरीक्षक सतीश शिंदे, सपोनी संदिप शिंदे पो उप निरीक्षक विशाल येळेकर, अच्यूत सूर्यवंशी, जितेंद्र जाधव, राजू शिरोळकर, अमोल ऐदाळे, संदिप पाटील, संकेत मगदुम, राहूल जाधव यानी कारवाईत सहभाग घेतला.

# जयहिंद इंग्लिश स्कूलमध्ये स्मार्ट क्लास रूमचे उद्घाटन

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** येथील जयहिंद शैक्षणिक ट्रस्ट संचलित जयहिंद इंग्लिश स्कूलमध्ये स्मार्ट क्लासरूमचे उद्घाटन ट्रस्टचे अध्यक्ष दादासाहेब डॉ. अरुण साळुंखे यांच्या हस्ते करण्यात आले, यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी श्रीमती निलिमाताई पाटील, प्रमुख अतिथी म्हणून ट्रस्टचे उपाध्यक्ष भाऊसो. प्रमोद पाटील शाळा समिती चेअरमन नानासाहेब नानाभाऊ कोर, संस्थेचे विश्वस्त तात्यासाहेब वसंतराव ईशी, नानासाहेब चंद्रशेखर पाटील, रावसाहेब शेखर सुर्यवंशी, दादासाहेब सुधीर पाटील, दादासाहेब अनिल चौधरी उपस्थित होते.

ट्रस्ट संचलित सर्व शाळा, महाविद्यालयाचे मुख्याध्यापक, प्राचार्य उपस्थित होते. २१व्या शतकाच्या आधुनिक विज्ञान व तंत्रज्ञानाच्या युगात शैक्षणिक क्षेत्रात काळानुसार बदल करणं अतिआवश्यक आहे. जेणेकरून मुलांच्या बौद्धिक क्षमतेत वाढ होत त्यांच्यातील कलागुणांना वाव मिळेल. खरंतर आजच्या शिक्षण क्षेत्रात मुलांच्या विकासाच्या दृष्टीने राबविण्यात येणारे प्रयोगशील उपक्रम हे भविष्यातील वाटचालीसाठी अधिक फायदेशीर ठरतील,त्यादृष्टीने जयहिंद इंग्लिश स्कूलच्या १० वर्गात स्मार्ट बोर्ड बसविण्यात आले आहेत. उर्वरित वर्गातही लवकरचं स्मार्ट बोर्ड बसविण्यात येणार आहे. शाळेतील विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरील आनंद व त्यातून त्यांना मिळालेल्या शैक्षणिक अनुभवातून शिक्षकांना प्रेरणा मिळाली असं म्हणायला हरकत नाही, कोरोनामुळे शिक्षक




आणि विद्यार्थी यांच्यामध्ये पडलेली खिंड स्मार्ट बोर्डमुळे नक्कीच भरुन काढता येईल. ह्या स्मार्ट बोर्ड वापराविषयी व त्याचा वापर अधिक प्रभावी व्हावा यासाठी शाळेतील शिक्षकांना प्रशिक्षण देण्यात आले होते. ४ फेब्रुवारी २०२३ रोजी मान्यवरांच्या हस्ते जयहिंद इंग्लिश स्कूलमध्ये स्मार्ट क्लासरूमचे उद्घाटन करण्यात आले,या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन वैशाली जोशी यांनी केले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेचे मुख्याध्यापक चैतन्य भंडारी यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी मेहनत घेतली.



# शिक्षक-पालक संघ व सत्कार समारंभ प्रा. शाळेत साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील मोलखेडा येथे आज दि.८/२/२३ बुधवार रोजी जिल्हा प्रा.शा.मोलखेडा येथे ' शिक्षक - पालक सभा ' व ' सत्कार समारंभ ' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी सर्वप्रथम राजमाता जिजाऊ यांच्या प्रतिमेचे पूजन जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक आनंदा वारांगणे यांच्या हस्ते करण्यात येऊन अभिवादन करण्यात आले आणि पुढील कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली. याप्रसंगी रविंद्र जनार्दन शेळके सर (ता. अ. सोयगाव , शिक्षक सेना), गजानन रामदास मख सर प्रा.शा. टिटवी यांचा शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ देऊन यथोचित सत्कार करण्यात आला..तसेच सर्वांच्या उपस्थितीत 'शिक्षक - पालक संघ ' स्थापित करण्यात आला.तसेच अनेक मुद्यांवर चर्चा करण्यात आली.यावेळी सरपंच मनीषाताई ज्ञानेश्वर वारांगणे, कें.प्र. मडम, सर्व शिक्षक, विद्यार्थी, उपसरपंच, शा.व्य.स. अध्यक्ष तथा सदस्य व पालक वर्ग, अंगणवाडी सेविका व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रास्तविक , सूत्रसंचालन , आभार शिक्षकांनी केले. अध्यक्षांच्या अनुमतीने शिक्षक व पालक संघाचा सत्कार सभेचा समारोप झाला.



# आ. फारुक शाह यांच्या हस्ते कबीर चौक येथे कामाचा शुभारंभ

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** सार्वजनिक बांधकाम विभाग धुळे यांच्या अर्थसंकल्पीय मंजूर कामा निमित्त मेहेरगाव धुळे अमळनेर चोपडा खरगोन रस्ता भाग जुने धुळे चाळीसगाव रस्ता 15 किलोमीटर अंतराचा रस्ता यामध्ये दोन्ही बाजूस कॉँक्रीट गटार व फूटपात करणे यासाठी भरगोस निधी मंजूर झाल्याने या कामाच्या शुभारंभासाठी आमदार फारुक शहा यांच्या हस्ते करण्यात आले.

या ठिकाणी आमदारांनी सांगितले की मी केलेल्या कामांचे फुकट श्रेय कोणी घेऊ नये असे आव्हान केले . आ. फारुक शाह यांनी सांगितले की काही दिवसांपूर्वी अनेक वृत्तपत्रांमध्ये मोठ्या बातम्या लागल्या कि देवपूर भागाचा निधी मुस्लिम भागात पळू देणार नाही..! परंतु जो शिकार मी केला तो शिकार आम्ही परत आणला आहे वाघाने केलेली शिकार कुत्रे खाऊ शकत नाही असे वक्तव्य आ.फारुक शाह यांनी केले . व काही पत्रकारांनी प्रश्नही विचारले की बीजेपी चे शितल नवले यांनी प्रेस मध्ये असे सांगितले की फॉरेस्ट कॉलनी चा रस्ता आम्ही केला असे सांगण्यात येत आहे त्यावर आ. शाह यांनी सांगितले की आठ दिवसात कुठेही काम मंजूर होत नाही कारण पालिका अधिकाऱ्यांनाच इन्स्ट्रुमेंट्स तयार करण्यासाठी एक महिन्याचा कालावधी लागतो तर काम लगेच कसे होईल...? काढण्याची मोहीम मी मंत्रालयात कित्येक दिवसापासून निधी संदर्भात चक्रा घालत आहे. नागरिकांच्या मागणीनुसार त्या रस्त्याचा इन्स्ट्रुमेंट तयार केला महासभेत मंजूरही करून घेतला त्यानंतर प्रशासकीय मंजुरी केली मग ते काम झाले असे फारूक शाह यांनी सांगितले व फुकटचे श्रेय घेऊ नये असे वक्तव्य या ठिकाणी केले.



# फुलंब्री येथे त्यागमूर्ती माता रमाई यांच्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** त्याग मूर्ती माता रमाई यांची फुलंब्री येथे अभिवादन करुन जयंती साजरी करण्यात आली. यावेळी वंचित बहुजन आघाडीचे नवनिर्वाचित शहराध्यक्ष गुड्डू भाई शेख युवा उद्योजक रंगा भाऊ भुईगड जनसेवा फाउंडेशन अध्यक्ष शाकेर भाई पटेल युवा नेते बाळूभाऊ गंगावणे, वंचित बहुजन आघाडीचे शहर महासचिव जमाल शेख, वंचित बहुजन युवा आघाडीचे तालुका महासचिव विनोद कसारे बिल्ढा गावचे ग्रामपंचायत सदस्य योगेश पेटारे, व सामाजिक कार्यकर्ते सोहेल भाई पठाण अज्जू भाई पटेल संदीप भाऊ पेटारे जमील भाई शहा अक्षय भाई सोनवणे, आमेर शेख आदींची उपस्थिती होती.

# वंचित बहुजन आघाडीचे नवनिर्वाचित पदाधिकारी -कार्यकर्त्यांचे राजीनामे

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** वंचित बहुजन आघाडी शहर व तालुका फुलंब्री जिल्हाध्यक्ष प्रभाकर बकले यांच्या त्रासाला कंटाळून नवनिर्वाचित पदाधिकारी यांचे सामूहिकरीत्या नवनिर्वाचित पदांचा राजीनामा देत आहोत. आम्ही बाळासाहेब आंबेडकर यांचे सच्चे कार्यकर्ते असून आम्ही वंचित बहुजन आघाडी मरेपर्यंत सोडणार नाही. पण जिल्ह्याचे जिल्हाध्यक्ष प्रभाकर बकले यांनी मनमानी पद्धतीने चालविलेल्या कारभारास व त्यांच्या त्रासाला कंटाळून आम्ही शहर व तालुक्याच्या असंख्य पदाचा आज राजीनामा देत आहोत. संदीप देविदास मस्के- आर एफ मुसा शेख- संतोष दौलत भिवसने- वसंत शामराव बनसोड- रवींद्र मोतीलाल गजरे, सचिन उत्तम ढोले -मच्छिंद्र विठ्ठल नरवडे- पंकज कैलास वाहुळ- दीपक गौतम वाहुळ- गणपत कडूबा पगडे- राहुल विजय इंगळे- रमेश किसन भवसने- अजय बाबासाहेब जाधव -त्रिंबक आधार केदारे -अजय भास्कर पगारे- संतोष उत्तम ढोले- रामेश्वर दामोदर प्रधान -कलीम वजीर शहा -सचिन रोहम पगारे- किशोर भीमराव गंगावणे- सचिन रमेश प्रधान- आम्ही सर्व पदाचा राजीनामा देत आहोत.



# माघी वारीत स्वेरीच्या विद्यार्थ्यांचा सहभाग

आधुनिक केसरी न्यूज



**पंढरपूर :** माघ वारी दरम्यान पंढरीत विठ्ठलाच्या दर्शनासाठी देशाच्या कानाकोपऱ्यातून लाखो भाविक येत असतात. यावर्षी माघ वारीत वारकऱ्यांची वाढती गर्दी पाहता जिल्हा पोलीस अधीक्षक (ग्रामीण) शिरीष सरदेशपांडे यांच्या मार्गदर्शनाखाली दरवर्षी प्रमाणे 'तीर्थक्षेत्र पोलीसः माघी वारी २०२३' या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. शिक्षण क्षेत्रामध्ये काम करत असताना समाजाप्रती बांधिलकी जोपासण्याच्या दृष्टीने व प्रशासनावर येणारा अधिकचा ताण कमी करण्याकरिता वारी काळात 'स्वेरी' नेहमीच कार्यरत असते. स्वेरी अंतर्गत असलेल्या चारही महाविद्यालयातील २० प्राध्यापकांच्या मार्गदर्शनाखाली सुमारे १०० विद्यार्थ्यांनी दि.३१ जानेवारी २०२३ ते दि.२ फेब्रुवारी २०२३ पर्यंत माघ वारी व्यवस्थापन कार्यात सहभागी होवून पोलीस प्रशासनाला अनमोल सहकार्य केले.

यावेळी 'पोलीस मित्र' म्हणून कार्य करत असताना स्वेरीचे विद्यार्थी पंढरपूर शहरात महत्वाच्या ठिकाणी उभारण्यात आलेल्या पोलीस मदत केंद्राच्या माध्यमातून चुकलेल्या वारकऱ्यांना त्यांचे नातेवाईक शोधण्यात मदत करत होते. तसेच गर्दी नियंत्रणासाठी विद्यार्थ्यांचे समूह कार्य करत होते. शहरातील प्रमुख गजबजलेल्या ठिकाणी तसेच छत्रपती शिवाजी महाराज चौक, अंबाबाई पटांगण, चंद्रभागा वाळवंट परिसर या महत्त्वाच्या परिसरांमध्ये वेगवेगळ्या ठिकाणी ते वारकऱ्यांना सहकार्य व मार्गदर्शन करत होते. स्वेरीच्या प्राध्यापक व विद्यार्थ्यांच्या कार्यामुळे प्रशासनावरील बंदोबस्ताचा ताण थोड्या प्रमाणात का होईना कमी झाला. स्वेरी स्थापनेपासून शिक्षणाबरोबरच सामाजिक कार्यात देखील नित्य योगदान देत असते. स्वेरीच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून विद्यार्थी महत्वाच्या वारी काळात दर्शन रांगेतील वारकऱ्यांना पाणी वाटप, निर्मल वारी, पोलीस मित्र, स्वच्छता मोहीम, औषध वाटप, आरोग्य तपासणी पथनाट्याद्वारे जनजागृती अशा विविध उपक्रमांतून सामाजिक योगदान देत आहेत. यामुळे स्वेरीच्या कार्याचे सर्वत्र कौतुक होत आहे. स्वेरीचे संस्थापक सचिव व अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे यांच्या नियोजनात्मक मार्गदर्शनाखाली, कॅम्पस इन्चार्ज प्रा.एम.एम. पवार यांच्या नेतृत्वाखाली, बी.फार्मसीचे प्रभारी प्राचार्य डॉ.मिथुन मणियार, डी.फार्मसीचे प्राचार्य प्रा.सतिश मांडवे, विद्यार्थी अधिष्ठाता व राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ.महेश मठपती यांच्या सहकार्याने स्वेरी अंतर्गत असलेल्या कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (पदवी), कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (पदविका), डी.फार्मसी व बी.फार्मसी या चारही महाविद्यालयांतील प्राध्यापक व विद्यार्थी या सेवेत सहभागी झाले होते.

# गजानन महाराज प्रकट दिनानिमित्त भरगच्च कार्यक्रम

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** शेगावीचे संत श्रेष्ठ श्री गजानन महाराज प्रकट दिन सोमवार रोजी आहे ,या निमित्त येथील श्री, सुंदर गणपती मंदिर व श्री गजानन महाराज भक्त परिवार यांच्या वतीने उद्या शुक्रवार(ता,१०)ते सोमवार(ता,१३ पर्यंत सुंदर गणपती मंदिरात या तीन्ही दिवस आरती, श्री गजानन महाराज चरित्र पारायण व सायंकाळी सात ते नऊ प्रवचन व कीर्तन कार्यक्रम आयोजित करण्यात आलेले आहेत,या सर्व कार्यक्रमाची तयारी झाली आहे,हे या कार्यक्रमाचे ९ वे वर्ष आहे, संस्थापक अध्यक्ष काशिनाथ जगन्नाथ आगज व उत्सव समिती अध्यक्ष संतोष बोथरा यांच्या मार्गदर्शनाखाली मंडळाचे सामाजिक कार्यकर्ते धोंडीरामसिंह राजपूत, श्रावन चौधरी, बाळू पुणे, निलेश लाडवानी, आदित्य वडनेरे, गोटूभाऊ बिडवे, राजू पुने, गणेश धुमाळ,श्याम पवार,कुणाल जगताप, निशिकांत पवार, अमोल निखाडे, सोनी अपशिंदे ,नीता वडनेरे, रत्नमाला आसर, मंगलबाई जगताप, अश्विनी राजपूत कार्यरत आहेत. ग्रंथ वाचक प्रभाकर कुलकर्णी आहेत. शहर व पंचक्रोशीतील बंधू -भगिनी यांनी या कार्यक्रमाचे लाभ घ्यावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

# खड्डे न बुजविल्यास मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांच्याहस्ते करणार सत्यनारायण : शिंदे

## पंढरपुरातील खड्डे दुरूस्तीच्या मागणीसाठी मविआ नेत्यांचे आंदोलन

आधुनिक केसरी न्यूज

**ज्योती खिलारे**

**पंढरपूर :** महाराष्ट्राची दक्षिण काशी म्हणून ओळख असणारे शहर विठुरायाच्या पदस्पर्शाने पावन झालेली नगरी असूनसुध्दा पंढरपूर शहराच्या जवळ आल्यानंतर ज्यावेळी एखाद्या भाविकाला एस.टी.मध्ये किंवा गाडीमध्ये, चालत येत असताना पहिला खड्ड्यात आदळल्यानंतर त्या भाविकांना किंवा नागरिकाला पंढरपूर शहरात आल्याची जाणीव होते ही खेदाची बाब आहे. पंढरपूर नगरपालिकेच्या माध्यमातून वार्षिक बजेट हे 169 कोटी रूपयांचे सादर करत असताना त्या बजेटच्या माध्यमातून मात्र सरगम चौकातील असणाऱ्या रेल्वे रूळाच्या खालून जाणारा रस्ता मात्र काही कायमस्वरूपी दुरूस्त करता येत नाही ही भाविकांची व पंढरपूरकरांची शोकांतिका म्हणावी लागेल. तसेच येत्या आठ दिवसांत शहरातील खड्डे न बुजविल्यास राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याहस्ते त्या खड्ड्यामध्ये सत्यनारायणाची पूजा आयोजित करणार असल्याचा इशारा राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेश सचिव श्रीकांत शिंदे यांनी दिला. पंढरपूर शहरातील व विशेष म्हणजे सरगम चौकातील सर्व खड्डे कायमस्वरूपी बुजविण्यासाठी महाविकास आघाडीच्या राष्ट्रवादी, काँग्रेस व शिवसेना, मित्र पक्षाच्यावतीने खड्ड्यातून जावा, झंडू बाम लावा, असे आंदोलन करत प्रशासनाला जाग आणण्याचा प्रयत्न करण्यात आला यानंतर पंढरपूर नगरपरिषदेचे मुख्याधिकारी यांना निवेदन देण्यात आले. सदरचे निवेदन उपमुख्याधिकारी सुनिल वाळूजकर यांना देण्यात आले. यावेळी काँग्रेसचे जिल्हा सचिव अमर सुर्यवंशी, ॲड. राजेश भादुले, प्रदेश सचिव शंकर सुरवसे, युवक शहराध्यक्ष संदिप शिंदे, ठाकरे युवा सेना शहरप्रमुख श्रीनिवास उपळकर, राष्ट्रवादी युवक शहराध्यक्ष स्वप्निल जगताप, सामाजिक संघटनेचे संतोष बंडगर, गणेश अंकुशराव, धनाजी लटके, सुरज गंगेकर, निलेश कोरके, सुरज पेंडाल, बलदेव शिकलकर, धीरज टिकोरे, सारंग महामुनी, शुभम पवार, विशाल सावंत, रशीद शेख, संकेत बारसकर, अक्षय ढाळे, अक्षय शेळके, प्रदीप निर्मळ, दादा थिटे, तानाजी मोरे, यश महिंगडे यांच्यासह महाविकास आघाडीच्या सर्व पक्षांचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.




**महिलेचा मृत्यू होवून प्रशासन झोपलेलेच : श्रीकांत शिंदे**

गेल्या काही दिवसांपूर्वी सरगम चौकातील येणाऱ्या रस्त्यावर खड्डा असल्याने एका गरीब महिलेचा एस .टी . खाली चेंगरून मृत्यू झाला तरी देखील प्रशासन झोपलेलेच असल्याचे पहावयास मिळत आहे . अजूनही प्रशासनाने खड्ड्यांची दुरूस्तीची करण्याची मोहीम हाती घेतलेली नाही . का प्रशासनास आणखी लोकांचा बळी गेल्यावर जाग येणार आहे असा खडा सवाल श्रीकांत शिंदे यांनी केला .

# त्यागमूर्ती धम्ममाता रमाईचा आदर्श बहुजन महिलांनी घ्यावा

आधुनिक केसरी न्यूज

**चिखली :** ऋणानुबंध समाज विकास संस्थे व्दारा संचालीत तुकाराम आश्रय वृद्धाश्रम भोकर येथे आज दिनांक 7 फेब्रुवारी रोजी त्याग मूर्ती धम्ममाता रमाई जयंती चे आयोजन करण्यात आले होते.



यावेळी जेष्ठ साहित्यिक हि. रा. गवई प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते तर कार्यक्रमाचे अध्यक्ष शाहिर सिध्दार्थ डोंगरदिवे, प्रमुख उपस्थीतीत सामाजिक कार्यकर्ते रामदास नेवरे, सौ नलीनी ताई गवई, कु. सुप्रीया चंदन तायडे हे होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला मान्यवरांनी त्यागमूर्ती धम्म माता रमाई यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाला सुरुवात झाली. याप्रसंगी उपस्थितांना मार्गदर्शन करतांना गवई म्हणाले की त्यागमूर्ती धम्ममाता रमाईचा आदर्श बहुजन महिलांनी घ्यावा जेणे करुन माता रमाईला खरी आदरांजली ठरेल यावेळी कु. सृष्टी कऱ्हाडे, कु. दिक्षीता कऱ्हाडे, अनिकेत डोंगरदिवे, शैलेष वानखडे यांनी त्यागमुर्ती रमाई मातेच्या जिवनावर आपले विचार व्यक्त केले. तसेच साहित्यीक हि.रा. गवई यांनी माता रमाई जयंतीनिमित्त वृध्दाश्रमास धान्य व फोटो तर शालीकराम कऱ्हाडे व रामदास नेवरे यांनी एक ट्रॉली जळतन वृध्दाश्रमास दान दिले. सूत्रसंचालन वृद्धाश्रमाचे संचालक प्रशांतभैय्या डोंगरदिवे व प्रास्तावीक रूपालीताई डोंगरदिवे यांनी तर आभार प्रदर्शन प्रियंका वानखडे यांनी केले. यावेळी वृध्दाश्रमातील वृध्दांसह उत्तम महाराज डोंगरदिवे, रविशंकर डोंगरदिवे, प्रकाश डोंगरदिवे, अवचितराव डोंगरदिवे, सुभाष डोंगरदिवे, कावेरी डोंगरदिवे, लता घेवंदे, समाधान डोंगरदिवे, विलास डोंगरदिवे, किरण डोंगरदिवे, सचिन डोंगरदिवे, संकेत डोंगरदिवे, अनिकेत डोंगरदिवे, सुरज डोंगरदिवे, नितीन डोंगरदिवे, अमोल डोंगरदिवे, विश्वजीत वानखडे, चंद्रभागा वानखडे, नवदीप पवार यांच्यासह बौध्द उपासक उपासिका हजर होते.

# संतांच्या शिकवणुकीतून बोध घ्यावा : सुनील विसपुते

## रंगनाथ महाराज यांना जीवन गौरव पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज

**जामनेर :** तालुक्यातील पहूर येथील संतांच्या शिकवणीतून आजच्या समाजाने बोध घ्यावा, असे प्रतिपादन दुय्यम निबंधक सुनील विसपुते यांनी केले. संत शिरोमणी नरहरी महाराज पुण्यतिथी निमित्त आयोजित पुरस्कार वितरण सोहळ्याप्रसंगी अध्यक्ष स्थानावरून ते बोलत होते. ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते चंद्रकांत सोनार यांच्या निवासस्थानी पुण्यतिथी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. प्रारंभी संत शिरोमणी नरहरी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी श्रीक्षेत्र संगमेश्वर महादेव मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष तथा पुजारी शिवभक्त रंगनाथ महाराज सोनार यांना स्मृती चिन्ह, सन्मानपत्र, स्नेहवस्त्र, गुलाबपुष्प देवून जीवन गौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला. निवृत्त पोस्टमन शिवलाल तुकाराम सोनार यांना सेवा गौरव पुरस्कार बहाल करण्यात आला. आर. टी. लेले हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाचे उपक्रमशील शिक्षक गिरीश भामेरे यांना गुरु गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. तसेच पूजा दुसाने, दीप्ती सोनार, ऋषिकेश भामेरे, निलेश सोनार, कुणाल भामेरे, अरविंद दुसाने, प्रमोद भामेरे, उदय सोनार, अभय सोनार आदी गुणवंत विद्यार्थ्यांना सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले.




याप्रसंगी सेवानिवृत्त मुख्याध्यापक व्ही. जी. भालेराव, स्टेट बँकेचे व्यवस्थापक शफिक पिंजारी, सुवर्णकार समाजाचे माजी अध्यक्ष संजय सोनार यांनी मार्गदर्शन केले. गिरीश भामेरे यांनी सत्कारमूर्तींमधून प्राथमिक स्वरूपात मनोगत व्यक्त केले. उपाध्यक्ष अरुण मोरे, सचिव अशोक दुसाने, कोषाध्यक्ष रतन भामेरे, भरत भामेरे, गणेश सोनार, किसन मोरे, जयंत जगताप, सुभाष बाविस्कर, हिरालाल भामेरे, सुरेश सोनार, ईश्वर सोनार, निळकंठ महाराज, भागवत सोनार, गजानन सोनार, अशोक सोनार, शंकर सोनार, नितीन सोनार, विलास भामेरे, जितेंद्र सोनार, राकेश जगताप यांच्यासह समाज बांधव भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन व प्रास्ताविक सहसचिव शंकर भामेरे यांनी केले. आभार सचिव अशोक दुसाने यांनी मानले. यावेळी उपस्थित भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.



# मॅथेडॉन विक्रीप्रकरणी एक अटक

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** नशा आणणारे मॅथेडॉन औषध अवैधरित्या विक्री करणाऱ्या इसमास सिटीचौक पोलिसांनी अटक केली आहे त्याच्या ताब्यातून ११ ग्रॅम ज्याचे बाजार मूल्य २५ हजार रु आहे ते जप्त करण्यात आले आहे. शेख अब्दुल कादिर उर्फ उल्ला (३२)रा रशीदपुरा असे अटक आरोपीचे नाव आहे बेगमपुरा पोलीस ठाण्यात त्याच्या वर मारामाऱ्या केल्याचा गुन्हा दाखल आहे. पाकिजा फ़ंक्शन हॉल समोर सापळा रचून सिटीचौक पोलिसांनी कारवाई केली. यावेळी फॉरेन्सिक लॅबचे तज्ज्ञ हजर होते. वरील कारवाई पोलीस निरीक्षक अशोक गिरी यांच्या मार्गदर्शनाखाली पीएसआय रोहित गांगुर्डे फॉरेन्सिक लॅबचे डॉ. संतोष कोते, नवनाथ वायचाळ यांनी पार पाडली पुढील तपास एपीआय कराळे करत आहेत.

# मागेल त्याला विहीर योजनाचा शेतकरी बांधवांनी लाभ घ्यावा

आधुनिक केसरी न्यूज

**पाटोदा :** तालुक्यातील शेतकरी बांधवानी मागेल त्याला विहीर अनुदान योजना पुन्हा सुरु; झाली असून विहिरी साठी आता चार लाख रूपये पर्यंत अनुदान मिळणार असल्यामुळे शेतकरी बांधवानी या योजनेअंतर्गत अर्ज करावेत असे आवाहन तळेपिंपळगाव वाघाचावाडा गावाचे सरपंच बाळासाहेब चौरे व येवलवाडी गावाचे उपसरपंच राहुल नागरगोजे यांनी केले आहे. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना अंतर्गत हे अनुदान देणार असून यासाठी शेतकऱ्यांना लागणारी





कागदपत्रे पात्रता, अटी व आवश्यक कागदपत्रे मनरेगा अंतर्गत अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती तसेच भटक्या जमाती व तसेच दारिद्र रेषेखालील लाभार्थ्यांना व कुटुंबाला ह्या योजने अंतर्गत लाभ दिला जातो. यासाठी पाच एकरपेक्षा कमी जमीन असणे आवश्यक म्हणजे शेतकरी अल्पभूधारक असणे आवश्यक आहे या सर्व कागदपत्र घेऊन ग्रामसेवक तथा पंचायत समितीचे संपर्क करावा.

# फर्दापूर पोलिस ठाण्याचे सपोनि म्हणून भारत मोरे यांनी स्वीकारला पदभार

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील फर्दापूर येथील फर्दापूर पोलिस स्टेशन येथे अगोदर सपोनि देवीदास वाघमोडे यांची औरंगाबाद येथे एसपी ऑफिसला बदली झाली असून त्यांच्या जागेवर पोलिस सहाय्यक पोलीस निरीक्षक भारत मोरे तर उपनिरीक्षक दामोदर वाघमारे यांची बदली झाली असून यांनी पदभार स्वीकारला आहे



पोलिसांची जनमानसातील प्रतिमा अधिक उंचावण्याकडे प्राधान्याने लक्ष देणार असून, सर्वसामान्य लोकांमध्ये पोलिसांविषयी सकारात्मकतेची भावना निर्माण करणार आहे. कायदा व सुव्यवस्था राखणार असून, कायद्याचा जे कोणी अनादर करतील त्यांची गय केली जाणार नाही. त्यांच्यावर कठोर कारवाई करण्यात येईल. फर्दापूर पोलिस ठाण्याच्या हद्दीतील अवैध धंद्यांवर कारवाईचा बडगा उगारणार असून, अवैध धंदेवाल्यांचे कंबरडे मोडणार आहे. तसेच गुंडगिरीचा बिमोड करणार असल्याचे फर्दापूर पोलिस ठाण्याचे भारत मोरे पोलिस सहाय्यक पोलीस निरीक्षक भारत मोरे यांनी सांगितले.फर्दापूर पोलिस ठाण्याचे भारत मोरे पोलिस सहाय्यक पोलीस निरीक्षक म्हणून यांनी नुकताच पदभार स्वीकारला. यानंतर जेष्ठ पत्रकार गोकुळसिंग राजपूत पत्रकारांशी संवाद साधताना ते बोलत होते. पोलिस निरीक्षक सुरेश निंबाळकर हे चोरी, घरफोडी, मारामारी यावर प्रतिबंधात्मक कारवाई करणार आहे. यापूर्वी झालेले गुन्हे उघडकीस आणून संबंधित आरोपींना गुन्ह्यात शिक्षा कशी लागेल अशा प्रकारचा तपास करण्यात येईल. ज्येष्ठ नागरिक, शाळकरी मुले, मुली, महिला यांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देणार असून, यासाठी शाळा व कॉलेजवर जाऊन विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती करणार आहे. पोलिस ठाण्याच्या हद्दीतील शाळा व कॉलेजमध्ये "पोलिस दादा' ही संकल्पना राबविण्यात येणार यामध्ये एकाच नंबरवरून अनेकांना एकाच वेळी आग लागल्याची किंवा चोर, दरोडेखोर आल्याची माहिती देता येईल. त्यामुळे आग आटोक्यात आणण्यासाठी व चोर, दरोडेखोरांना पकडण्यासाठी मदत होईल. अशे सपोनि भारत मोरे यांनी बोलताना सांगितले

# संगम तीर्थक्षेत्राच्या पायाभूत विकासासाठी लवकरच विशेष कृती आराखडा : आ. राजेश पवार

आधुनिक केसरी न्यूज

**बाबुराव गोणारकर**

**धर्माबाद :** तालुक्यातील त्रिवेणी नदीच्या संगमावर वसलेल्या हेमाडपंथी संगम या तीर्थक्षेत्राचा पायाभूत विकास करण्यासाठी लवकरच एक विशेष कृती आराखडा तयार करून या पवित्र तीर्थक्षेत्राचा विकास केला जाईल असे प्रतिपादन नायगाव विधानसभेचे आमदार राजेश पवार यांनी संगम तीर्थक्षेत्रावर केले.

आमदार राजेश पवार हे नुकतेच धर्माबाद तालुक्याच्या दौऱ्यावर होते. विविध गावांच्या भेटीगाठी घेत त्यांच्या समस्या ऐकून घेत ते संगम तीर्थक्षेत्रावर गेले. संगम हे तीर्थक्षेत्र गोदावरी मांजरा व हरिद्रा या तीन नदीच्या संगमावर वसलेले असल्यामुळे येथे मोठे नयनरम्य दृश्य बारमाही असते. येथे हेमाडपंथी महादेवाचे जागृत देवस्थान म्हणून मंदिर आहे. संगम तीर्थक्षेत्र हे 'क, वर्गाचे पर्यटन स्थळ म्हणून मान्यता प्राप्त असून माजी खासदार तथा मंत्री भास्करराव पाटील खतगावकर यांचे हे कुलदैवत आहे. या मंदिराचा व मंदिराकडे जाण्याच्या रस्त्याचा विकास व्हावा यासाठी कोट्यावधी रुपयाचा निधी अगोदर आला होता. पण त्या निधीचे काय झाले? संगम तीर्थक्षेत्राचा खरोखरच पायाभूत विकास झाला का? यासंदर्भात दबक्या आवाजात अगोदरच्या राजकीय व्यक्तींच्या बद्दल अतिशय तीव्र टीकात्मक चर्चा होत असून आमदार राजेश पवार मात्र आपल्या मतदारसंघाचा सर्वांगीण विकास कसा व्हावा यासाठी ते दिवस रात्र एक करीत आहेत.

दोन महिन्यापूर्वीच त्यांनी उच्चस्तरीय अभियंत्यांची टीम संगम तीर्थक्षेत्र पाहणी साठी पाठवून नेमके काय करता येते, कोणता मूलभूत विकास येथे करता येतो यासंदर्भातला अहवाल मागितला होता. त्या धरतीवर परवा आमदार राजेश पवार हे स्वतः संगम तीर्थक्षेत्रावर भेट दिली. त्रिवेणी नदीच्या संगम तीर्थक्षेत्रावर पवित्र स्नान करून भाविक महादेवाचे दर्शन घेत असतात. नदीच्या



घाटावर स्नान करताना स्त्रियांना उघड्यावर स्नान करावे लागते. त्यांना कपडे बदलायला सुद्धा तिथे सोयीस्कर जागा नाही. तद्वतच स्वच्छतागृहे तिथे नसल्यामुळे स्त्रियांची उचंबना होत असते. संगम तीर्थक्षेत्रावर अगदी छोटेसे सभामंडप बांधण्यात आले असले तरी त्या ठिकाणी मूलभूत सुविधा देण्यास आतापर्यंत अगोदरचे राजकीय व्यक्तिमत्व नाकर्ते ठरलेले आहे. या गोष्टीचा रागरोष संगमपरिक्षेत्रातील भाविकांमध्ये होताच. पण आमदार राजेश पवार हे संगम तीर्थक्षेत्राचा सर्वांगीण विकास होण्याच्या दृष्टीने स्वतः कृतिशील असल्यामुळे त्यांचे कौतुक होत असून येत्या 18 व 19 तारखेला संगम तीर्थक्षेत्रावर परंपरागत जत्रा व कुस्तीचा फड रंगणार आहे. त्यावेळीही त्यांची प्रमुख उपस्थिती असण्याची शक्यता आहे.

संगम तीर्थक्षेत्राचा विकास कसा होऊ शकतो आणि गावकऱ्यांना काय अपेक्षित आहे हे स्वतः आमदार राजेश पवार यांनी जाणून घेतले. त्या दिशेने ते शासन दरबारी पाठपुरावा करणार असून संगम तीर्थक्षेत्राच्या सर्वांगीण विकासासाठी फार मोठा निधी खेचून आणण्याच्या तयारीत ते आहेत.

यावेळी आमदार राजेश पवार यांच्यासोबत त्यांचे कट्टर समर्थक रुग्ण कल्याण समितीचे सदस्य तथा बाजार समितीचे संचालक रमेश अण्णा गौड, भाजपाचे माजी तालुकाध्यक्ष विजय डांगे, यांच्यासह संगमचे सरपंच प्रतिनिधी विठ्ठलराव आष्टे जमीर सेठ व गावातील प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते.



## जिंतूर तहसील कार्यालय परिसराला जत्रेचे स्वरूप : अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष

आधुनिक केसरी न्यूज

**बी.डी. रामपूरकर**

**जिंतूर :** तहसील कार्यालयातील अतिक्रमण जैसे थे जिंतूर तहसील ऑफिस, रजिस्ट्री ऑफिस, पंचायत समिती, हे एकाच ठिकाणी असल्यामुळे तेथे तहसील कार्यालयातील प्रांगणात जत्रेचे स्वरूप दिसून येते कोरोना संपताच तहसील प्रांगणात गर्दी च गर्दी दिसत आहे. बॉण्ड विक्रेते व झेरॉक्स,चहा, टायपींग वाले अतिक्रमण केल्या मुळे प्रांगणात जत्रेचे स्वरूप आलेले दिसते.

सदरील बाँड पेपर परवानाधारक यांना शहरातील वेगवेगळ्या ठिकाणी नेमून देण्यात आलेले असताना देखील सर्वजण तहसील पंचायत समिती आवारात अतिक्रमण करून ठाण मांडून बसलेले असतात तर कोर्ट फि टँम्प वाले पाच चे तिकीट दहा रुपयाला विक्री करताना सर्रास दिसून येतात तसेच पाचशे रुपयांच्या बॉण्डवर आगाऊ चे पन्नास रुपये मोजावे लागतात त्यामुळे ग्रामीण भागातून आलेल्या शेतकरी मजूर व इतरांना विनाकारण भुर्दंड सहन करावा लागतो याकडे संबंधित वरिष्ठांनी लक्ष देणे अत्यंत गरजेचे असून येथील तहसील पंचायत समिती आवारातील अतिक्रमण हटवून आपापल्या ठिकाणी बॉण्ड विक्रेत्यांना बसण्यास सांगावे व रीतसर पैसे घेण्यात यावे अशी मागणी जनतेतून होत आहे. याकडे तहसीलदार यांचे लक्ष नसल्यांचे दिसते. ग्रामीण भागातील नागरिकांना जिंतूर येथे यावे लागते पण एकाच ठिकाणी विक्रेते असल्यामुळे तेथे नागरिकांची गर्दी जास्त झालेले दिसून येते तर या ठीकाणी विक्रेत्या कडुन जास्तीची रक्कम उकळल्या जात असल्याचे दीसुन येत आहे. तसेच तहसीलदार येथील सब रजिस्टर यांनी ही बाब गांभीर्याने घेऊन संबंधितांना तसे कळवावे अशी मागणी होत आहे. याकडे तहसीलदार यांनी परीसरातील अतिक्रमण हटविण्यात यावे अशी मागणी नागरिकांतून होत आहे.

## अंबडला साडेतीन लाखांचा गुटखा जप्त

आधुनिक केसरी न्यूज

**नाशिक :** राज्यात अवैध गुटखाविक्रीला बंदी असतानाही शहरात राजरोसपणे गुटखा विक्रीचा व्यवसाय सुरू असल्याचा प्रकार समोर आला आहे. अंबड पोलिस स्टेशनच्या शंभर मीटर अंतरावरच एका होलसेल गुटखा व्यावसायिकाकडून तब्बल साडेतीन लाखांचा अवैध गुटखा अंबड पोलिसांनी कोम्बिंग ऑपरेशनच्या कारवाईदरम्यान जप्त केला आहे. वाढती गुन्हेगारी व शहरात राजरोसपणे अवैध धंदे सुरू असल्याने पोलिस आयुक्त अंकुश शिंदे यांनी कारवाईचे आदेश दिले आहेत. यानुसार मंगळवारी (दि. ७) रात्री अंबड पोलिसांकडून हद्दीत कोम्बिंग ऑपरेशन सुरू होते. गुन्हेगारांची पडताळणी सुरू असताना अंबड पोलिस ठाण्याचे पोलिस उपनिरीक्षक सुनील बिडकर यांना एका गोडाऊनमध्ये गुटखा ठेवला असल्याची गोपनीय माहिती मिळाली.

यानुसार अंबड पोलिस ठाण्याच्या मागे शंभर मीटर अंतरावर मुसळे ट्रेडर्स या होलसेल गुटखा व्यावसायिकाच्या घराच्या बाजूला असलेल्या गोडाउनमध्ये दहा पोते विमल पानमसाला, तसेच रजनीगंधा, जर्दा असलेला गुटखा आढळून आला.

अंबड पोलिस ठाण्याचे प्रभारी पोलिस निरीक्षक युवराज पत्की यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हेशोध पथकाचे सहाय्यक पोलिस निरीक्षक वसंत खतेले, पोलिस उपनिरीक्षक सुनील बिडकर, हरिसिंग पावरा, उत्तम सोनवणे यांच्यासह अधिकारी व अंमलदारांनी ही कारवाई केली. अन्न व औषध प्रशासनाकडून अनेक ठिकाणी अवैध गुटखा विक्रेत्यांवर कारवाई करण्यात आली आहे.

।। जय जय रघुवीर समर्थ ।। (नोंदणी क्रमांक - महा-२८७/२०२१)

देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण समाज मंडळ, संभाजीनगर

• प्रेरणास्थान • स्व.शंतनु चौधरी

सर्वशाखीय सामुहिक उपनयन संस्कार / मौंजी व्रतबंध संस्कार

• दिनांक व वार • दि.२४ मे २०२३, बुधवार

• स्थळ • कुलस्वामिनी मंगल कार्यालय, एन-६, सिडको, संभाजीनगर

• उपनयन संस्कार (मुंजी) साठी शुल्क रु.५००१/-
या शुल्कात ब्राह्मण दक्षिणा, मातृभोजन, अष्टवर्ग (०८ मुंजे), पंचा सोवळे, पळी पंचपात्र, तांब्याचा तांब्या, ११ लोकांची भोजनाची व्यवस्था

११ पेक्षा जास्त लोकांची भोजनाची व्यवस्था प्रति पात्र रु.२५०/- अतिरिक्त पात्राप्रमाणे जास्तीत जास्त १० व्यक्तींसाठी आधीच नोंदणी केल्यासच होऊ शकेल.

- उपनयन संस्कार नोंदणी साठी संपर्क -
श्री. नरेश जोशी मो.9923450457
श्री. रवि जेहुरकर मो. 9423782006
श्री. अनंत कुलकर्णी मो.9371586722
श्री. अंबादास कुलकर्णी मो.9422293221
श्री. अमोल पांडव मो.9420249112
श्री. प्रशांत दाभाडकर मो.9011556571
श्री. श्रीपाद मुगूटे मो.9767400402
श्री. रविंद्र पंडित मो. 9420265133
श्री. नरेश पटवर्धन मो. 8999593657
श्री. वैभव देशपांडे मो. 7588930540
श्री. मिलिंद दाभाडकर मो. 9404887701
मोनिका शंतनु चौधरी मो. 9834787962
उत्कर्षा पारनेरकर मो. 9421301762
सीमा कस्तुरे मो. 8830155974
मयुरी दाभाडकर मो. 9637936521
योगिनी देशमुख मो. 9511709236

-: विशेष सुविधा :-
• सुसज्ज व मोठी क्षमता असलेले कुलस्वामिनी मंगल कार्यालय • बटू व कुटूंबीयसाठी १२ मोठ्या रुमची एकत्रितपणे व्यवस्था. • बटू ची भव्य मिरवणूक.• गाडी पार्किंग ची व्यवस्था. • बाहेरगावाहुन येणाऱ्या बटू व सोबत कुटूंबियांची फक्त आदल्या दिवशी राहण्याची सोय आहे, जेवणाची नाही.
• टिप - भिक्षावळीची, हातव्याचे ताटाची व्यवस्था स्वतः करावी.•

ऑन लाईन पेमेंट गूगल पे/फोन पे 9422293221 नोंदणी अंतिम दिनांक २०/०४/२०२३
(प्रथम येणाऱ्यास प्राधान्य असून किती नोंदणी घ्यायच्या याचे सर्वाधिकार मंडळास राहतील)

आवाहन - सध्याचा काळ दिवसेंदिवस कठीण होत असुन सामुदायिक कार्यक्रमात सहभाग घेऊन कमी खर्चात व्रतबंध संस्कार करुन घ्यावा व यासाठी बाचलेले पैसे बटुचे नावाने फिक्स डिपॉझिट करुन शिक्षणासाठी ठेवावेत.

सर्वशाखीय ब्रह्मवृंदा साठी सतत सामाजिक उपक्रम घेणारे मंडळ देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मंडळ

## क्रुझरची बाईकला भीषण धडक, दुचाकीस्वार हवेत उडाला

आधुनिक केसरी न्यूज

**गडचिरोली :** कोरची ते कुरखेडा दरम्यानच्या राष्ट्रीय महामार्गावर भरधाव वेगाने प्रवासी घेऊन कुरखेडाकडे निघालेल्या क्रुझर गाडीने समोरून येणाऱ्या दुचाकी स्वाराला जोरदार धडक दिली. यात दुचाकीस्वारासह क्रूजर मधील एक महिलेचा जागीच मृत्यू झाला. याशिवाय आठ जण गंभीर जखमी झाले आहेत हा अपघात गुरुवारी (दि.02) दुपारी ३ वाजताच्या सुमारास घडला. मिळालेल्या माहितीनुसार गुरुवारी कोरची येथील आठवडी बाजार होता. परंतु कोरची ते कुरखेडा महामार्गावर एसटी महामंडळाच्या बस फेऱ्या मोजक्याच असल्याने प्रवासी मिळेल त्या वाहनाने प्रवास करीत होते. दुपारी कोरची वरून दहा प्रवाशांना घेऊन एमएच ०४,बी क्यू १९२४ ही क्रूजर गाडी कुरखेडाकडे भरधाव वेगाने जात असताना मोहगाव येथील वळणावर विरुद्ध दिशेने येणाऱ्या मोहगाव येथील सबीलाल भारत सोरी (५७) यांच्या सीजी (08,एफ 3217) क्रमांकाच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. जखमींमध्ये नामदेव वासुदेव तुलावी (28 वर्षे) रा.लव्हारी, उसन मारुती लाडे (52) रा.कऱ्हाडी, जयसिंग नवलसिंग फुलकवार (24) रा. पांडूटोला, सोनल नर्सिंग फुलकवार (03 वर्ष),रा.पांडू टोला, रेशमी रवींद्र मडावी (35 वर्ष) रा.बेडगाव, राशी रवींद्र मडावी (9वर्ष) रा. बेळगाव, सुरेखा हिरा निकोडे (32 वर्ष) रा.बेडगाव यांच्यावर कोरची येथील ग्रामीण रुग्णालयात उपचार सुरू आहे. कोरची पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक अमोल फडतरे यांनी घटनास्थळ गाठून घटनेचा पंचनामा केला. या अपघातात क्रूजर गाडी चालक विजय देशमुख याचे गाडीवरील नियंत्रण सुटले आणि वळणावर दुचाकीला जोरदार धडक दिली. ही धडक एवढी जोरात होती की मोटर सायकलस्वार चेंडूसारखा हवेत उडून महामार्गावरून वीस ते पंचवीस फूट दूर फेकला गेला.

# भूकंपासारखी विनाशकारी आपदा चिंताजनक



रमेश लांजेवार, नागपूर
संपर्क क्र. 9921690779

आधुनिक केसरी

**दिवसेंदिवस निसर्ग कोपतो आहे आणि विक्राळ रूप धारण करून मानवाला धर्तीमध्ये सामावून घेत आहे ही बाब तुर्की-सीरियाचा भूकंप आखोदेखी बयान करीत आहे. भुकंपामुळे मृत्यूचे तांडव दिनांक ६ फेब्रुवारी २०२३ रोज सोमवारला तुर्की व सीरियामध्ये दिसून आले आणि अनेकांसाठी हा दिवस काळ ठरला व मोठ्या प्रमाणात जिवीत व वित्तीय हानी संपूर्ण जगाने आपल्या उघड्या डोळ्यांनी पहाली व संपूर्ण विश्व स्तब्ध झाला आणि मदतीकरीता भारतासह ७० देशांनी हात सामोरं केला आहे.**

दिवसेंदिवस पृथ्वीवर होत असलेला अन्याय, अत्याचार आज मानवजातीच्या जिव्हारी लागतो आहे आणि हळूहळू धर्ती-आकाश-पाताळ-जल-स्थल-वायु विक्राळ रूप धारण करीत आहे. यांचे जिवंत उदाहरण तुर्की,सीरियाच्या भुकंपावरून लक्षात येते. सध्याच्या परिस्थितीत दिवसेंदिवस न-भुतो-न-भविष्यती अशा प्रकारच्या अंगावर शहारे येणाऱ्या अनेक नवीन -नवीन घटना आपल्याला जगात पहायला मिळत आहे. पुढेचालुन निसर्ग आणखी भयानक विक्राळ रूप धारण करू शकते याला नाकारता येत नाही. तुर्की, सीरिया येथील भुकंपाने पृथ्वी फाटली की काय अशी भीती जाणवायला लागली. संपुर्ण तुर्की व सीरियामध्ये ३६ तासात ५५० छोटे-मोठे भुकंपाचे धक्के बसले. म्हणजे आज संपूर्ण तुर्की-सीरिया भुकंपाच्या छायेत असल्याचे स्पष्ट दिसून येते. तुर्कीमध्ये सोमवारला ३० मिनिटांत तिनं भीषण व भयावह भुकंपाचे धक्के बसले.पहिला भुकंप ४ वाजुन २७ मिनिटांनी आला याची तीव्रता ६.७ रिक्टर इतकी होती, यानंतर ११ मिनिटांनी पुन्हा भुकंप आला त्याची तीव्रता ५.६ रिक्टर स्केल इतकी होती व तिसरा भुकंप १९ मिनिटांनी आला यात २० धक्के जाणवले व याची तीव्रता ६.६ रिक्टर स्केल इतकी होती. यामुळे तुर्कीतील दमास्कस, अलेप्पो, हमा, लताकियासह अनेक शहरांमध्ये पत्यांच्या बंगल्या सारख्या इमारती धाराशाही झाल्या. यामुळे मृत्यूचा आकडा १० हजारांच्या वर जावु शकतो असा अंदाज आहे.तुर्की, सीरियामध्ये आलेल्या भुकंपाचे धक्के अनेक देशांत सुध्दा जानवल्याचे सांगितले जाते.

सोमवारला तुर्की व सीरियामध्ये महाभयानक भुकंप आलाच परंतु दुसऱ्या दिवशीही मंगळवारला भुकंपाचे तीव्र धक्के तुर्की व सीरियाला सोसावे लागले.तुर्कीमध्ये आतापर्यंत ५४०० पेक्षा जास्त लोकांचा मृत्यू झाला तर सीरियामध्ये १८०० पेक्षा जास्त लोकांचा मृत्यू झाल्याचे सरकारी सुत्रांकडून समजते. आपण कल्पनाच करू शकत नाही अशाप्रकारची त्रासदी व विनाशलिला आज तुर्की व सीरिया सहन करीत आहे.या भीषण त्रासदीमध्ये २ करोड ३० लाख पेक्षा जास्त लोक प्रभावीत होवू शकतात व लाखोंच्या संख्येने



जखमी होवू शकतात अशी आशंका डब्ल्युएचओ ने वर्तवली आहे. त्याचप्रमाणे मृतांचा आकडा २० हजारांच्या वर जाऊ शकतो म्हणजेच स्थिती अत्यंत गंभीर,भयावह आणि अंगावर शहारे येणारी आहे. तुर्कीतील मृत्यूच्या तांडवाची भयावह स्थिती पहाता तुर्कीचे राष्ट्रपती रिसेप तैयप एर्दोआन यांनी १० राज्यात ३ महिन्यांसाठी इमरजेंसी ( आपात्काल ) लागु केलेली आहे. आता तुर्की व सीरियाच्या नंतर रशियामधील आइसलैंड येथे भुकंपाचे तीव्र धक्के जाणवल्याचे सांगितले जाते याची तीव्रता ५.३ रिक्टर स्केल इतकी होती.म्हणजे निसर्गाच्या होत असलेल्या ह्रासामुळे संपूर्ण जगात कुठेही केव्हाही भुकंप किंवा सुनामी येवू शकते ही बाब संपूर्ण विश्वाने लक्षात ठेवली पाहिजे .जगाने निसर्गाचे संतुलन जर सुरळीत आणि समतोल ठेवले नाही तर भुकंप, सुनामी,महापुर,अती उष्णता,अती थंडी,अती पाऊस,वनवा लागने यामुळे केव्हाही कधीही विक्राळ रूप धारण करू महाभयानक परिस्थिती निर्माण होवू शकते याला कोन्हीही नाकारू शकत नाही.कोणताही विनाश असो यात मानवाचीच जीवीत हानी होत नाही तर वन्यजीव प्राणी, संपत्ती, संपूर्ण जीवजंतू यांना सुध्दा आपले प्राण मुकावे लागते व सामना करावा लागतो. याकरीत जगातील युद्ध जन्य परिस्थिती ताबडतोब थांबली पाहिजे. रशिया- युक्रेन युद्धाला २४ फेब्रुवारी २०२३ ला एक वर्ष पूर्ण होत आहेत.तरीही दोन्ही बाजूंनी कोन्हीही युद्ध थांबवीण्यास तयार ही जगासाठी व निसर्गासाठी चिंताजनक बाब आहे.रशिया-युक्रेन युध्दात हजारोंच्या संख्येने मानव हानी झालीच सोबतच वित्तीय हानी, जीवजंतू, जंगलसंपदा नेस्तनाबूत झाली आहे.हीबाब जगातील संपूर्ण देशांनी लक्षात ठेवली पाहिजे.भुकंपासारख्या भयावह घटना घडल्यानंतर संपूर्ण जग एकवटतो ही चांगली आणि स्वागतार्ह बाब आहे.परंतु जगातील संपूर्ण देशांनी युद्धजन्य परिस्थिती रोखली व गृहयुद्ध रोखले तर आपण निसर्गाला अवश्य वाचवु शकतो. यामुळे जल,स्थल,वायु यात निर्माण होणारे प्रदुषण व होणाऱ्या जीवीत हानी यावंर अवश्य नियंत्रण ठेवण्यासाठी मोठी मदत होईल. भुकंपाचे मुख्य कारण खणण,परमाणु परिक्षण , दारूगोळा, वाढते औद्योगिकीकरण,जंगलतोड व जगातील देशात होणारे युद्ध आणि हतीयार बनवीण्याची शर्यत या मानवाच्या अतीरेकामुळे पृथ्वी भयभीत झालेली आहे यामुळेच आपल्याला भुकंपाच्या घटना मोठ्या प्रमाणात वाढल्याचे दिसून येते.जगात अशीच परिस्थिती रहाली तर जग संपायला वेळ लागणार नाही.त्याचप्रमाणे असे समजायला हरकत नाही की सध्या"जगात होणारा विणाश हा तर ट्रेलर आहे, पिक्चर आणखी बाकी आहे". जगात सध्याच्या परिस्थितीत चीन, अमेरिका, रशिया, युक्रेन, उत्तर कोरिया,नाटो देश एकमेकांवर बंदुक ताणुन आहे म्हणजेच आपणच मौत का कुंवा खोदत असल्याचे दिसून येते. जगातील अनेक देश भुकंपाच्या छायेत आहेत.यात भारताचा विचार केला तर भारतीय उपखंडाचा सुमारे ५९ भुभाग भुकंपप्रवण क्षेत्रात आहे.यातील ३८ शहरांना भूकंपाचा मोठा धोका निर्माण होऊ शकतो. असे राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने म्हटले आहे.देशभरात १९५० पासून आतापर्यंत ३५ हजारांपेक्षा अधिक जीवीतहानी झाली असून, कोट्यवधींची वित्तहानी झाली आहे.असे राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने म्हटले आहे.ही सुध्दा भयावह स्थिती आहे.मागील वर्षात देशभरात प्रामुख्याने उत्तर भारतात ९०० पेक्षा अधिक वेळा भुकंपाचे धक्के बसले यात काही ठिकाणी भुकंपाची तीव्रता ४.० रिक्टर स्केल पेक्षा कमी होती असे राष्ट्रीय भूकंपमापन केंद्राने म्हटले आहे.म्हणजेच भारत सुध्दा भुकंपाच्या छायेत आहेच. मानवाच्या अतीरेकामुळे भुकंपासारख्या महाकाय घटनांशी सर्वांनाच सामना करावा लागतो आहे.त्यामुळे जगातील देशांना विनंती करतो की परमाणु परिक्षण, युद्धजन्य परिस्थिती थांबवुन पृथ्वीची जोपासना करावी यातच सर्वांचे कल्याण होईल असे मला वाटते.

# तीस दिवसांपासून रेल्वे गेट बंद असल्याने शेतकऱ्यांचे नुकसान

## हाता तोंडाशी आलेला हरभऱ्याचा पिक रेल्वे गेटच्या कामामुळे मातीमोल

आधुनिक केसरी न्यूज

**बाबुराव गोणारकर**

**धर्माबाद :** रेल्वे गेट नंबर 180 बाळापूर गेल्या 30 दिवसापासून बंद असल्यामुळे बाळापूर व परिसरातील शेतकऱ्यांचे अतोनात हाल होत आहेत. याच रेल्वे गेटवरून ग्रीनफिल्ड हायस्कूल, कस्तुरबा गांधी विद्यालय व अनेक गावांना जाणारे व पायोनियर येथे कर्मचारी असलेल्या अनेक कर्मचाऱ्यांचे हाल होत आहेत.

बुधवारी भारतीय जनता पक्षाच्या वतीने रेल्वे बोर्डाला संबंधित गेट उघडण्यासंदर्भात निवेदन देण्यात आले होते, परंतु गावकऱ्यांच्या नागरिकांच्या व शेतकऱ्यांच्या मागणीला केराची टोपली दाखवत रेल्वे प्रशासनाने याकडे ढुंकूनही पाहिले नाही. शेतकऱ्यांना तोंडाशी आलेला हरभऱ्याचे पीक हे पूर्णतः काढणी योग्य झाले असून उन्हामुळे घाट्या गळून जाऊन नुकसान होत असल्याचेही विदारक चित्र दिसत आहे. आता शेतकऱ्यांना आपल्या शेतांमध्ये ट्रॅक्टर, मळणी यंत्र असे वेगवेगळे शेती अवजार घेऊन जाण्यासाठी धर्माबादच्या मुख्य रस्त्याने येऊन रत्नाळी गेटवरून जावं लागत आहे. अगोदरच शहरातील रस्ते अरुंद असून रहदारीचाही मार्ग शहरातून असल्यामुळे याच रस्त्यातून मळणी यंत्र, ट्रॅक्टर, बैलगाडी घेऊन आता शेतकऱ्यांना जावं लागत आहे. जवळपास हे अंतर बाळापूर वासियांना आठ किलोमीटरचे पडत आहेत. त्यामुळे रेल्वे प्रशासनाने ताबडतोब हा रेल्वे गेट शेतकऱ्यांसाठी खुला करून त्यांच्या होणाऱ्या नुकसान टाळाव्यात अशी मागणी भारतीय जनता पक्षाच्या वतीने दिनांक नऊ रोजी सकाळी आमरण उपोषणाला बसलेल्या कार्यकर्त्यांनी दिलेली आहे. गेल्या 30 दिवसापासून अत्यंत मंद गतीने चालू



असलेले हे काम अत्याधुनिक यंत्रसामुग्रीने जर केले असते तर ते त्वरित झाले असते. असाही आरोप भारतीय जनता पक्षाचे तालुका अध्यक्ष रवींद्र पोतगंटीवार यांनी केला आहे. शेतकऱ्यांच्या हाता तोंडाशी आलेला घास शेतकऱ्यांचा हरभरा मातीमोल होत असताना प्रशासन मात्र तात्काळ उपाययोजना अवलंब कराव्यात अशी मागणी ही खासदार प्रतापराव पाटील चिखलीकर, केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे व आश्विनी वैष्णव रेल्वेमंत्री भारत सरकार यांच्यावर कडेही ही मागणी करण्यात आली आहे. ह्यावेळी रविंद्र पोतगंटीवार, साईनाथ शिरपुरे, रामेश्वर गंधलवार, विजय राठोड, अविनाश पिंगळे, सनीत चक्करवार, अमित मुंदडा, अंकित गोधा, शिवराज पा गाडीवान, चक्रेश पाटील, रमेश कुंभारे, सज्जन गड्डोड, नागनाथ गुज्जलवार, नानक सिंग ढिल्लो, दत्ता पाटील शिंदे, सुरेश पवार, दिगंबर पवार, अब्दुल रहीम, प्रकाश चंदावाड, चैतन घाटे बालाजी शिंदे, रसूल खान, अशोक कंबलवाड, बळीराम पवार, साईनाथ बेडेकर, भुमेश कनकमवार व मोठ्या प्रमाणात शेतकरी व नागरिक उपस्थित होते.

# मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त नाथ मंदिरात महाआरती



आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त पैठण तालुका व शहर बाळासाहेबांची शिवसेनेच्या वतीने संत एकनाथ महाराज समाधी मंदिर येथे कृषि उत्पन्न बाजार समितीचे सभापती राजू नाना भुमरे यांच्या हस्ते महाआरतीचे आयोजन करण्यात आले होते. तसेच कन्या प्रशाला येथे शालेय साहित्य व शासकीय रुग्णालय घाटी येथे रुग्णाना फळ वाटप करण्यात आले. यावेळी मुंबई महानंदचे संचालक नंदलाल काळे,नाथ संस्थानचे कार्यकारी विस्वस्त बाजीराव बारे, तालुकाप्रमुख आन्नासाहेब लबडे, शहराध्यक्ष तुषार पाटील, किशोर चौधरी, राजू गायकवाड, बाबुराव पडुळे, संतोष संव्वाशे, बाळासाहेब माने, शहादेव लोहारे, अमोल जाधव, मनीष औटे, मिठू नन्नवरे, महिला आघाडीच्या ज्योती काकडे, तसेच आजी-माजी लोकप्रिनिधी महिला आघाडी, शिवसैनिक, सर्व अंगीकृत संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.

गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in